# मनोहर आहिरे

# काशीचं वाडगं



या पुस्तकाचे ई वितरण ई साहित्य प्रतिष्ठानतर्फ़े होत आहे.

ई साहित्य ची सर्व पुस्तके दर्जेदार, सहज उपलब्ध असतात आणि अधिकृतपणे विनामूल्य असतात.

या ई पुस्तकांच्या विनामूल्य वितरणाचे अधिकार ई साहित्य प्रतिष्ठानकडे असतात आणि हे अधिकार ई साहित्यतर्फ़े आपल्या वाचकांना दिले जातात. हे पुस्तक भारतात व जगात जास्तीत जास्त मराठी साक्षरांपर्यंत पोहोचावे हा उद्देश आहे.

मात्र या पुस्तकाच्या पुनर्मुद्रणाचे वा अंशतः मुद्रणाचे, नाट्य वा चित्रपट रुपांतराचे, किंवा इतर कोणत्याही रुपात आणण्याचे सर्व अधिकार लेखकाकडेच असून त्याचे उल्लंघन करणाऱ्यावर कायदेशीर कारवाई होऊ शकते.

ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.com

esahity@gmail.com

# ई साहित्य प्रतिष्ठान

इंग्लंडची लोकसंख्या सहा कोटी आहे. आणि महाराष्ट्राची बारा कोटी. इंग्लीश वाचकांची संख्या आहे शंभर कोटी. आणि मराठी वाचक? कुठे आहोत आपण. माझा मराठाची बोलु कवतुके... अमृतातेही पैजा जिंके.... माउलींनी दाखवलेलं स्वप्न पूर्ण करू तरच आम्ही शिवबाचे मावळे.

मराठी पुस्तक वाचायला कुठे जायची गरज नाही. तुमच्या मोबाईलवर आता हजार मराठी ई पुस्तके आहेत.

मराठी ई पुस्तकं तुम्ही www. esahity. com वरून डाऊनलोड करा. किंवा esahity@gmail.com ला कळवून मेल ने मिळवा. किंवा 7710980841 हा नंबर सेव्ह करून या नंबर ला तुमचे नांव व गांव Whatsapp करून पुस्तके whatsapp मार्गे मिळवा. किंवा ई साहित्यचे app. https://play. google. com/store/apps/details?id=com. esahity. www. esahitybooks या लिंकवर उपलब्ध आहे. ते download करा. हे सर्व मोफ़त आहे. No terms. No Conditions.

आता ठरवलंय. मराठी पुस्तकांनी अवघं विश्व व्यापून टाकू. प्रत्येक मराठी सुशिक्षिताच्या मोबाईलमध्ये किमान पन्नास मराठी पुस्तकं असलीच पाहिजेत. प्रत्येक मराठी माणसाच्या!

तुमची साथ असेल तर सहज शक्य आहे हे... कृपया जास्तीत जास्त लोकांना यात सामिल करून घ्या.

आपले नम्र

टीम ई साहित्य

# काझीचं वाडगं

मनोहर आहिरे

**काझीचं वाडगं** / मनोहर आहिरे
Kazich Vadge / Manohar Ahire

ISBN : 978-93-80166-86-5

© अनिता पगारे
४, क्षितिश अपार्टमेंट, चेतनानगर (राणेनगर),
मुंबई-आग्रा रोड, नाशिक - ४२२ ६०५.
संपर्क : ९८५०५५६४९९, ९३२४५४५५८२,
(०२५३) २३७६४९९.
ahiremanohar3@gmail.com

**पहिली आवृत्ती**
२४ नोव्हेंबर २०१३

**प्रकाशक :**
सुगावा प्रकाशन
चित्रशाळा बिल्डिंगजवळ,
सदाशिव पेठ, पुणे-३०.

**मुखपृष्ठ :**
धनंजय गोवर्धने, नाशिक

**अक्षरजुळणी :**
विजयकुमार इंगळे (८८८८९७८५७)

**मुद्रणस्थळ :**
व्ही-टू एंटरप्राईझ, शेड नं.२, स.नं.६,
यशवंत क्रीडा मंडळ गल्ली, घाटकोपर (प.)
मुंबई. संपर्क : ०२२-३२५५२५३६
vtwoart@gmail.com

**किंमत :** १२० रुपये

एकदा आईला भेटायला नागसेननगरला गेलो.
ख्याल–खुशाली विचारून झाल्यावर तिने नेहमीचा
प्रश्न विचारला, ‘गाडी कुठंय?‘
मी गमतीने म्हणालो, ‘नाही गाडी विकलीय. पायीच आलोय.‘
माझ्याकडं रोखून पहात
छान गालगुच्चा घेत गीताई म्हणाली,
‘लय आला बिनगाडीचा फिरणारा...!‘

गीताईच्या या श्रीमंती भावविश्वाला...!

# तू लिख रे...

‘काझीचं वाडगं’ लिहिण्याकरिता घेण्याअगोदर त्या लेखनात शिरण्याची मानसिकता कशी असते, याचा अनुभव नव्हता. आपण जगलेल्या जिंदगीची कथा सांगताना मी नेहमीच हसायचो अन् हसवायचो! मला वाटायचे, आपण छान मिमिक्री करू शकतो. एक मात्र ठरवून केले, सांगताना केवळ हसू यावे म्हणून कुठल्याही कथानकाला मुलामा दिला नाही किंवा तशी भावनाच जागी झाली नाही.

अनिताला वाचनाचा भयंकर नाद आहे. तिने वाचलेल्या कित्येक व्हरायटींच्या पुस्तकांवर गप्पा मारताना मला नेहमी वाटायचे की कुठं तरी एक थांबा घेऊन हिने आपले अनुभव शेअर करायला काय हरकत आहे? म्हणून माझा लिखाणासाठी किमान आग्रह असायचा. एकदाचे अनिताचे ‘वस्तीवरची पोरं’ नैसर्गिक रूपाने (तिच्या स्वतःच्या बोली शब्दांत) प्रसिद्ध झाले आणि एक वेगळा अनुभव स्पर्शून गेला.

माझ्या साऱ्या स्टोऱ्या वारंवार ऐकून अनिताने मला तगादा लावला, ‘वर्तमानपत्रात काम केलंय, ड्राफ्टींग चांगलं करतोस, भाषणं ठोकतोस, स्टाईल सोडली तर आपले म्हणणे रेटून पटविण्यात यशस्वी होतोस, मग लिहीत का नाहीस?’ मला ती थट्टा वाटायची. पण, ऐन तणावाच्या काळात तिच्या डायरीची काही पाने चाळली. स्वतःची शरम वाटली. बऱ्याच गोष्टी अशा होत्या की, सार्वजनिक आयुष्यात प्रत्येक मुद्यावर एकमतासाठी आग्रह धरणारा मी खासगी आयुष्यातही एकमतानेच निर्णय घेत होतो. हे एकमत म्हणजे माझे एकट्याचे मत! माझ्यातील पुरुषीपणाची झालर त्या डायरीच्या शब्दांनी टराटरा फाडली.

स्वतःमधील गैरवर्तणुकीला रोखण्याकरिता प्रयत्न आपसूकच घेतला गेला. खूप यातना देणारे असते सर्व काही, असेही पहिल्यांदाच जाणवले. स्त्री-पुरुष नातेसंबंधांबद्दल बोलताना सर्वांत अगोदर जी गोष्ट करावी लागते, ती म्हणजे पुरुषीपणाचा आव शून्यापर्यंत आणणे. हा शून्य गाठण्याकरिता स्वतःबद्दलच्या असलेल्या स्वतःच्याच मनातील वृथा भावनांना प्रथम रोखावे लागते. प्रयत्न केला, काही अंशी जमले आणि ‘सांगण्यासाठी

अगोदर ऐकावे लागते' हे मनोमन पटले.

'काझीचं वाडगं' लिहिताना मध्येच पॉज आला. पुन्हा अनितानेच धक्का दिला अन् घंटागाडीचे प्रकरण लिहिले गेले. पुस्तक लिहिताना तीन-चार वेळा ओक्साबोक्सी एकटाच रडलो. तेव्हा त्यातील शब्दांचेही महत्त्व कळले. शब्द जपून वापरायला पाहिजे, असे का म्हणतात? हेही कळले.

मला वाटते, की वस्तीतल्या, झोपडपट्टीचा अनुभव असणाऱ्या आणि जे कुणी सार्वजनिक आयुष्यात जगतात, त्या प्रत्येकाने लिहायला पाहिजे. एकट्यात रात्री दोन ते सकाळी सहापर्यंत आपल्याच तंद्रीत तल्लीन होऊन बोलताना माणूस नागडा होतो. हे बोलणं कागदावर उतरविताना कुठलीही शक्ती हे नागडेपण झाकू शकत नसते. मग स्वतःच नागडा असलेला दुसऱ्याची कापडं कशाला फाडील? हेच नागडेपण निर्व्याज, निर्भेळ व्यवस्थानिर्मितीची एक पायरी ठरावी, असंच यानिमित्ताने मला वाटतंय!

धन्यवाद!

**– मनोहर आहिरे**

**ता. क.** : परवा पुस्तकाची डी.टी.पी. झालेली ५०-५५ पानं घेऊन प्रस्तावना मागण्यासाठी मा. उत्तम कांबळेसाहेबांकडे 'सकाळ'च्या सातपूर कार्यालयात गेलो. अगोदरच परवानगी घेतली असल्यानं दुपारी भेटले. हाती घेतलेली पुस्तकाची पानं फक्त साईज पाहून एकदम मुद्यावर आले, 'मनोहर, तुम्हाला लेखक व्हायची एवढी का घाई झालीय?' मी चपापलो. म्हटलो, 'नाही साहेब, तसं नाही.' बाकीचं ऐकण्याच्या मूडमध्ये नसलेले कांबळेसाहेब पुढं म्हणाले, 'अहो, तुमचं एकटं घंटागाडी प्रकरणच एक मोठी कादंबरी आहे. तुम्ही एवढं आटोपतं कशासाठी घेताय? हा उद्याचा मोठा दस्ताऐवज आहे. जरा बारकाईनं, सांभाळून, जबाबदारीनं आणखी लिहा.' खूप धीर करून म्हणालो, 'साहेब, फार अवघड जाईल. बरचंसं आठवत नाही. स्वतःचाच चेहरा पाहायची भीती वाटायला लागली. गेली पाच-सात वर्षे नाशिकमध्ये असूनही चेहरा लपवून फिरतोय.' हे सांगत असताना डोळ्यांनी त्यांचं काम केलेलं होतं. डोळे पुसत म्हणालो, 'नाही पुढं नाही जायचं! इथंच थांबायचं! तुम्ही उभारी देऊ पाहताय; पण नाही जमणार!' पण ऐकलं आणि थांबले, खोटी प्रशंसा केली ते कसले उत्तम कांबळे? अजिबात भावनिक

झाले नाहीत. पुढंच सरकले, 'घंटागाडी राहू द्या, तुमचं आयुष्य लिहा. कुठूनही, कसंही, वाटेल तिथून सुरवात करा. पण, आता तुम्हाला थांबता येणार नाही. तुम्हाला ते करावेच लागेल. आता तुम्ही म्हणताय म्हणून मी चार नाही, चाळीस पानं लिहील; पण मला फार चीड येईल.'

आतापर्यंत चहा आला होता. कॅलेंडरकडे पाहत कांबळेसाहेबांनी वीस दिवसांची मुदत दिली आणि आहे तसे कागद परत केले... पुढला शब्दप्रवास करण्यासाठी!

दि. १०-१०-२०१२.

# *कार्यकर्त्यांच्या लढण्याने समृद्ध झालेलं वाडगं*

तसं माझ्या आणि मनोहरच्या भेटीत खूप अंतर पडायचं... कारणं काही असोत; पण अंतर पडायचं...

जेव्हा केव्हा मनोहर भेटायचा, तेव्हा तो अस्वस्थ झाडासारखाच...

त्याच्या मनात आणि त्याच्या पर्यावरणात प्रचंड घडामोडी सुरू असायच्या...

आज काय तर झोपडपट्टीतला मोर्चा.

आज काय तर मुलांसाठी वाचनालय.

पोलिसांत हजेरी.

एकलव्य पुरस्कारासाठी प्रयत्न.

दारूबंदी करण्यासाठी लढण्याकरिता महिलांना पाठिंबा.

टपरीधारकांची चळवळ.

पत्रकारिता.

मुंबईत शिष्टमंडळ.

घंटागाडी कर्मचाऱ्यांचं संघटन.

असे एक ना अनेक विषय घेऊन मनोहर बोलायचा आणि बोलत असतोय... त्याच्या बोलण्यातून अनेकदा सुविचार बाहेर पडतात... सहजपणे मोर्चात द्यावयाच्या घोषणाही बाहेर पडतात... व्यवस्थेविषयीची खुन्नस बाहेर पडते. फुले-शाहू-आंबेडकरांचा विचार घेऊन आपण हे सारं बदलू शकतो, असा विश्वासही बाहेर पडतो आणि सर काय, किती हे चळवळीचे तुकडे? अशी निराशाही बाहेर पडते...

मनोहर जेव्हा केव्हा भेटायला येतो, तेव्हा अचानक येतो. कधी जमलं तर फोन करतो अन्यथा धडकतो एखाद्या मशाल-मोर्चाप्रमाणं... चळवळीची खबरबात तो सांगतो... नवं काय घडलं, जुनं काय बंद पडलं यावरही तो भरभरून बोलतो... त्याला बोलायला-सांगायला खूप आवडतं... ऐकणारे, समजून घेणारे कमी होत आहेत, हेही तितकंच खरं.

मनोहर म्हणजे प्रचंड धावणारा कार्यकर्ता... स्पीडर... गतिरोधकाची पर्वा न करता धावणारा कार्यकर्ता... एकाच वेळी अनेक आघाड्यांवर कार्यरत असणारा कार्यकर्ता म्हणून त्याला चोवीस तासांचा दिवस खूपच अपुरा पडतोय... म्हणूनही तो सारखा धावत असतोय... स्वतःचा रस्ता स्वतः मोकळा करत धावत असतोय...

एक दिवस तो धडकला असाच... चहा झाल्यानंतर डीटीपी केलेलं एक छोटंसं बाड त्यानं माझ्या हातात दिलं. मी ते मिनिटा-दोन मिनिटांत चाळलं. ते त्याचं छोटेखानी स्वकथन म्हणजे आत्मकथन किंवा अनुभवकथन होतं... मी स्वतः मनोहरच्या प्रचंड आणि अथक लढाया पाहिल्या होत्या. वेगवेगळ्या विषयांवरचे लढे पाहिले होते. वेगवेगळ्या तंबूतले लढे पाहिले होते. कमी वयात आभाळ व्यापून राहणारा मनोहर इतक्या कमी पानांत कसा काय मावेल? जीवनातल्या अनेक गोष्टी या छोटेखानी अनुभवकथनातून सरकल्या होत्या किंवा त्यानं टाळल्या तरी होत्या. या अनुभवकथनासाठी मी चार-दोन शब्द लिहावेत, अशी त्याची अपेक्षा. कार्यकर्त्यांसाठी लिहिताना मला खूप आनंद होतो. खरं तर स्वतःतला सुप्त कार्यकर्ता अशावेळी जागा झाल्यासारखा वाटतो. खूप आनंद होतो. कार्यकर्त्यांशी बोलताना, त्यांना समजून घेताना, त्यांचा त्याग समजून घेताना.

मी मनोहरला एकाच वाक्यात सांगितलं, 'तुझं जीवन अनेक आघाड्यांवर विखुरलेलं आहे. अनुभव प्रचंड आहेत. परिवर्तनासाठी चाललेल्या खूप चळवळींचा तू सक्रिय साथीदार आहेस. एवढ्या चिट्ठ्यात काहीच मावणार नाहीय. तू खूप मोठं लिही. सविस्तर लिही. मोकळंपणानं लिही. किती पाने होणार आहेत? याचा विचार न करता लिही आणि हो, तुझ्या पुस्तकाला मीच प्रस्तावना लिहिणार आहे, याची खात्री बाळग.'

मनोहर खूप बोलला. चिडला नाही... हं रडला मात्र जरूर... तो स्वतःच त्याच्या भूतकाळात शिरू लागला. लढू लागला. असे काही प्रसंग बोलायचा, की ते अश्रू घेऊन यायचे. मनोहरचं सर्वांत मोठं काम होतं ते घंटागाडी या आगळ्यावेगळ्या क्षेत्रात. स्वतःचं आयुष्य दुर्गंधीयुक्त करून समाज दुर्गंधीमुक्त करणाऱ्या कार्यकर्त्यांच्या क्षेत्रात तो काम करीत होता. महापालिकेचा खासगीकरणाचा एक भाग म्हणजे घंटागाडी होती. नाशिकमध्ये ती तशी उशिरा आली; पण येताना नव्या शतकातले नवे गुलाम घेऊन आली. या गुलामांच्या नोंदी कोणाच्याच सात-बारावर नव्हत्या. डुकराप्रमाणं घाणीत जगणारं एक नवं जग आलं होतं... या जगाला कशाचीही खात्री नव्हती... अगदी जगण्याचीही खात्री नव्हती... आपण कुणासाठी काम करतोय आणि आपलं भविष्य काय? हेही या जगाला ठाऊक नव्हतं... किंबहुना ठाऊक होऊ दिलं नव्हतं... अनेक महानगरांत अशी जगं जन्माला आली आहेत नरकयातना घेऊन... आपल्या दारातला कचरा उचलताना ते दिसतात... कचऱ्यात एखादा उपयुक्त तुकडा दिसला की त्यांच्या चेहऱ्यावर चंद्र उगवतो अन्यथा अमावास्येची पिलावळच पसरलेली असते आयुष्यभर... दुर्गंधीयुक्त किडे नाका-तोंडात जाताना त्याचं काय होत असेल... त्यांच्या त्वचेला चोहोबाजूंनी रोगांनी घेरलेलं असताना काय होत असंल? याचा विचार स्वतःचा कचरा घंटागाडीत टाकणारे आणि गाडी यायला थोडा जरी विलंब झाला, की पांढरपेशी शिव्या देणारे कधी करत नसतात.

असा विचार करायला मनोहर पुढं आला होता. आणखी काही जणही पुढं आलं होते. पण, छोटेखानी अनुभवकथनात हाही विषय नेटानं मांडलेला नव्हता. मी पुन्हा नाराज झालो आणि म्हणालो, 'बाबा मनोहर, हे सगळं तुझं बाड घेऊन जा आणि निवांतपणे ये... भरपूर लिहून ये...'

मनोहरनं ते ऐकलं आणि तो गायब झाला. पुन्हा खूप दिवसांनी उगवला तो 'काझीचं वाडगं' घेऊन... त्याला जे काही लिहायचं होतं ते त्यानं लिहिलेलं होतं. हे खरं आहे; पण जे काही मला अजून अपेक्षित होतं ते त्यानं लिहिलेलं नाही, हेही तितकंच खरं आहे. खरं तर आत्मकथनाच्या बाबतीत हे कमी अधिक प्रमाणात घडतच असतं. लेखकाला जेवढं आणि जे सांगायचं तेवढंच सांगून तो मोकळा होतो. पण, जे सांगितलं नाही ते का सांगितलं नाही आणि न सांगितलेलं काय असेल? हा प्रश्न उरतोय. असे प्रश्न मनोहरच्या बाबतीत शिल्लक राहतातच, हे गृहित धरून वाडग्याकडं म्हणजेच काझीच्या वाडग्याकडं पाहावं लागलं.

'काझीचं वाडगं' म्हणजे भिन्न भिन्न प्रकारच्या जातीतून, संस्कृतीतून आलेल्या आणि भाकरीची शिकार करीत एकत्र राहणाऱ्या समूहाचा विशिष्ट भूगोल म्हणजे हे वाडगे. जगण्यासाठी प्रत्येकाचा मार्ग वेगळा, संस्कृती वेगळी, ताणे-बाणे वेगळे, एक दुसऱ्यापासून वेगळा; पण जगण्याच्या एका तीव्र धाग्याने या सर्वांना एकत्र आणलेले. जगण्यासाठी कोण घामाची पूजा बांधतोय, कोण आडवळणानं चालायचा प्रयत्न करतोय. कोण दादा म्हणून मिरवतोय; तर कुणी आणखी कशाच्या तरी भूमिकेत जातोय. कॅक्टस्नं भरलेलं जग वाटावं अशी सारी परिस्थिती. पण, कॅक्टस्लाही सुंदर फळे येतात. त्यापैकी एक फूल म्हणजे मनोहर. वाडग्यात जगणं, जन्माला येणं तसं खूपच सोपं आहे; पण वाडग्यातून बाहेर पडून नव्या जगाचं स्वप्न पाहणं आणि स्वप्न पूर्ण करणं कठीण असतं. मनोहर वाडग्याशी नाळ कायम ठेवून वाडग्यातून बाहेर पडतो. नव्या पटावर खेळू लागतो. शिकून, विचार करून, लढून आणि संघटना बांधून स्वतःच्या आणि भोवतालच्या जगाला वेगळा आकार देण्याचा प्रयत्न करतो. रात्रंदिन फक्त लढत राहावं लागतं आणि एक जखम सुकण्यापूर्वी दुसऱ्या जखमेला सामोरं जावं लागतं. मी स्वतः त्याच्या अनेक लढाया पाहिल्या आहेत. वस्तीत जाऊन त्याच्या आणि त्याची कार्यकर्ती पत्नी असलेल्या अनिताच्या डोळ्यांतील जग बदलणारी स्वप्नं पाहिली आहेत.

'काझीचं वाडगं' म्हणजे एका धडपडणाऱ्या कार्यकर्त्यांची चित्तर कथा आहे. आंबेडकरी चळवळीत जे जे लढत राहिले, लढाईची पोस्टर चिकटवत राहिले, ते लिहीतही राहिले. मनोहर याच श्रेणीतला आहे. तो अगोदर लढला आणि लिहायला बसला. तो समाजवादी चळवळीत लढला. झोपडीवासीयांसाठी लढला. अंधारात चाचपडणाऱ्यांना उजेडात

आणण्यासाठी लढला. स्वतःचं आयुष्य स्थिरस्थावर करण्यासाठी लढला. शैक्षणिक, सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक, वर्गीय अशी अनेक कारणं त्याच्या लढाईत होती, आहेत. प्रचंड अनुभव असल्याने मनोहरचं वाडगं विस्तारत जातं, असंख्य अनुभव देत जातं. वाडग्यातील आणि बाहेरील माणसाच्या मनातील विचार, विकार आदींचं सहज दर्शन घडवतही जातं. बहुपेडी आत्मकथन असल्यानं हे दलित आत्मकथनाचा परिघ रुंदावत जातं. वर्ण, वर्ग, शहर, महानगर, राजकारण, कामगार संघटना असे कितीतरी पदर या आत्मकथनाला असल्यानं स्वाभाविकच ते वाचनीय आणि चिंतनीयही ठरतं. सुरवातीला म्हटल्याप्रमाणं मनोहरच्या गतिमान जीवनाचा परिणाम आत्मकथनावरही पडलेला दिसतो. लेखनही प्रचंड गतिमान आहे. त्यात नाट्य आहे, विचार आहे, उत्सुकता आहे आणि विशेष म्हणजे जग नेमकं कुठं पोहोचलं आहे, जगण्याच्या आणि माणुसकी मिळविण्यासाठीच्या लढाया किती तीव्र होत आहेत, याचे एक सम्यक दर्शनही पाहायला मिळते. वेटर, शिपाई, कारकून, जनसंपर्क अधिकारी, पत्रकार, संघटना नेता, संघटक अशा प्रचंड भूमिका मनोहरनं केल्या आहेत. प्रत्येक भूमिकेसाठी त्याची एक स्वतंत्र लढाई आहे. या सर्व भूमिका पार पाडताना पती, वडील, कुटुंबप्रमुख या भूमिकांकडे त्याचं सातत्यानं दुर्लक्ष होत राहतं. त्याविषयी त्यानं अनेकदा न बोलता दुःख व्यक्त केलं आहे. ज्याच्या जीवनाचे पूर्ण सामाजिकीकरण होतं, त्याच्या वाट्याला असंच येतं. घर की मशीद, घर की रस्ता, कुटुंब की समाज अशा पेचात सच्चा कार्यकर्ता नेहमी दुसऱ्या बाजूने उभा राहतो. मनोहरचं तसंच आहे. त्यानं घर किती सांभाळलं माहीत नाही; पण घरानं त्याला सांभाळलं, हे तो निःसंकोचपणे लिहितो.

शेवटी जागतिकीकरणाच्या काळात रस्त्यावर लढणाऱ्या चळवळी संकोचताहेत. कार्यकर्त्यांचा संकोच होतो आहे. भांडवलशाही आणि तिची अपत्ये बनलेल्या एनजीओंसारख्या काही संस्था, चळवळी मरताहेत. चळवळीतल्या फुटीही असे काम करताहेत. अशा स्थितीत कधी स्वतः चळवळ बनलेल्या, कधी महाचळवळ उभ्या करणाऱ्या, कधी 'वन मॅन आर्मी' होणाऱ्या मनोहरचं भावविश्व आणि बाह्यविश्व काझीच्या वाडग्याच्या निमित्तानं प्रकाशित होत आहे, याचा मला आनंद होतो. नव्या काळातला कार्यकर्ता, नवनव्या चळवळीतला कार्यकर्ता आणि प्रतिकूल परिस्थितीत लढणारा कार्यकर्ता समजून घेण्यासाठी आणि 'एन्ड ऑफ आयडॉलॉजी'चा घोष सुरू असलेल्या काळातील चळवळी समजून घेण्यासाठी वाडगं उपयोगी पडेल, असा मला विश्वास वाटतो.

**– उत्तम कांबळे**

**पूर्वाध्यक्ष, अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन (ठाणे)**

# १

काझीचं वाडगं : नागसेनवाडी- नागसेननगर असा नामांतराचा प्रवास झालेल्या झोपडपट्टीत आम्ही पैदा झालो, वाढलो. नाशिक-पुणे महामार्गावर असल्याने तसेच भारताचा सर्वांत मोठा महामार्ग असलेल्या मुंबई-आग्रा रोडवर वसलेली ही वस्ती. पाहिले नाही; परंतु बुजुर्गांकडून ऐकलेल्या माहितीवरून बुधाभाऊ मोरे नावाच्या एका मातंग (तेव्हाचा मांग) कार्यकर्त्याने या वस्तीसाठी तेव्हाच्या नगरपालिकेशी झगडा केला आणि ही वस्ती स्थिरावली.

मांगा-महारांची वस्ती म्हणून वाडगं, वाडा नाही आणि इंग्रजांच्या दिमतीला असलेल्या काझींना बिदागी म्हणून दिलेली ही जागा म्हणून काझीचं वाडगं. लहानपणी एक काझीबाबा पांढरा शुभ्र पाजयमा, झब्बा आणि काळी टोपी, काळा चष्मा, उंची साधारणपणे साडेसहा फूट, दरमहा चार आणे वसुलीसाठी यायचा. आठवतंय त्याप्रमाणे सत्तर-ऐंशी घरांपैकी वीस-पंचवीसच त्याला भीक घालायचे. एकदा एका बाईशी काझी काहीतरी आडवं तिडवं बोलला. पुढच्या फेरीच्या वेळी त्या बाईने पैसे देण्याऐवजी

घरातला कुत्रा अंगावर सोडला. म्हातारा काझीबाबा पळूही शकत नव्हता. आसपासच्या लोकांनी सोडवलं; पण तोपर्यंत पायजमाच्या बटा निघाल्या होत्या. त्यानंतर काझीबाबा कधीही दिसला नाही. असं हे काझीचं वाडगं. पलीकडे येसकरवाडा, महारवाडा, मोठा राजवाडा असा प्रवास करणारी; परंतु आर्थिकदृष्ट्या जरा सक्षम आणि पक्की घरे असलेली वस्ती. परंतु, 'जयभीम'पेक्षा तिरस्काराच्या आणि बेगडी शहाणपणाच्या गप्पाच येथे अधिक ऐकायला मिळायच्या. अनेकदा तर 'काझीचं वाडगं अन् मुतायचं गाडगं...' अशीच शिवी अधिक ऐकायला मिळायची. मन लहानपणी खजील व्हायचं. पण, तेव्हाच्या वस्तीत शिकणाऱ्या पँथर्सनी नागसेन या महान बौद्ध भिक्खूचं नाव दिलं अन् शहाण्यांचे दात त्यांच्या घशात घातले. आई सांगते त्याप्रमाणे या वस्तीत वसलेलं आमचं पाचवं घर, १९३५ चं. याचा अर्थ आमच्या सर्व भावंडांचा जन्म याच वस्तीतला, वाडग्यातला.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पुतळ्याच्या साक्षीने आणि साथीने अनेक वस्त्यांना कवचकुंडल्यांप्रमाणे जपलं. आमची वस्तीही त्यास अपवाद राहिली नाही. वेगळेपणा मात्र एक होता, विटंबनेचा निषेध करण्यासाठी पहिला दगड फेकला जायचा तो वडाळा नाक्यावर, अर्थातच नागसेनवाडीच्या वाडग्यातून. याच वस्तीत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा घराघरापर्यंत पोहोचविणारा आवाज होता. ज्याने महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात एक प्रकारचा आंबेडकरी यल्गार पुकारला होता. उभ्या महाराष्ट्राला माहीत असलेलं नाव... लोककवी, कविवर्य वामन तबाजी तथा वामनदादा कर्डक...!

नागसेनवाडीचे प्रवेशद्वार म्हणजे वामनदादांचं घर. वामनदादा... 'पिकतं तिथं विकत नाही' अशी अवस्था असलेला हा काव्यमय शब्दसम्राट आमच्या नाशिकला संपूर्ण कधीच कळाला नाही. यावर पुढे वाचू! नागसेननगराची रचनाच न्यारी होती. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पुतळ्यानं अधिक घट्ट झालेली वस्ती काळानुरूप बदलत गेली. जुना आग्रा रोड ते पूना रोड अशा चौकोनात ही वस्ती. कोळीवाडा, कातारआळी, मागे मुस्लिम पट्टा, शेजारी गारुडाळी (गारुडी समाजाची वस्ती) आणि फ्रंटला महार, नवबौद्ध आणि मिश्र जाती-जमातीचे. परंतु, सर्वांच्या 'जयभीम'चा आवाज मात्र सारखाच होता. तो बेंबीच्या देठापासून घातलेला असायचा.

मला आठवतंय तोपर्यंत वस्तीत लाईट नव्हती, रस्ते नव्हते, पक्की एखाद-दोन घरं असतील. रात्र झाली की रॉकेलच्या बत्त्यांच्या उजेडात पाटा रुचण्याचा आवाज एकमेकाला साद आणि साथ देत असायचा. मग जिच्याकडे धने कमी असतील तिने धने मागायचे आणि चार-पाच मिरच्या द्यायच्या. वहिनीने (माझ्या मोठ्या भावजयीने) सांगितलं, की पळत जायचं (खेळणं मध्येच थांबवून) आणि ही बार्टर इकॉनॉमी मेनटेन करायची. ऐनवेळी तिच्या ध्यानात यायचे, की तेलच नाही. मग विनवण्या करून

चार आण्याचे (पंचवीस पैसे) गोड्याचे तेल माणिकशेठच्या दुकानातून पळत जाऊन आणायचे. अनेकदा (अंबाबाई- माणिकशेठची बायकोच असायची दुकानावर अन् बॅक ग्राऊंडला माणिकशेठचा तर्रर झालेला आवाज) इथेही इकॉनॉमिकल सायकल मेनटेन झालेली असायची. वहिनीनं पाच पैसे अधिक दिलेले असायचे. अर्थात, शिव्या बोनसमध्ये. ही माझ्याच नाही तर वस्तीतल्या प्रत्येक घर घर की कहाणी होती. आमचं उदाहरण सँपल म्हणून लिहिलं.

चंद्राचा उजेड आणि त्याची भ्रमंती हेच वस्तीचं घड्याळ. अंधार इतका की डोळ्यांत बोट घातलं तरी समजायचं नाही. पण, कम्युनिकेशन नेटवर्क मात्र स्ट्राँग, कधी रेंज जायची नाही. आमचा पापडवाला म्हणजे ग्रेटच. एवढ्या अंधारात तो आपली मुगाच्या तळलेल्या पापडांची कटोरी (काड्याची पाटी) पाठीवर घेऊन न चुकता घुसायचा आणि पुन्हा एकच आवाज द्यायचा... है... पापड्डवाला... बस्स! प्रतिउत्तरात दोन-तीन आरोळ्या यायच्या, गिऱ्हाईकांच्या! आमचा हा पापडवाला मामू क्रमशः त्या दारात, ओट्यावर, ओसरीवर जायचा अन् त्याच घराच्या उजेडात पैसे मोजून पापड द्यायचा. कधीही त्याचा हिशेब चुकला नाही. वस्तीची प्रगती झाली. म्युनिसिपाल्टीचे दिवे लागले अन् आमचा अंधारातला पापडवाला मामू नाहीसा झाला. कितीही आठवलं तरी चेहरा आठवत नाही. कारण तो अंधारातच उभा असायचा. आता त्याच पापडाची चव घेण्यासाठी वाटतं, वस्तीत जावं, मनपाला सांगून सर्व लाईटस् घालवावेत, किर्रर अंधार करावा आणि आवाज द्यावा... ‘है... पापडवाला...‘ पण भीती वाटते... पापडवाला मामू आला नाही तर..?

# २

काझीचं वाडगं अर्थात सध्याचं नागसेननगर वस्ती म्हणजे आताच्या पिढीसाठी अपेक्षित प्रश्नसंच असेच म्हणावे लागेल. कारण, बरीचशी माणसं पडद्याआड, वस्तीबाहेर (माझ्यासकट) गेली आहेत. म्हणून विश्वास ठेवणं एवढंच हाती आहे.

दारूचं व्यसन आणि तेही गावठी हे ब्राह्मणाच्या सांगण्याप्रमाणे म्हाराच्या पाचवीलाच पूजलेलं असावं. कारण तेव्हा गावठीशिवाय दारू नावाचा प्रकार असतो, हेही कळत नव्हतं. आमच्या वस्तीत बादशहा नावाच्या मुसलमान माणसाने दारूचा गुत्ता चालविल्याचं डोळ्याने पाहिलंय. आताचे बिअर बार झक मारतील असा थाट. लाकडी बाकडे जमिनीत ठोकलेले. समोरचे बाकही (टेबल्स) फिक्स केलेले. (कारण स्पष्ट आहे, एखाद्या अर्ध्या तासाने पिणारा झोकांड्या खाण्याची गॅरंटी नक्की असते म्हणून बाकडे तरी पक्के असावेत, असं बादशहाचं धोरण असावं म्हणून फिक्स केलेले. शेजारीच उकडलेले चणे, त्यावर पेरलेल्या हिरव्या मिरच्या, लिंबाच्या चिरा, टोमॅटोच्या पाकळ्या आणि मीठ-मिरचीच्या वाट्या असं दुकान थाटणारी मावशी. तिच्या शेजारी फक्त उकडलेल्या

अंड्यांचं पातेलं घेऊन बसलेली दुसरी मावशी. आणि तिच्या शेजारी भाजलेले व तळलेले सुके बोंबिल, ज्यावर लाल तिखट-मिठाचे शिडकावे, असं दुकान मांडलेली तिसरी मावशी. अशा आलिशान दरबारात वस्तीच्या कर्त्या पुरुषांचे सूरपान आरामात व्हायचे. महिन्यात एकदा-दोनदा पोलिसांची धाड पडायची; पण दोन दिवसांनंतर पुन्हा चित्र 'जैसे थे'च. काहीतरी सेटिंग नक्कीच असेल. असो!

एकदा एका हवालदाराने माझ्या मोठ्या भावाला दारूचा गुत्ता विचारला. त्याने पत्ता सांगितला. कारण हवालदार (पोलिस) साध्या वेशात होता. त्याला दरबार माहीत होता. म्हणून त्याने दुसरा विचारला. भावाने चार आणे मागितले. त्याने दिले. अर्ध्या तासात बादशाहचे गुदाम (दारूचे) रिकामे झाले. वस्ती पोलिसांची रेड म्हणून 'बरे झाले बाई...' म्हणत पाहत राहिली. माझा भाऊ पोलिसाला विसरलाही होता. सर्व कसं सुखेनैव झाले. याच बादशाहला एकदा आमच्या मित्रमंडळाने डॉ. आंबेडकर जयंतीनिमित्त ब्लॅक ॲण्ड व्हाईट टी.व्ही. संच मागितला. बादशाहने होकार भरला; पण पैसे उद्या बँकेतून काढून देतो असे म्हटला. दुसऱ्या दिवशी बादशाह सकाळपासून तर्राट... बँकेत नेले. मागणीच्या स्लीपवर सही वाकडी तिकडी... मॅनेजरने नाकारले. मंडळाने विनवणी केली. पण, साहेब कडक होता. सही मिळाली तरच पैसे देईन म्हणाला. झाले. बादशाहला पुतळ्याच्या आवारात आणले. आण लिंबू-पाणी, कर मिश्रण, पाज, घे सही असा प्रकार दीड तास सुरू होता. दरम्यान, पोटात भरलेला साठा रिकामा करण्यासाठी बादशाहला गल्लीच्या कोपऱ्यावर तैनात दोन कार्यकर्ते शिव्या हासडत उभेच! नजर घड्याळ्याच्या काट्यावर. बँकेच्या बंद होण्याच्या वेळेवर. अखेर सही टॅली झाली. पैसे बँकेतून निघाले. थकलेल्या कार्यकर्त्यांनी बादशाहला आता लिंबूपाण्याऐवजी आख्खी क्वार्टर पाजली आणि झोपवला. दुसऱ्या दिवशी टी.व्ही. संच पुतळ्याच्या आवारात लागला.

आता बादशाहने एक जुनी ऑटोरिक्षा घेतलीय. वडाळा नाका ते वडाळा गाव पट्ट्यावर आठ-दहा रुपये सीटप्रमाणे सीट भरतोय. इंधन खर्च वजा जाता उरलेल्या पैशांतून आजही गावठीची एक क्वार्टर ढोसतोय. दुसऱ्या दिवसाच्या सकाळची वाट पाहत डोळे मिटून पडतोय.

बादशाहसारख्या अनेक कार्यकर्त्यांनी आमच्या वस्तीचं न्यारंपण जपलं, खुलविलं; पण निर्व्याजपणे. कधीही 'मी' नावाचा स्पर्श सर्व व्यवहारात नसायचा. 'मी'पेक्षा आमचं शब्दाला महत्त्व होतं. त्याचं पावित्र्यही जपलं जात असे.

असाच एक इतिहासकार म्हणजे आमचा दिन्या अर्थात दिनकर. सकाळपासून दारू पिणं आणि पुतळ्याजवळ विड्या फुकत गप्पा मारणं हा त्याचा धंदा. बहुतेक हमाली वगैरे करीत असावा. दिसला नाही; पण दारूपुरते पैसे मात्र कमवायचा. कमी पडले तर काम

करणाऱ्या बायकोने पुरवठा करायचा. दिन्यानं वस्तीत कधी कुणाशी पंगा घेतल्याचं दिसलं नाही. मात्र, पोलिसांसोबत भांडण्यात त्याला असूरी आनंद मिळायचा. म्हणूनही वस्ती तो बेवडा असून बिचकून असायची. एकदा दिन्याने नशेत असतानाही दोन पोलिसांची चौकातच धुलाई केली. झाले. वस्तीची हवा टाईट... पोलिसाला मारलं म्हणजे वस्तीची धुलाई होणार आणि नको ते भद्रकालीतील (पोलिस ठाण्यात) जमा होणार. मोडलेल्या काठ्या घेऊन पोलिस दिन्याच्या दारात त्याला जमा करण्यासाठी उभे. किमान शंभर बाया बापडे, पोरं तमाशा पाहायला रिंगण घालून उभे. दिन्या आरामात खोलीच्या कुडाला टेकून विडीचा धूर सोडत बसलेला.

दारात पोलिस, दिन्या, दिनकर बाहेर ये म्हणत विनवणी करीत असताना पाहिले. पाहत आणि ऐकत होतो मात्र उलटंच! दोन्ही पोलिसांना वकील दिन्या आव्हान देत होता. तुम्ही उंबऱ्याच्या आत याच, रॉबरीची केसच दाखल करतो असं म्हणत पुस्तक समोर नसताना भा.दं.वि.ची कलमं बडबडत होता. आम्हाला नाही; पण पोलिसांना कळत होतं. असा तमाशा अर्धा तास मनोरंजन करीत होता. पोलिसांना वेटिंग आणि वेठीस धरणारा नागसेननगरचा सुपुत्र आख्खी वस्ती हसत डोळे भरून पाहत होती. अखेर पी.एस.आय. गायकवाड सात-आठ पोलिसांच्या ताफ्यात तैनात होऊन आले. घरात घुसले. दहा-पंधरा लाठ्यांचा मारा केला आणि दिन्या बाहेर काढला. अहो साहेब, माझं ऐकून तर घ्या, हे एक वाक्यही ऐकायला पोलिस तयार नव्हते. पोलिसांना ओढाताण करण्याची गरज भासली नाही. ताठ मानेने चालतच दिन्या पुतळ्याजवळ आला. साहेब डाफरले, गाडीस बस... दिन्या थेट साहेबांच्या पुढच्या सीटवर बसला. एक झटक्यात कानफडात बसली. एका शिवीसह जीपच्या मागच्या भागात दोन सीटांच्या मध्ये दिन्या आडवा झोपवला आणि पोलिसांनी सीट काबीज करून दिन्याचा फुटरेस्टसारखा वापर केला. गाडी रवाना झाली. वस्तीला गॅरंटी होती. सायंकाळी दिनकरराव पुतळ्याजवळ असतील. दिन्याने वस्तीचा हा विश्वास कधीही तुटू दिला नाही. अर्थात, बायकोच्या भक्कम पाठिंब्यावरच!

कोर्टाच्या केसला हजर होण्यासाठी दिन्या जाणार म्हणजे सी.एम.बरोबर मीटिंग आहे अशा आवेशातच. आंघोळपाणी करून, चपचपीत केस विंचरून पुतळ्याजवळ बायकोकडं बिडी बंडलसाठी पैसे मागण्याची घाई करणार, 'ये काढ लवकर, तो जज काय माझा बाप नाही वाट पाहायला.' दिन्याला जामीन मिळवून देणारा वकील नक्कीच धन्य होत असेल!

एके दिवशी सकाळी डोळे चोळत चहासाठी साखर आणायला माणिकशेठच्या दुकानावर गेलो. पुतळ्याजवळ पोरं टोरं उभी म्हणून डोकावलो. आमचा दिन्या आंघोळ

करून चपाट भांग पाडून स्वच्छ पायजमा आणि शर्ट घालून, एक पोतं अंथरूण विडी फुकत पुतळ्याच्या अग्रभागी मांडी घालून बसलेला. आता हा काय तमाशा? म्हणून माहिती घेतली. दिन्याने जमावाच्या भावना लक्षात घेऊन जनतेला संबोधित केले. 'आजपासून दारू सोडणार अन् तीही बाबासाहेबांच्या साक्षीनं! इथं बसलो नाही तर कंट्रोल राहणार नाही.' जमावाला आनंद झाला. दुपारपर्यंत बाया बापडे दिन्याला आशीर्वाद, धन्यवाद देऊन गेले. एका उत्साही कार्यकर्त्याने एक रुपयाचा हारही गळ्यात घातला. दिनकरराव खूश! ऊन उतरलं, सायंकाळ झाली. शांतपणे दिन्या उठला. विडी बंडल खिशात टाकलं. पोतं झटकलं. बाबासाहेबांच्या पाया पडला. पोत्याची गुंडाळी करून बगलेत घातली. जमावाने विचारले, दिन्या काय रे! विडीचा मोठा झुरका मारत वैतागून उद्गारला, 'काय म्हणजे? दिवसभर एवढा कंट्रोल केला. 'हे काय कमी झालं? चाल दोन रुपये काढ एक मग्ग्याचे...' दोन रुपये देणाऱ्याने विचारले, 'अरे पण तू तर बाबासाहेबांची शपथ घेऊन दारू सोडली ना?' ज्याने दोन रुपये दिले. दिन्या त्याच्यावर डाफरला, 'एका दिवसात तुझ्या बापाने दारू सोडली का कधी?'

# ३

खरं तर नागसेनवाडी किंवा नागसेननगर या विषयावर लिहिण्यापेक्षा जर एखाद्या चित्रपट निर्मात्याने कॅमेरा स्थिर करून चित्रण केलं असतं तर नक्कीच १० ऑस्कर अवॉर्ड मिळाले असते. दारिद्र्याचं इतकं देखणं चित्र कल्पनेपेक्षाही वास्तववादी होतं. बुधवार म्हटला, की आमच्यापैकी बऱ्याच लोकांना मसाला (कच्चा) आयताच मिळायचा. नगरपालिकेनं बांधलेल्या कच्च्या रस्त्यावरून वडाळागाव आणि नदी किनारीच्या (नासर्डी) आसपासचे आदिवासी जोडपी घष्टी घेऊन तर्रर्र झालेले असायचे. तेवढ्या लहाणपणीही त्यांच्यामधील स्त्री-पुरुष समानता मनाला लोभसवाणी वाटायची. कारण दोघंही एकाच मग्ग्यामधून (ॲल्युमिनिअमचा जग) ढोसलेले असायचे. हप्ताभर मरेस्तोवर केलेल्या कामाचे दाम बुधवारी मिळायचे. मग हप्ताभराचा बस्ता (बाजारहाट) कापडी पिशव्यांच्या बाचक्यात भरून स्वारी घराकडे निघायची. बाचके अलगत डोक्यावर ठेवलेले असायचे. रस्त्यावर पथदीप अर्थातच स्ट्रीट लाईट नसल्याने नेहमीच्या पायवाटेने ही मंडळी घराकडे निघायची. माझा तीन नंबरचा भाऊ आणि त्याची मित्रमंडळी रेणुकानगरचा

कठडा (भिंत) आणि दुसऱ्या बाजूला वामनदादांच्या घराच्या भिंतीला लागून उंचवटा तयार करायची. काळ्या रंगाचा दोरा दोन बाजूला ताणून धरायची. गाठोडी नजीक येताच एका रेषेत दोरा खाली यायचा. बरोबर पिशवीच्या मध्यावर अडकायचा आणि पिशवी खाली पडायची. झाले. उदार (?) कार्यकर्ते मदतीला धावायचे, पिशवी भरून द्यायचे, आणि पोशापोशीला (आदिवासींमध्ये पुरुषाला पोशा अन् स्त्रीला पोशी अशीच हाक मारायचे तेव्हा) रवाना करायचे. अर्थात् अर्ध्या पुड्या गायब करूनच! अशी आठ-दहा गिऱ्हाईके झाल्यावर प्रत्येकाच्या वाट्याला दहा-बारा पुड्या नक्की यायच्या. माझा भाऊ त्या पुड्या आणून वहिनीसमोर ठेवायचा. हे काय आणलं मुडद्या? हा नेहमीचा डायलॉग झाल्यावर त्याला पोटभर जेवण मिळायचं आणि आठवडाभर केलेल्या कामचुकारपणाची माफीही!

पूर्वी पुतळ्याची कंपाऊंड वॉल आणि वहिवाटीचा रस्ता यात बरेच अंतर होते. अगदी क्रिकेट खेळण्याइतके. एकदा अशीच मॅच रंगात आली. मध्येच ब्रेक घ्यावा लागला. एक प्रेतयात्रा जात होती. पंचवीस-तीस बाया बापे, पुढे एकच डफवाला भजनं म्हणत चालला होता. लाह्या-कुरमुरे उधळत आदिवासी मंडळी म्हातारीची बॉडी अमरधाममध्ये घेऊन जात होती. रस्त्याच्या मधोमध येताच अचानक तिरडी निसटली, कामट्या दोन भागांत विखुरल्या गेल्या आणि म्हातारीचं मढं पायऱ्या उतराव्यात अशा शांतपणे रस्त्यावर पडून विसावलं. झालं! प्रेतयात्रेत सामील बायकांनी जागीच प्रेताभोवती जमून आक्रोश सुरू केला. अरे म्हातारी जिवंत आहे. आम्ही पोरांनी मात्र म्हातारी उठली या आवईने खेळाचं साहित्य म्हातारीसारखंच जागेवर सोडून वस्तीत धूम ठोकली. ते प्रेत पुन्हा तिरडी बांधून रवाना झाल्यावरच परतलो. त्यानंतर अनेक दिवस आमच्यातला एकही बहाद्दर त्या ठिकाणी चेंडू पकडायला थांबायचा नाही.

एके दिवशी पोरांना घाबरविण्यासाठी मोठ्या पोत्यात (बारदानात) घुसलो आणि अक्राळविक्राळ आवाज करीत फिरू लागलो. पोरंपण थोडीशी भ्यायली, काही घाबरायचं नाटक करू लागली. मला बाहेरचं काहीच दिसत नव्हतं; पण अंदाजाने खेळ बरोबर चालला होता. असाच पुढे गेलो आणि दानकन् चौकातल्या डबलबारवर (व्यायामासाठी जमिनीत उभे केलेले लोखंडी खांब) आदळलो. साहजिकच डोक्याला फटका बसल्याने पोतं जागीच आडवं झालं. जोराने बोंबलायला लागलो. एवढ्यात एका बाईचा आवाज आला, 'ये गीते, हा तुझा मन्या पाह्य, पोत्यात अडकला.' कामावरून थकून भागून परत येणाऱ्या माझ्या गीताईने डोक्यावर असलेला झाडू घेतला आणि पोतं अर्थात मला धोपटायला सुरवात केली. बाया मध्ये पडल्या तेव्हा कुठं सुटका झाली.

आमच्या घरापासून म्हणजे वस्तीपासून नासर्डी नदीकडचा रस्ता छान होता. मध्ये

चंद्राईचा मळा आणि पुढे दोन्ही बाजूंना मळेच मळे, हिरवेगार. झाडेही दाट असल्याने ऐंशी टक्के भाग सावलीने झाकलेला. मळ्यात कुठल्याही प्रकारचे प्राणी विशेषतः मनुष्य घुसू नये म्हणून सर्व मळ्यावाल्यांनी काटेरी झुडपं उदा. बाभूळ, चिलाटी, कोरफड आदींसारखी झाडे कंपाऊंड म्हणून लावलेली. एकदा सायकल-सायकल खेळताना आमचा एक मित्र सोबतीनं स्वतंत्र सायकल घेऊन आला. (तेव्हा तासावर भाड्याने सायकली मिळायच्या. तो एक चांगला व्यवसाय होता.) हा अर्जुन ज्याला आख्खी वस्ती लाळ्या म्हणायची. कारण कधीही पाहा, लाळ गळत असायची. शर्टची बाही (अस्तनी) नेहमी ओली म्हणून लाळ्या. लाळ्याने सायकल चालविण्यास सुरवात केली. अगोदर एक हात, मग दुसरा मोकळा करीत पायंडल मारत होता. आम्हीही सायकलवरून पुढे-मागे चालत होतो. आता लाळ्या ओरडला, 'मी डोळे झाकून चालवितो.' त्याने डोळे झाकले. पंधरा-वीस फूट सायकल सुरळीत गेली. आम्हीही टाळ्या वाजविल्या. लाळ्याला चेव आला, स्पीड वाढविला, त्या नादात सायकलची दिशा तिरपी झाली आणि लाळ्या सायकलीसह काटेरी चिलाटीत घुसला. अगोदरही बोंबलत होता. आताही बोंबलतच होता. बोंबलता-बोंबलता आमच्या आई-बहिणीचा उद्धार करीत मदतीची याचना करीत होता. कसातरी बाहेर काढला. अंगात कुठे काटे नव्हते, अजूनही आठवत नाही. कपडे फाटलेला, काही ठिकाणी ओरखडे, तर काही ठिकाणी रक्त अशा अवस्थेत लाळ्याची मिरवणूक वस्तीत आली. नियमाप्रमाणे लाळ्याच्या आईनेही आम्हा साऱ्या दोस्तांना दोषी ठरविले. घरच्यांचे फटके अन् त्यापुढे सायकल न देण्याची सायकलवाल्यांची शपथ हीच बिदागी आम्हाला लाळ्याला दिलेल्या टाळ्यांची मिळाली. अजूनही खरी कहाणी कुणालाच माहीत नाही. खरं सांगावं आणि लाळ्यानेही मान्य केलं तरी आता चिलाटीच शिल्लक कुठंय?

क्रिकेट आणि ट्रान्झिस्टर रेडिओचं नातंच काही अनोखं! रेंजची धरपकड करीत कॉमेंट्री ऐकताना एकाच रेडिओला अनेक कान चिकटलेले असायचे. गावसकरने चेंडू फटकारलेला असायचा आणि रेडिओ कुर्रर्र करायचा. जोपर्यंत समालोचकाचा पुन्हा आवाज क्लिअर ऐकू यायचा नाही, तोपर्यंत अनेक तर्क-वितर्क लढविले जात. चौकार, षटकार, आऊटपर्यंत सर्व. कधी-कधी भांडणंदेखील व्हायची; पण अखेर गावसकर पिचवर आहे, हे ऐकल्यानंतर मात्र सर्व संपलेलं असायचं. एस. टी. बस कंडक्टर असलेल्या आमच्या फरताळेमामाच्या रेडिओचा आवाज जरा मोठा होता. म्हणजे दोन फुटांवर ठेवूनही दहा ते पंधरा जण ऐकतील एवढा. त्यामुळे मॅचच्या दिवशी न बोलविता कोरम पुरा झालेला असायचा. अर्थात, मामालाही आवडायचे. आमचे फरताळेमामा मात्र गावसकरचे दिवानेच. भारताची बॅटिंग म्हटली अन् गावस्कर पीचवर आहे समजले, की

मामाने ड्यूटीला डबल दिलीच म्हणा! अशीच एक मॅच बहुतेक पाकिस्तानविरुद्ध असावी. शुक्रवारचा दिवस म्हणून सर्वांची धार्मिक धडधड वाढलेली होती. भारताची बॅटिंग होती. फरताळेमामीनेही चान्स घेतला, 'काहो, नाही तरी आज घर भरलेलं असेन, मी संतोषीमाता सिनेमा पाहून येऊ का?' मामानेही फार आढेवेढे घेतले नाहीत. उलटपक्षी सगळं घर रिकामं असेल याचा आनंदच झाला. मामानेही घाई केली, 'आटप लवकर अन् जा. गावसकर बॅटिंगला येईल आता.' पडत्या फळाची आज्ञा, मामी पसार!

सायंकाळी सिनेमाचा मनमुराद आनंद लुटून मैत्रिणींसोबत परतलेल्या मामीने सर्वांना टाटा बायबाय केलं अन् जय जय संतोषी माता, जय जय माँ गाणं गुणगुणत घरात प्रवेश केला. एकदम गाण्याचा आवाज थांबला. कुडाच्या भिंतीला टेकून खाकी पँट अन् बनियानवर फरताळेमामा फुल्ल तर्राट होऊन पाय पसरून बसलेला. एका कोपऱ्यात ट्रान्झिस्टर कम रेडिओ चार पाकळ्यांमध्ये शहीद झालेला. मामीच्या ध्यानात लगेच सारं काही आलं. भारत मॅच हरला म्हणून. पण, भारत काही पहिल्यांदाच हरला नव्हता. मामीने टेन्शन कमी व्हावं म्हणून सिनेमाच्या कौतुकाने डायलॉगला सुरवात केली. 'अहो, काय बायांची गर्दी त्या सिनेमाला...' वाक्य अर्धवटच राहिलं. मामा उठला, खाडकन मामीच्या कानफटात वाजली. ओरडतच मामी म्हणाली, 'अहो झालं तरी काय?' दोन तासांपासून रोखून धरलेला ज्वालामुखी मामाने ओकला, 'तुझ्या आयची... इथं गावसकर झीरोवर आऊट झाला, इंडियापण हरली. आज शुक्रवार होता त्यांचा (पाकिस्तानचा) दिवस होता, तरी इंडियाने रिस्क घेतली अन् तू इकडं संतोषीमातेला भेटायला गेली.' आता मात्र मामीची बारी होती, 'अरे त्या तुमच्या गावसकरनेही आज उपास करायचा व्हता ना? संतोषीमातेचा! मग पाहिलं असतं कसा झिरोवर आऊट झाला असता. आता आणा दुसरा रेडिओ.' दुसऱ्या दिवशी सकाळी ड्यूटीवर निघालेला फरताळेमामा शर्टाचे बटणं एका हाताने लावत अन् दुसऱ्या हाताने विडी ओढत बाहेर पडला. झाडांच्या सावलीत उभ्या असलेल्या सवंगड्यांनी विचारले, काय फरताळे ड्यूटीवर? काल शेरखान झालेला फरताळेमामा भिजलेल्या उंदराप्रमाणे उद्गारला, 'सोडा यारऽऽ, काल रेडिओही फोडला, रात्री हिनं जेवणही दिलं नाही अन् एक लाथही घातली. लई महागात गेली राव कालची मॅच!' जय संतोषी माँ!...

# मोठ्याचं मार्केट...

उत्तम कांबळेंसारख्या ज्येष्ठ आणि साहित्यजगतात वेगळा पायंडा पाडण्याचा अविरत प्रयत्न करणाऱ्या मोठ्या माणसाने त्या दिवशी अनेक प्रकारचे प्रहार केले. स्वतःचे अनुभव कथन करून, केवळ साहित्याचीच नवी भाषा नव्हे, तर समाजनिर्मितीचे नवे साधन म्हणून पाहण्याचा दृष्टिकोन विशद करताना आपलं कार्यालयीन कामकाज बजावत वीस-पंचवीस मिनिटांत किती विषयांना हात घातला सांगता येणार नाही. त्यांच्या एका वाक्याने मात्र पुरता घायाळ झालो. म्हणाले, 'मनोहर, तुम्ही चार पानं सांगताय. मी चाळीस लिहीन. पण, मला फार चीड येईल.' कांबळेसाहेबांच्या या शब्दांनी किती मोठी जबाबदारी आजच्या तमाम कार्यकर्त्यांवर आहे, याचं पुरतं भान आले. आपण चळवळ आणि तिचं भाष्य याकडे हिमनगासारखंच पाहतो, याची जाणीव झाली अन् आज पुन्हा कागद-पेन घेऊन चौथीच्या वर्गात गेलो.

जुन्या नाशिकमधील बागवानपुरा भागातील नगरपालिकेच्या शाळा क्रमांक २४ मध्ये मी पहिली ते चौथीपर्यंत शिकलो. माझ्यापेक्षा बापाचा आग्रहच अधिक होता. किमान सात

ते आठ वेळा बापाने सातवी, आठवीत शिकणाऱ्या वाडग्यातीलच एखाद्या पोराला दहा पैसे देऊन माझे नाव शाळेत घालण्यासाठी पाठविले असेल. पण, नाव दाखल करणारा मास्तर आई किंवा बापाला घेऊन ये म्हणायचा. आई कामावर अन् बापाची हाफ खाकी पँटावर कोपरी (बंडीसारखा शर्टाचा प्रकार). पण, उठता-बसता-झोपताना तोच पेहराव असल्याने अतिशय मळकट असायचा. म्हणून बाप लाजायचा शाळेत यायला! मला शैक्षणिक पार्श्वभूमी नव्हती, असं कसं म्हणता येईल? आता तर शैक्षणिक पार्श्वभूमीची व्याख्याच बदलावीशी वाटते. केवळ आई-बाप अडाणी होते, म्हणून म्हणायचं का? मग तोच अडाणी माणूस जा रे चाराणे, दहा पैसे घे, अन् माझ्या मन्याचं नाव शाळेत टाक, असा आग्रह वारंवार करायचा, त्याला अडाणी म्हणावं का? बापाचा विश्वास किती सार्थ होता, हे पुढं मलाही समजलं. पहिली ते नववीपर्यंत पहिला नंबर सोडला नाही मी कधी!

शाळा सुरू झाली. मधल्या सुटीत घरी आलो की भाकर काय खाणार? दोन-तीन दिवसांचे बाजरीच्या भाकरीचे कुटके (तुकडे) असायचे. तोपर्यंत बापा (माझा बाप) पाच-दहा पैशांची एक कैरी आणून ठेवायचा. आल्या आल्या स्वतः पाट्यावर रुचण्याने (वरवंटा) ठेचायचा. सोबत एखादी मिरचीही कुटायचा, त्याच्यावर मीठ, झाली भाजी तयार. स्वतःही खायचा अन् मलाही द्यायचा. उभ्या उभ्याच खात असताना पटकन ॲल्युमिनिअमच्या ग्लासात पाणी घेऊन यायचा. पळ म्हणायचा. युद्धभूमीवर जाणाऱ्या सैनिकाचीही त्याचा बाप एवढी तयारी करून देत असेल का माहीत नाही. पुढे वहिनीच्या ध्यानात ही गोष्ट आल्यावर मात्र ती जाणीवपूर्वक शाळेत जातानाच तव्यावर कुटके गरम करू लागली. दोन-तीन गोडेतेलाचे (खरंतर रेशनच्या पामतेलाचे) थेंब घालून मुद्दाम करायची. दोन मुठी चड्डीच्या लंबलचक खिशात घालून निघालो, की झालं. नेहमी ही केमिस्ट्री छान जमली. आता मधल्या सुटीत घरी येण्याचा प्रश्न राहिला नाही. बापही निवांत झाला. आधी मधी टोपलंभर (भाकरी ठेवण्याची काड्यांची विणलेली लहान पाटी) कुटके झाले की, वहिनी मटण तर कधी वझडीमध्ये भरपूर पाणी घालून चुलीवर शिजवायची, घट्ट होईपर्यंत. अतिशय उत्तम पदार्थ तयार व्हायचा, खेंगट! तेच जेवण साऱ्या फॅमिलीसाठी.

पाचवीला बी. डी. भालेकर शाळेत दाखल झालो अन् आणखी एक जबाबदारी अंगावर येऊन पडली होती. रोजचा बाजारहाट आणून देण्याची. सर्वांत मोठा भाऊ माधव, नंतर मोहन, ताईबाई, कैलास आणि मी असे पाच भावंडे होतो आम्ही. एक

चुलतभाऊ मल्हारी होता; पण तो जवळ नव्हता राहत. काका पुंजाबाबा होता तोपर्यंत काकू आणि मल्हारी (चुलतभाऊ) सोबत रहात होते. मल्हारी आता मनपात चांगल्या नोकरीत आहे. तेव्हा फक्त माधवचं लग्न झालेलं होतं. तो मोठ्याच्या, बारा नंबरच्या म्हणजेच बैलाच्या मटण मार्केटमध्ये नोकरीला होता. मला आठवते तेव्हापासून तो इथेच कामाला होता. मोठ्याच्या मार्केटमध्ये गाळा नं. २ वर श्यामभाईच्या गाळ्यावर तो होता. सोनूबाई आमची भावजय, माधवची बायको जिला आम्ही वहिनी म्हणायचो. जी पुढे आयुष्यभर माझी आईच राहिली. कामं सांगायची, दळण आणायला, तेल-मीठ-मसाला आणायला, घरी आणलेल्या जादाच्या मटणासाठी गिऱ्हाईक आणायला घरी, तर कधी कधी नदीवर नेऊन फराफरा चड्डी उतरवून फेण्याने (लहान काळा दगड) घास घास घासून आठ दिवसांचा अंगाचा मळ काढायची. डोकं दुखेपर्यंत वाढलेल्या केसांतून उवा आणि लिखा (उवांचा एक प्रकार) काढायची अन् दिवसांत किमान चारदा अरे, मुडद्या काही खाऊन घेना... म्हणत मला तंदुरुस्त ठेवत होती. अनिताला तर आजही शेजारच्या कसाईवाड्यातील जुन्या बायका 'क्या गे, तू सोनूबाई की सून ना!' असंच म्हणतात. या पलीकडं तिचं नातं काय सांगू? मूळची मनमाडची जगताप घराण्यातली. भिवाबाबा, माझा आजोबा (आईचा बाप) अन् मोतीरामबाबा, सोनूबाईचा बाप यांच्या मैत्रीतून ती आमच्या घरात आल्याचं आई आणि तीपण सांगायची. बाकी दोघांची लग्नही मोहन अन् कैलासची तिनंच लावून दिली. माझी चॉईस माझी होती. पुढे जेव्हा कधी मला लग्नाविषयी विचारले, अन् मी अनिताचं नाव सांगितलं तेव्हा थोडी हिरमसून म्हणाली, 'मनू, थोडी उजळ पोरगी पाहिली असती.' मी तिलाच विचारले, 'तू स्वतःला पाहिलंस ना आरशात? तुझ्यापेक्षा तर नक्कीच उजळ आहे.' छान हसली. कारण रंगाने काळी होती ती. पण, होती नावासारखी, सोन्यासारखी!

पाचवी ते दहावीपर्यंत रोज सकाळी दहाला मोठ्याच्या मार्केटमध्ये जायचे, माधवच्या कामावर. दोन कापडी पिशव्या सोबत, धान्य अन् भाजी-मसाल्यासाठी. जाऊन गाळ्यावर माधवने इशारा केलेल्या ठिकाणी बसायचो. धंदा किती झाला याचा अंदाज घेऊन माधव शेठला हळूच सांगायचा, 'पाँच रुपये दो...' अन् थोडं मटण भाजीसाठी काढून द्यायचा. पुढे मी फार वेळ थांबायचो नाही. यादीपेक्षा पायच अधिक पळायचे, मशिनसारखे. माझी पावले बाजार ओलांडून महात्मा फुले मार्केट (मंडई)मध्ये घुसायची. ठरलेला मसालेवाला होता. चेहरा पाहूनच बस्ता (मसाला) बांधायचा, दररोजचा ठरलेला. अंदाजे बाराने (पंचाहत्तर पैसे) व्हायचे. पुढे बाहेर पडून धान्याच्या दुकानातून

दोन किलो बाजरी (अंदाजे दीड ते दोन रुपये होत असावेत) दुसऱ्या पिशवीत घ्यायची अन् घराकडे कोकणीपुराच्या मधल्या हमरस्त्याने जवळजवळ पळतच सुटायचे. तोपर्यंत अकरा, सव्वाअकरा झालेले असायचे. अन् सव्वाबाराला शाळा असायची. वीस मिनिटे पायी पोहोचायलाच लागायचे. वडाळा नाका ते बी. डी. भालेकर हायस्कूल. दोन्ही पिशव्या अन् उरलेले पैसे वहिनीच्या अंगावर जवळजवळ फेकूनच दफ्तर घेऊन शाळेत पळायचो. वेळ कधी चुकायची नाही. छान टाईम टेबल जमलं होतं. का जाणो, पण शाळेत कधी भूक लागल्याचं आठवत नाही. सायंकाळी आलो, की वहिनीनं जेवण वाढलेलं असायचं. बाजरीची भाकर, मटणाच्या कालवणाचा रस्सा, कधी-कधी भात नाही तर एकदम बिर्याणी. अर्थात, कण्यांचा भात (अर्धे तांदूळ) कारण पूर्ण तांदूळ कधी परवडला नाही. तेव्हा हा मेनू कित्येक वर्षे कायम होता. मला तेव्हापासूनच मटण आवडायचं नाही. म्हणून ताट पाहूनच अर्धी भूक पळालेली असायची. अर्धी भाकर कालवणाला लावून-लावून (स्पर्शून) कशीबशी खाल्ली की वहिनीची नजर चुकवून उठायचो. नजर वळताच वहिनीची शिवी ठरलेली स्वीट डिश, 'पाह्य बाई झालं या मुड्याचं, दिवसभर काही खाल्लं नाही. अन् आताही अर्ध टाकून दिलंय.' तिचे हे डायलॉग ऐकायला वेळ असायचा कुणाला? हा दिनक्रम दहावीपर्यंत मला आठवतोय. पण, कधीही वहिनी, शाळेला दांडी मार, असं म्हणाली नाही. तेव्हा निकालपत्रे पोस्टाने यायची. १ मे ही तारीख ठरलेली. पोस्टमन आला, की माझ्या अगोदर तीच निकालपत्र घेऊन पाहायची. बाकी काहीच नाही, फक्त गुणानुक्रम पाहायची अन् मनमोकळी हसत म्हणायची. 'आला बाई पहिला!' मग दहा पैसे हक्काचे. हो! वहिनी तिसरी-चौथीपर्यंत शिकलेली होती.

हायस्कूलात जायला लागल्यापासून जरा मोकळीक मिळाली होती. उन्हाळा अन् दिवाळीच्या सुटीत माधव सकाळीच कामावर त्याच्यासोबत घेऊन जाऊ लागला होता. फार काही काम नव्हते. पण, दोन-तीन दिवसांनी कमेल्यात जनावर फाडल्यावर माधवने एक वझडी (बैलाचे जठर) आतडी अन् फोपश्या (फुफ्फुस) कमेल्याच्या (बैल कापण्याचे ठिकाण, हॉल) एका कोपऱ्यात ओढत आणली, नळाजवळ. मला जवळ बोलावले आणि यांत्रिक पद्धतीने सुरी फिरवू लागला वझडीवर. एक वझडी म्हणाल तर गोल आकारात गादी तयार केली तर तिच्यावर एक मध्यम आकाराचा माणूस आरामात झोपू शकेल असा आकार. एका रेषेत मधोमध वझडीवर माधवने धारदार सुरी फिरविली. वझडी उधडली, उसविली गेली. एका बाजूला मला धरायला सांगून दुसऱ्या बाजूने जोराने हिसका देत वझडी पालथी (उपडी) केली. आतील पदार्थ शेणासारखा, ज्याला चारट म्हणतात,

एका झटक्यात फरशीवर आले अन् नकोसा असा उष्ण वास अंगावर आला. काय करणार? मी माधवला फार घाबरत होतो. सोडून पळताही येत नव्हते. चारट बाजूला करून, वझडीचे दोन भाग करून ढीग मारला गेला. आता आतड्याच्या गाठी सुरीच्या टोकाने मोकळ्या होत होत्या. आतड्याचे एक तोंड खुलेच होते. दुसऱ्या बाजूने दाब देत देत सारी घाण शेजारच्या नालीजवळ सोडली, मग नळाला जोडलेला प्लास्टिकचा मोठा पाईप आतड्यात घुसविला अन् पाण्याचा फवारा सोडला. सर्रकन् पाण्याच्या प्रवाहाने आतडे साफ झाले. जरा नितळ पाणी येईपर्यंत प्रवाह तसाच सुरू ठेवला. खात्री झाल्यावर आता वझडीचे दोन्ही तुकडे पाण्याच्या प्रवाहाने साफ, स्वच्छ होत होते. माधव हे सारे काही पटपट करीत होता. कारण व्यावहारिक अन् सबळ होते. मार्केटमध्ये बारा गाळे होते. (गाळे म्हणजे अडीच-तीन फूट उंचीचे साधारण सहा बाय सहा फुटांचे उंच भरीव ओटे. त्याला समोर लोखंडी बार घट्ट केलेले, मटण अडकविण्यासाठी. दोन गाळ्यांमध्ये चार फुटांचे अंतर) म्हणजे बारा वझड्या कमीत कमी होत्या. हा प्रवास बारा वझड्यांचा होता. पण, हे सारे काम एकाच वेळी सुरू होते. त्यामुळे स्पीड मेन्टेन करावाच लागत होता. कारण, पाण्याची वेळ नगरपालिकेने निश्चित केलेली होती अन् साठविण्याची टाकी फार मोठी नव्हती. हे आटोपल्यावर माधव बाहेर आला. आज दुकानावर श्यामभाई स्वतः होते. श्यामभाई मौलानाही असावेत. कारण, साऱ्यांच्या जनावरांच्या नरड्यावर तेच सुरी फिरवायचे. इतर कुणी नाही. फिरविण्याअगोदर दोन मिनिटे डोळे झाकून काही तरी मंत्र पुटपुटायचे. सुरी फिरताच रक्ताची धार समोरच्या भिंतीवर आदळायची. दोन-तीन मिनिटे तो फोर्स सुरू असायचा. मग स्पीड कमी झाल्यावर श्यामभाई त्याच सुरीने त्या जनावराच्या गळ्याची कवडी फोडायचे. जनावर शेवटचा झटका द्यायचे अन् शांत व्हायचे. मग बाकीचे कार्यक्रम सुरू. श्यामभाई स्वतः दुकानदार होते. तरी क्रमाने नंबर येईल तेव्हाच आपले जनावर कापत असे तर आज श्यामभाई थांबले होते. इतरवेळी फार दिसायचे नाहीत. म्हणजे थांबायचे नाहीत दुकानावर. त्यांचा लहान भाऊ बिलाल गल्ल्यावर असायचा. बाकी तोच सारं पाहायचा. तेव्हा तो वकिलीची परीक्षा देत होता. माधवने आज श्यामभाईला सांगितले असावे. आता जनावर टांगले. काटा लागलेलाच होता. दुकान सुरू झाले होते. मटण विकणे हीसुद्धा कौशल्याची बाब होती. गिऱ्हाईक आले, की एका हातात लटकत असलेल्या मटणाचा गोळा दाखवायचा अन् दुसऱ्या हातातील सुरीनेच गिऱ्हाईकाला बोलवायचे. हातातला तुकडा शक्यतो नरम असायचा. मोठी स्पर्धा असायची ती. माधव मग आत आला तोपर्यंत मी वझडी अन् आतडे सांभाळत

होतो. मला ते सारे बाहेर गाळ्याजवळ आणायला सांगितले. दोन-तीन चकरांमध्ये वझडी, आतडे, फोपश्या सारे बाहेर आणून गाळ्याच्या कोपऱ्याजवळ ठेवले. माधवने एक बारदान, प्लास्टिकचे पोते अंथरायला सांगितले. अन् स्वतः शेजारीच सुरा घेऊन कुंद्यावर (मटण तोडण्याचा लाकडी ठोकळा) बारीक-बारीक तुकडे करू लागला. फोपश्या, आतडे अन् अर्ध्या वझडीचे तुकडे झाल्यावर मला त्याचे मिश्रण कालवायला (एकत्रित करायला) सांगितले. मनापासून नकोसे वाटत होते सारे. चेहराही जरा रडवेला झाला होता; पण पर्यायच नव्हता. करावे लागत होते. माधवनेही हात लावला अन् व्यवस्थित एकजीव मिश्रण तयार झाले. अंथरलेल्या बारदानाच्या एका कोपऱ्याला अर्धी वझडी, वजनकाटा, मापे, सुरी ठेवली अन् उरलेल्या भागावर रांगेत मिश्रणाचे वाटे लावले. दोन-तीन रांगांमध्ये १२-१५ वाटे लागले. बाकीचे मिश्रण वझडीशेजारीच झाकून ठेवले. मग मागच्या बाजूला एक चांगल्या पोत्याचे बारदान घडी करून अंथरले अन् मला त्याच्यावर बसायला सांगितले. सोबत एक फडकं (फाटके कापड) बसणाऱ्या माश्या हुसकायला माझ्या हातात दिले. तोपर्यंत चहावाला आला होता. माधवने स्वतःच्या अगोदर मला काळजीने चहा दिला. हा सारा प्रवास सकाळी ७ ते ९ पर्यंतचा. साऱ्यांची दुकाने थाटली होती. काहींनी चौकशी केली. 'महाद्या कोण रे?' माधवने सांगितले, 'छोटा भाई है, अभी इस्कूल को छुट्टी है तब तक घरपे रिकामा क्या करेगा? मौल्ला (मैं बोला) साथ में रहेगा तो अच्छा है नं?' व्यावसायिक स्पर्धक होते. पण, अच्छा किया म्हणत शुभेच्छा देऊन आपापल्या दुकानांकडे वळले. दहाला वहिनी धापा टाकीत आली. तिला बहुतेक हा निर्णय मान्य नसावा. आल्या आल्या जवळ बसली. माझ्या तोंडावरचा घाम पदराने पुसत म्हणाली, 'काही खाल्लं नसेल, भजे खाऊन घे.' अन् समोर कागदात गुंडाळलेली भजी ठेवली. माधव शेजारीच चार फुटांवर, दुकानावर उभा होता. उसंत मिळताच आला. उभ्या उभ्याच दोन भजी तोंडात टाकली अन् वहिनीकडे पाहिले. वहिनीच्या नजरेत अजूनही राग होता. बराच वेळ म्हणजे दुपारपर्यंत थांबली. सोबत जेवण घेऊनच आली होती. दुसऱ्या बाजूला गिऱ्हाईकं सुरू झाली होती. चार आण्याला (पंचवीस पैसे) एक वाटा! वहिनीच्या मदतीने जमत होते सारे. आमचे गिऱ्हाईक म्हणजे मुख्यत्वे आदिवासी, कष्टकरी. इतर यायचे; पण ते वझडी घेत. वझडी महाग वाट्यांपेक्षा, पण मटणापेक्षा बरीच स्वस्त. आतापर्यंत घरी मटणच खात होतो. इतरही प्रकार असतात ते आता समजले. सायंकाळी सहापर्यंत माल संपला. पोत्याखालचे पैसे मोजले माधवने. पंधरा रुपये आणि सुटे काही पैसे झाले होते. त्यातील बारा रुपये काढून माधवने बिलालशेठला

दिले. बाकीचे तीन-साडेतीन रुपये माझ्याकडे देत म्हणाला, ‘सांभाळ, जाताना दे.‘ रात्री आठला सुटी झाली. माधवसोबत बाहेर पडलो. मौलाबाबा तालमीसमोर एक मोठं हॉटेल होतं. तिथले पदार्थ पाहून नेहमी आकर्षण वाटायचे. तिथले पदार्थ पाहून. माधव थेट हॉटेलमध्ये घुसला. मीही मागे होतोच. बाकड्यावर बसल्या-बसल्या विचारले, ‘काय खाशील?‘ मी लाजून म्हटले, ‘काहीपण‘. मग माधवनेच ऑर्डर दिली, एक भत्ता आणि गोडीशेव. मस्त एका दैनिकाच्या सारख्या आयताकृती चौकोनात कापलेल्या कागदावर भत्ता आणि गोडीशेव आली. माधव एक मोठा घास भत्त्याचा हातात घेत उठला अन् मला म्हणाला, ‘खा, मी आलोच‘. माधव गेल्यामुळे आता तुटून पडलो. अगोदर काय खावे ते कळेना. दहा मिनिटांत माधव आला. तोपर्यंत भत्ता संपला होता. गोडीशेव माधवने त्याच कागदात गुंडाळून सोबत घेतली अन् विडीचा झुरका मारत बाहेर पडलो. बहुतेक येतानाच माधवने बिल दिले असावे. त्यामुळे भाव काही कळाला नाही; पण मजा आली. आता सायंकाळचा भत्ता, दुपारी एखाद्या पाववड्याच्या वासाने वझडीशी मैत्री वाढू लागली होती. न चुकता माधवसोबत जाऊ लागलो; पण भत्ता खाताना माधव कुठं जातो ? याचं कुतूहल मनात होते. एकदा म्हटलो, ‘दादा, आज भूक नाही. दुपारी वडा खाल्ला व्हता.‘ माधवला मी दादा म्हणायचो. तो लाडाने मला पिल्ल्या म्हणायचा. म्हटला, ‘पिल्ल्या, थांब जरा इथं, आलोच मी.‘ गेला समोर एका रांगेत उभा राहिला. नंबर येताच आत गेला. पाच-सात मिनिटांतच बाहेर आला. शर्टाच्या लांब बाहीला (अस्तनीला) तोंड पुसत, तोंड वाकडे करीत. विडी पेटविली अन् म्हणाला, चाल, वहिनीला सांगू नको तुझ्या. मी मानेनंच होकार दिला. ते देशी दारूचं दुकान होतं.

मटण मार्केटचा हा प्रवास खूप काही शिकवून गेला. इथं काम नव्हते. ते विचार करूनच लिहावेसे, सांगावेसे वाटते. मध्यभागी महात्मा फुले मार्केट (म्हणजे तेव्हाचं बिग बझारच म्हणा). कापड, धान्य, किराणा, मासळी, सायकल्स, मोटारसायकल्स, टांगा (घोड्यांची बग्गी)चे स्पेअर्स पार्टस्, बायकांचे मेकअपचे साहित्य. म्हणजे खरेदीला जाताना मार्केटमध्ये घुसले, की मेमरीकार्डची गरज नाही. समोरची वस्तू पाहताच आठवण व्हायची. अनावश्यक खरेदी मात्र कधी होत नव्हती. बंडीच्या (शर्टाच्या) ढिगाजवळ गेलं की आपोआपच अंगावर असलेल्या एकुलत्या एक शर्टाच्या नसलेल्या बटणाच्या शिलाईकडे हात जायचा अन् मग वहिनीच्या चेहऱ्याकडे. वहिनी थांबली की लॉटरी! दखल न घेता पुढं गेली, की समजायचं आज डब्यात दळण नाही. काय सुंदर मूकसंवाद असायचा. फुले मार्केटचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे मार्केटने नो एन्ट्रीचा कुठलाही

फलक न लावता आपला ग्राहक पक्का केला होता. त्यामुळे दुचाकी-चारचाकी गाड्यांचा विळखा पडण्याचे कारणच नव्हते आणि पार्किंगचा प्रश्नही नव्हता. त्यामुळे इथला कस्टमर हा मंडईत (मार्केट) येताच समान पातळीवरचा असायचा. मुक्त व्यवहार व्हायचे. लाज, शरम, इगो, गरीब-श्रीमंत? अहं... नो चान्स! त्यामुळेही मला या मार्केटमध्ये रमायला आवडायचे. बाहेरच मोठा मासे बाजार. त्याही काळात दररोज मुंबईहून ताजी मासळी आणली जायची. रात्रभर प्रवास करून आणलेली मासळी ऑर्डरप्रमाणे उतरवून तातडीने बर्फाच्या लाद्यांमध्ये (खड्यांमध्ये) रचली जायची. हे सारे काम केवळ दोन तासांत उरकावे लागत असे. कारण आठ-साडेआठपर्यंत मोठ्या शहराकडे प्रवास करणारा श्रमिकवर्ग आपली हत्यारं आणि चटणी-मिरची, भाकरी फडक्यात बांधून टवटवीत चेहऱ्याने अन्नदात्याची वाट पाहायचा. नकळतपणे त्याला सेवा पुरविणारा दुसरा कष्टकरी म्हणजे चहाची टपरी, पानाची टपरी, भत्त्याचा (मुरमुरे-शेव-डाळ्यांचे मिश्रण) दुकानवाला आणि मिसळ, शेव, वडा-रश्श्याची पातेले, कढाया, स्टोव्ह (तेव्हा चुकूनही गॅस दिसला नाही) असा दिनक्रम दिनकराच्या (सूर्याच्या) साक्षीने तापत जायचा. समोरच डाव्या हाताला लहानाचे (बोकडाचे) मटण मार्केट, पुढे घास बाजार (जनावरांसाठीचा), उजव्या बाजूला भद्रकाली पोलिस ठाणे आणि मागच्या बाजूला पोलिस क्वार्टर्स वसाहत. घास बाजाराच्या वरती चढ्यावर आमचे मोठ्याचे मटण मार्केट. त्याच्या आणखी वरच्या बाजूला एक मोठी बकाल पण भरलेली वस्ती, हागरवाडी! इथं मोठ्या संख्येने महार राहत असावेत. कारण, फक्त डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा पुतळा होता मध्यभागी. आयुष्यातला पहिला पुतळा असा मी पाहिला, जो रंगीत आहे. काळे केस, निळा कोट, लाल टाय, चेहरा मात्र वस्तीसारखाच ढोमसलेला. अजिबात कोरीव शब्दाचा स्पर्श न झालेला. बहुतेक तो याच वस्तीतील एखाद्या शिल्पकाराने घडविला असावा. बाकी मुस्लिम समाजाच्या विभिन्न जाती, लोखंडी कढाया, तवे, स्वयंपाकाचे साहित्य, विळी (कांदा-मिरच्या कापण्याचे साधन) ते चाकू, सुरे, गुप्तीसारख्या वस्तू तयार करणारा शिकलकरी वर्ग आपल्या संपत्तीसह म्हणजे डुकरांसह विसावलेला होता. शेजारीच आता असलेल्या अन् नसलेल्या गंजमाळ बसस्टॉपवर मात्र खरोखर गवताच्या गंज्यांचे (मोठाले, विशाल पिरॅमिडच्या आकाराचे) ढीग मांडलेले होते. म्हणून ते गंजमाळ! आमच्या सोयीसाठी टिळक पथ. इथे टिळकांचा काही संबंध नाही. म्हणतात की, या ठिकाणी नर्गीस आणि सुनील दत्तच्या प्रेमाचा अंकुर फुटणारी घटना घडली. मदर इंडिया सिनेमातील आगीचा ऐतिहासिक शॉट इथे रंगविला जात होता. त्या आगीत

अभिनेत्री नर्गीस खरोखर अडकली आणि सुनील दत्तने तिला सहीसलामत बाहेर काढले होते. असे जतन करावे ते गंजमाळ. तेव्हा पंचशीलनगर फारच कमी झोपड्यांचे होते. नव्हतेच. कारण शाळेत जाताना उजव्या बाजूला गंजमाळचा परिसर आणि डाव्या बाजूला मोठमोठी झाडी अगदी माणसांची उंची झाकण्याएवढी असायची. पण, दहावी होईपर्यंत आता दिसत असलेलं चित्र बरचसं स्पष्ट झालेलं होतं.

मार्केटच्या बाजूला म्हणजे शेपटाकडे हागरवाडीच्या एका कोपऱ्यात वेश्याव्यवसाय आणि गावठी दारूचा गुत्ता चालायचा. दोन्ही व्यवसाय मुन्नीपेक्षा बदनाम! म्हणून चोरून पाहायचा प्रयत्न करायचो. वेश्या व्यवसाय दिवसा दिसण्याचे काही कारण नव्हते; पण दारूचा गुत्ता मात्र स्पष्ट दिसायचा. अंतर मोजले तर दहा-पंधरा मीटरपर्यंत हा गुत्ता आणि भद्रकाली पोलिस ठाणे सारख्याच अंतरावर होते. अनेकदा प्रश्न पडायचा, पोलिस हे का बंद करीत नाहीत? तो प्रश्न आजही आहे म्हणा. आता तर तो युनिव्हर्सल झालाय.

अशा चहुअंगाने या 'अदर इंडिया'मध्ये वावरताना एक घटना आठवते. त्या वेळी दर बुधवारी रात्री म्हणजे ९-१० ला काही जनावरे (बैलच) आणली जायची मार्केटमध्ये. ही जनावरे जरा धष्टपुस्ट, पोसलेली असायची आणि मार्केट बंद (व्यवहार) झाले, की कापली जायची. यात जवळपास सारेच दुकानदार आणि त्यांचा कामगार वर्ग (माधवसारखा) सामील असायचा. तसेही बुधवारी मार्केट लवकरच आटोपलेले (बंद) असायचे. त्या दिवशी नाशिकचा बाजार असल्याने आमच्या कष्टकरी बांधवांचा पगार झालेला असायचा. त्यामुळे मनसोक्त वझडी आणि मटण खाण्याकरिता रांग लागलेली असायची विकत घेण्यासाठी. विभागणी आपोआप झालेली असायची. ठेकेदार, गवंडी, मिस्त्री मटण घ्यायचे; तर लेबर, हेल्पर, मदतनीस हे वझडी. त्या दिवशी वाटे फार जायचेही नाहीत अन् दररोज बारा रुपयांची वझडी आज पंधरा रुपयांना घ्यावी लागायची. रोज बाराचे पंधरा रुपये करायचो. बुधवारी मात्र पंधराचे पंचवीस ते तीस करायचो; तर माल लवकर खपल्याने ही जनावरे कमेल्यामध्ये आणली जात, फाडली, कापली जात. एका जनावराचे दोनच किंवा चार तुकडे करायचे, मोठ्या प्लास्टिकच्या आवरणात गुंडाळून सफेद (पांढरा) बारदानात भरायचे आणि बाहेर तैनात असलेल्या ट्रकमधील बर्फाच्या लादीवर लोड केले जायचे. बाकीचे सारे मटेरियल कमेल्यातच असायचे. मग त्याची विक्री व्हायची. कलेजी (काळीज) हा स्वादिस्ट अन् महाग पदार्थ. पण, आज तो जवळपास मटणाच्या भावात विकला जायचा. माधव मेहनतान्याचे पैसे न घेता उर्वरित रक्कम उधार ठेवायचा अन् तीन-चार कलेजी घ्यायचा. मी पोतं, बारदान

घेऊन उभाच असायचो, घरी न्यायला. एक कलेजी चार किलोपर्यंत भरायची. म्हणजे पंधरा ते वीस किलो वजन पोत्यात भरून ते डोक्यावर घरी म्हणजे वाडग्यात वाहून न्यायचे. माधव नंतर यायचा. दुसऱ्या दिवशी सकाळी सकाळी वहिनीच्या ऑर्डर बुक असायच्या. त्यामुळे गिऱ्हाईकं शोधण्याचा प्रश्न नव्हताच.

असाच एकदा कलेजी घेऊन आलो. साईजने मोठी असावी. वजनावरून तसे वाटत होते. वाहताना नेहमी लाजही वाटायची. त्यामुळे रस्त्यानेही इच्छा नसूनही घाबरत अंधाराच्या बाजूने जायचो. वस्तीच्या कोपऱ्यावर जाताच दिव्यांचा प्रकाश अंगावर पडला. इथं साऱ्यांना माहीत होते. त्यामुळे घरी लवकर जाता यावे, म्हणून मान मोकळी करण्यासाठी थोडा पळत सुटलो. एका बाईचा आवाज आला, 'ये सोने, तुझ्या मन्याला पाह्य काय झालं?' तेव्हा मी वामनदादांच्या घराच्या कोपऱ्यावर होतो. पुतळा नव्हता तेव्हा. सोनूबाई (वहिनी) धापा टाकत पळत आली अन् बोंबलायला लागली. 'अरे, हे काय झालं...' मध्येच थांबवून चौकशी करू लागली. चिडून तिला म्हणालो, 'आवं, अगोदर हे पोतं तर घे' अन् रडायला लागलो. सोनूबाईच्या डोक्यावर पोतं अन् एका हाताला मी घरात पोहोचलो. धाडकन् कलेजीचं पोते खाली टाकून पदराने माझा चेहरा साफ करीत म्हणाली, 'आता सांग कुठं लागलं?' तोपर्यंत पाच-दहा बायकांनी गर्दी केली होती. मी वैतागून तिच्यावर डाफरलो, 'येडावली का तू? कुठं काय झालं?' ती म्हणाली, 'अरे मग हे रक्त कश्याचं डोक्याला?' तेव्हा पाहिलं तर कलेजीचं पोतं गळकं (फाटलेलं) होतं, अन् त्याचं रक्त माझ्या दोन्ही कानामागून गाल आणि मानेपर्यंत ओघळत आले होते. मला वाटले, तो घाम असावा; पण अंधाऱ्या उजेडात माझा रक्ताळलेला चेहरा पाहून ती बाई ओरडली असावी, 'ये सोने... हे पाह्य तुझ्या मन्याला काय झालं?'

# सत्कार दारिद्रयाचा...

ज्या वस्तीत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा पुतळा तिथे शिक्षणाचे महत्त्व पटवून द्यावे, अशी एखादीच वस्ती सापडेल. शिक्षण हे वाघिणीचं दूध आहे, अशी वाक्ये पुढे बाबासाहेबांचं नाव लावून अनेक पत्रकांवर पाहिली; पण खरोखर अनुभूती झाली, अनुभव घेतला, तेव्हा वाक्याचा गर्भार्थही उमजला. बापा (म्हणजे माझा बाप) लहानपणी एखाद्या शाळेत जाणाऱ्या मोठ्या पोराला तेव्हा चार आणे द्यायचा, अन् सांगायचा, मन्याला शाळेत घालून ये. तिथं गेल्यावर गुरुजी म्हणायचा, बापाला घेऊन ये. बापाच्या अंगावर धड कपडेही नसायचे म्हणून शाळेत यायला लाजायचा. आई नगरपालिकेच्या झाडू खात्यात कामाला जायची. त्यामुळे बाप दाखव नाही तर श्राद्ध घाल (म्हणजे शाळेत नाव घाल) अशी विचित्र अवस्था माझी होती. शेवटी शाळेत प्रवेश मिळाला. दोन नंबरचा भाऊ म्हणजेच मोहनच्या पुढाकाराने!

पहिलीच्या वर्गातच भिंतीवर रंगविलेले 'दलित पँथर झिंदाबाद' वाचले. वाटलं की अभ्यासाचा सुविचार असेल; पण तो त्याहीपेक्षा कितीतरी मोठा होता, हे आता

सामाजिक, राजकीय कार्यकर्ता झाल्यावर उमजतंय. माहीत नाही; पण उपजतच ज्ञानाची आवड असावी. घरात कुठलंही शैक्षणिक वातावरण नसताना पहिली ते नववीपर्यंत पहिल्या क्रमांकाने पास होत गेलो. अभ्यास कुठं करीत होतो, आठवतच नाही. वर्गात जे शिकवायचे तेवढंच अध्ययन!

पहिलीत असताना आपल्या हुशारीमुळे एका गरीब विद्यार्थ्याच्या कानफटात बसली, याचं मात्र अजूनही वाईट वाटतं. शाळेत मुख्याध्यापकांनंतर कडक शिस्तीचे, पाच फूट उंचीचे, पायजमा, झब्बा, टोपी घातलेले इयत्ता पाचवीचे सोनवणे गुरुजी. एकदा वर्ग सुरू असताना वर्गात आले. अहिरे... म्हणून जोरात हाक मारली. उठलो. विद्यार्थीही पाहत होते. गुरुजी म्हणाले, इकडे ये... दिवसभरातील मस्ती आठवली, तेवढ्या बारा ते पंधरा पावलांत. काहीच आठवेना. त्यांच्या वर्गात घेऊन गेले. एका विद्यार्थ्याशेजारी बसविले. म्हणाले, तुला एबीसीडी येते? घाबरत होऽऽ म्हणालो. म्हण... सोनवणे गुरुजी मला म्हणाले. हळूहळू सुरवात केली. 'ए'पासून सुरवात केली, 'झेड'पर्यंत आलो. 'झेड' हा अखेरचा शब्द उच्चारताच शेजारी बसलेल्या मुलाच्या कानफटात बसली. मला समजेनाच काय झालं ते. सोनवणे गुरुजी त्या विद्यार्थ्याला म्हणाले, 'हा पहिलीचा विद्यार्थी. इंग्रजी नाही तरी ए पासून झेडपर्यंत म्हणतो, तुला सहा महिन्यांत जमले नाही. मला शाबासकी दिली आणि जा म्हणाले. नंतर कळाले तो विद्यार्थी त्यांचाच भाचा होता आणि इंग्रजीचे शिक्षकही तेच होते.

चौथीनंतर हायस्कूलमध्ये जायचे ठरविले. स्वतःच गेलो. फॉर्म भरला आणि आताच्या बी. डी. भालेकर विद्यालयात दाखल झालो. चौथीत पहिला क्रमांक आल्याने अ तुकडी मिळेल. असं वाटलं होतं; पण माहीत नाही. 'ब' तुकडी मिळाली. पहिले सात-आठ दिवस एकत्रच बसावे लागले. सर्वच काही नवीन होते. बसायला बेंच, गुरुजीऐवजी सर, बाईऐवजी मॅडम म्हणायचे आणि वर्गात येताच उठून एकसाथ नमस्ते म्हणायचे. आकर्षित करणारी आणि औत्सुक्याची बाब म्हणजे प्रत्येक विषयाला स्वतंत्र शिक्षक आणि मुले-मुली एकत्र एकाच वर्गात बसणार. मागच्या वर्षाचा १५ ऑगस्टला घेतलेला शाळेचा ड्रेस होता; पण उठताना, बसताना, झोपताना आणि शाळेत जातानाही एकच ड्रेस असल्याने त्याची अवस्था बिकटच झाली होती. काय करणार घरात खायचे वांधे, कपडे कुठून आणणार? १२.०५ ला शाळा होती. पहिलाच दिवस होता. किमान स्वच्छ कपडे असावेत म्हणून सोसायटी (ग्राहक संघाच्या) नळावर गेलो. तिथे भरपूर पाणी होते. (घरी वहिनी नव्हती. गावाला गेली असावी अन् आई कामावर) म्हणून चड्डीवरच कपडे

धुवायला गेलो. कपडे भिजविले; पण साबण कुठे आहे. शेजारी रिठ्याचं झाड होतं. रिठे तोडले. पाण्यात भिजवून घासले. भरपूर फेस झाला. कपडे धुण्याचा (स्वच्छ करण्याचा) आनंद मिळाला. मग आंघोळ केली. नळाखालीच. कपडे वाळायला घालणार तोच वस्तीतील एक बाईही तिथेच कपडे धुवायला आली. तिने अवस्था पाहिली. कपडे घेतले हातातून अन् स्वतःजवळच्या साबणाने धुतले. तेव्हा कुठं मळ निघाला. फार समाधान झाले. कपडे वाळविले. घातले. अकरालाच निघालो तर आई भेटली. डोक्यावरचे झाडू न उतवरता कंबरेला खोचलेले चार आणे काढले अन् म्हणाली, ‘उपाशी राहू नकोस. जपून जा.’ आयुष्यात पहिल्यांदा चार आणे खर्चासाठी पाहत होतो. जाम खूश होतो. लवकरच शाळा गाठली. माझ्यासारखे अनेक हौशी होते. बरेचसे शर्ट इन केलेले. माझी विजार थोडी ढिल्ली होती, कमरेत; पण शर्टींग केली अन् वर करगोटा चढविला.

शाळा भरली. पोरं-पोरी एकाच वर्गात. चौथीचा प्रथम क्रमांकाचा म्हणून हुशारीने पहिल्याच बाकावर बसलो. घंटा वाजली. प्रार्थना, राष्ट्रगीत लाऊडस्पीकरवरच ऐकायला मिळालं. थोड्याच वेळात उंच, धिप्पाड, व्यवस्थित शर्टींग केलेले शिक्षक वर्गावर आले. एकसाथ नमस्ते... झाले. सरांनी सर्व वर्गावर नजर फिरविली. बसा म्हटले. एकदम माझ्यावर नजर रोखली. म्हणाले, इकडे ये. समोरच्या ओट्यावर (वर्गातल्या) गेलो. सरांनी नाव विचारले. सांगितले, मनोहर देवराम आहिरे. शाळा विचारली. सांगितली, शाळा क्रमांक २४, कोंबडावाला बिल्डिंग. मला वाटले, सरांनी माझी सर्व माहिती घेतली असावी. वर्गाला परिचय करून देतील, हुशार विद्यार्थी म्हणून. तांबटसरांनी हाताला धरले, थोडे पुढे आणले आणि छडी माझ्याकडे करून वर्गाला सांगू लागले, ‘अरे जरा याचे कपडे पाहा, कसे तेलात बुडवून आणले आहेत.’ वाक्य संपतानाच जोरदार छडी पाठीवर बसली. कळवळलो. ‘जाऽऽ’ म्हणाले. नाविन्य असलेल्या शाळेच्या इमारतीत पहिल्याच दिवशी माझ्या शैक्षणिक हुशारीपेक्षा गरिबीचा, दारिद्र्याचा तो पहिलाच सत्कार होता. दिवसभर वर्गात रडत बसून स्वीकारला!

जेव्हा कधी ऐपत तयार झाली, तेव्हा कपड्यांची भरपूर हौस करून घेतली. स्वतःच्या कपड्यांची स्टाईल स्वतःच टेलरला सुचविण्याची वेगळीच आवड निर्माण झाली. पण, आपण परफेक्ट आहोत, याचीही प्रचिती येते, अनेकदा मित्रमंडळी जेव्हा टेलरचं नाव विचारतात. माझ्या पोरीही आणि अनिताही आता कॉंबिनेशन्स कसं असावं म्हणून सांगतात. नकळतपणे कितीही घाई असली तरी किमान तीनदा आरशात चेहऱ्यापेक्षा कपड्यांचे निरीक्षण करण्याचा मोह आवरत नाही. पण, या आवडीलाही लहानपणाच्या

गरिबी आणि दारिद्र्याची झालर आहे. हायस्कूलमध्ये शिक्षण घेत असताना किमान स्वच्छ कपडे असावेत, असा दंडकच मानल्याने आणि शाळेचा ड्रेस (खाकी पँट व पांढरा शर्ट) कंपलसरी असल्याने आईसुद्धा जरा लक्ष देऊ लागली होती. महिना-दीड महिन्यात एकदा पंधरा रुपये द्यायची. फुले मार्केटच्या जुन्या कपड्यांच्या डिपार्टमेंटला जायचे. एक टेलर कायमचा ठरला होता. नाव आठवत नाही; पण मुस्लिम होता. तो तीन-चार खाकी पँट (मोठ्या माणसांच्या) काढून द्यायचा. त्यामधून चांगली एक निवडायची. तिथंच माप द्यायचं, अन् शिवून घ्यायची. शिवून झाल्यावर टेलरच्या कोपऱ्यात (उघड्यावरच) त्याचा टॉवेल गुंडाळून नवी पँट बदलायची अन् ऐटीत शाळेत रवाना व्हायचे. बारा रुपयांची पँट, तीन रुपये दुरुस्तीचे!

याच काळात उन्हाळा आणि दिवाळीच्या सुटीत मेनरोडच्या पांडे मिठाईत कामाला जायचो. परीक्षा संपल्याच्या शेवटच्या दिवशी सायंकाळी गेलो, की पांडे मिठाईचा कॅशियर कम मॅनेजर विचारणार, 'क्यों मनोज कल से आ रहे हो? जाओ लस्सी पिओ!' दुसऱ्या दिवशी ड्यूटी सुरू. खरं तर घरी कधीही काम कर असा आग्रह झाला नाही; पण कामाची सवय लागून गेली. दीडशे रुपये महिना. तीन ते अकरा किंवा साडेअकराची वेळ निश्चित. महिनाभरात तब्येत सुधारायचीच, पांडे मिठाईत.

एकदा सुटी झाल्यावर जोडीदार मित्र संतोष म्हणाला, 'अरे, गाण्यांचा आवाज ऐकला का? चल ऑर्केस्ट्रा पाहायला जाऊ.' आवाजाच्या दिशेने गेलो. नेहरू उद्यानात बहुतेक लग्नाचे रिसेप्शन असावे. एका स्टेजवर नवरी-नवरा अन् दुसऱ्या स्टेजवर ऑर्केस्ट्रा. दुसऱ्या कोपऱ्यात जेवणाचे (बुफे) टेबल्स मांडलेले. संत्या (संतोष) म्हणाला, 'चल जेवण करू.' मी लाजलो म्हटलो, 'नको यार, कुणी ओळखीचं नाही.' तो म्हटला, 'अरे किती गर्दी आहे, कोण विचारतो?' खरं तर माझ्याही तोंडाला पाणी सुटलं होतंच. भीड चेपून काऊंटरवर गेलो. ताट वाढून घेतलं. दोन घासच खाल्ले असतील. वऱ्हाडातील एक जण आला आणि डाफरला, 'ए कोण रे तू? भिकारी साला.' अवतार बघितलास का आरशात कधी? आला जेवायला. चल निघ इथून...' म्हणत ताटं हिसकावून घेतली अन् पात्रात टाकून दिली. इतर लोकही पाहत होते. खूप शरम वाटली स्वतःची आणि राग आला संत्याचा. घरी आलो, फुटक्या आरशात स्वतःला पाहिलं. तो माणूस म्हटला ते खरंच होतं. सदरा इतका मळका होता की त्याचा खरा रंगही आठवेना. आता फाटके कपडेही फेकताना तो सदरा आठवतो. कारण हे फाटके असूनही त्याच्यापेक्षा कितीतरी स्वच्छ असतात.

शाळा ते कॉलेजच्या कालावधीत माझा खऱ्या अर्थाने मित्र राहिला तो माझा दोन नंबरचा मोठा भाऊ मोहन! त्याच्याकडून जिंदगीचे अनेक चेहरे अन् मेहनतीचे महत्त्व कळाले. तो मला सिनेमा, उरूसाला घेऊन जायचा. माझे क्रिकेटचे वेड त्याच्यामुळेच वाढले. क्रिकेटवर तर आम्ही कितीतरी वेळ बोलायचो. गावसकची सनी डेज अन् 'आयडॉल्स' ही पुस्तकं मोहननेच आणून दिली होती वाचायला. शिक्षणाचं महत्त्व बापानंतर घरात मोहनलाच पटलं असावं. कारण मी शाळेत दाखल झाल्यानंतर तो काळजीने शक्य तितके साहित्य पुरवायचा. चौथीत असताना मास्तरांनी वह्यांची यादी दिली. घाई फार नव्हती; पण मोहनला सांगितले. पावसाळ्याचे दिवस होते. जोराचा एकसरी पाऊस सुरू होता. मी वर्गात बसलो होतो. एक-दीड वाजला असेल. मोहन नखशिखांत ओलाचिंब होऊन वर्गाच्या दारात उभा. हातात वह्यांचा बंडल. डोक्याच्या केसापासून तर पायाच्या नखांपर्यंत चिंब भिजलेल्या मोहनने मात्र वह्या प्लास्टिकच्या आवरणात गुंडाळून अशा आणल्या होत्या, की एक थेंबही वह्यांवर पडला नव्हता. मास्तरलाही खूप कौतुक वाटले; पण मला मात्र घाई केल्याबद्दल झापले. मोहनने शिकायचंच आहे, हा धडा न बोलता अशा लहान-सहान संस्कारांनी अतिशय हळूवार केला. दहावीच्या निकालात पहिल्याच फटक्यात पास झालो. मोहनकडून अपेक्षा होत्या. फार कौतुक केलं नाही. म्हटला, 'बरं झालं पास झाला. मला वाटलं, की एखाद-दोन विषय राहतील.' पुढचा झटका दिला. 'पुढं काय करायचं ठरवलंय? कॉलेजात जायचं असेल तर सांग नाही तर कुठंतरी नोकरीसाठी प्रयत्न करतो.' तेव्हा खूप राग आला होता. पण, आता मात्र मोहनच्या त्या प्रॅक्टिकलपणाचा गर्वच वाटतो. त्यानं मला निर्णयक्षमतेचाही धडा आपोआप दिला होता. जो नंतरच्या सामाजिक, राजकीय कामाच्या वेळी खूपच मोलाच ठरला. आजचा कागद रंगविण्यासाठीदेखील!

# बारावी नापास

कॉलेजात असताना एकदा निबंधात मार्क्स मिळणारच नाहीत, असे म्हणून नेहमीचा माझा आवडता ऋतू पावसाळा विषय टाळला. कारणही तसेच होते. खोटा पाऊस, चित्र खोटं, हिरवळ, श्रावण, फुलं-पानं, प्रसन्न-आनंदी वातावरण सारे झूट होते. आमच्यासाठी, वस्तीसाठी! कारण सगळ्यात जास्त परवड व्हायची ती पावसाळ्यातच. खाली जमीन ओली, कूड (भिंती) ओल्या अन् वर गळके पत्रे आणि जर हा रात्री बरसला तर मात्र तारांबळ विचारायची नाही. तिथंल्या तिथं गोधडी सरकवून कालवणाचं पातेलं, तांब्या (पाणी पिण्याचा लोटा), कढाई, अगदी संडासाचे डबडेसुद्धा गळणारे पाण्याचे एकधार थेंब जमा करण्याच्या स्पर्धेत उतरवायचे. भरले की, बसल्या जागेवरूनच बाहेर फेकायचे अन् पुन्हा जैसे थे ठेवायचे. पहाटे जरा जोर कमी झाला की, झोप लागायची. त्या ओल्या गोधडीची ऊब आज मोठ्या ब्लँकेटमध्येही मिळत नाही. जागा कमी, एकच सार्वजनिक नळ. पाण्याचा साठा करण्याची साधनेही अपुरीच, मर्यादित!

त्यामुळे वाडग्यातील महिलांचा आठवड्यात दोन-तीनदा जवळच असलेल्या नासर्डी नदीकडे मोर्चा असायचा. तेव्हा मात्र भर उन्हाळ्यात दुथडी वाहणारी नदी होती ती. मग गोधड्या, कपडे, लुगडी, सोबतच आम्हा पोरा-टोरांच्या आंघोळी व्हायच्या. तेव्हा प्रसिद्ध असलेला गौरी साबण कापडं आणि अंगालाही वापरला जायचा. त्यामुळे अंगाला साबणापेक्षा दगडाने, फेण्यानेच अधिक घासले जायचे. कधी कधी अंगाची आग व्हायची जास्त घासल्याने; पण नदीच्या पाण्यात बुचकळताच आग शांत व्हायची. एक-दोनदा तर वझडी घरी आणली असता वहिनीने पहाटेच्या अंधारात नदीवर नेऊन गोधडीसारखी धुतली होती. तेव्हा मात्र वझडी खरोखरच स्वच्छ धुतली होती वाहत्या प्रवाहात.

आमची वस्ती म्हणजे वाडगं. कितीतरी दिवस बेकायदेशीर झोपडपट्टी म्हणून मान्यताप्राप्त नव्हती. या एका कारणासाठी प्राथमिक सुविधा, लाईट, संडास, पाणी, रस्ते यापासून वंचित राहिलो. नळ होते ते नगरपालिकेच्या मेहेरबानीने. विजेचे खांब तर आमचे माणिकशेठ नगरसेवक झाल्यावर लागल्याचे चांगले आठवते. तेव्हा नगरपालिकेचे मुख्यालय मेनरोड येथे होते आणि सर्वसाधारण सभेसाठी म्हणजे आजची महासभा नगरसेवकांना ने-आण करण्यासाठी एक ॲम्बेसिडर कार यायची. या पांढऱ्या कारमध्ये आमच्या माणिकशेठच्या अगोदर गणपतराव काठे, चंद्रशेखर काळे, वसंतराव वझरे आदी मंडळी असल्याचे अनेकदा पाहिले. याच काळात एकदा पावसाळ्यात काही अधिकारी आणि एक पावसाळी गमबूट, काळी पँट, पांढरा शर्ट, चष्मा लावलेली अन् छत्री डोक्यावर घेऊन व्यक्ती वाडग्यात आली. आम्ही जरा लांबून पाहत होतो. काही ज्येष्ठ नागरिकांशी त्यांनी बोलणं केलं. अधिकाऱ्यांना काहीतरी सूचना केल्या. अर्धा तास हा कार्यक्रम सुरू होता. दुसऱ्या दिवशी दहा-बारा मुरुमाच्या गाड्या आल्या अन् पसरविल्या गेल्या. काही प्रमाणात का असेना, चिखलापासून तात्पुरती फारकत मिळाली. फार अभिमान वाटला तेव्हा त्या माणसाचा. पुढे जाऊन समजले की ते होते माजी नगराध्यक्ष डॉ. वसंतराव गुप्ते! त्यांच्या या भेटीनंतर मात्र बरीच सुधारणा झाली वाडग्याची.

मार्केटमध्ये वझडी विकण्याचे काम आठवते त्याप्रमाणे एखाद्या वर्षीच सुट्यांमध्ये केले. आठवीत असताना एका मित्राच्या ओळखीने मेनरोडवरील पांडे मिठाईत दुसऱ्या शिफ्ट (दुपारी तीन ते रात्री बंद होईपर्यंत) कामाला जायला लागलो. दीडशे रुपये महिन्याने. हे जरा चांगले काम होते. पाच रुपये रोजापेक्षा खाणे-पिणे याची चंगळ होती. त्याचवेळी कैलास मनपात नोकरीला लागला. पहिलाच पगार घेऊन मित्रांसमवेत लस्सी प्यायला आला होता. नेमका मीच तो टेबल सांभाळत असल्याने लस्सीचे ग्लास घेऊन गेलो.

कैलासच्या डोळ्यांत नाराजी दिसली. रात्री घरी गेल्यावर आदेशात परावर्तित झाली, 'तुला काय करायचे हॉटेलचे काम, शिकू राहायलास ना तू? बंद कर अन् पैसे पाहिजे तर सांग!' मानेनेच होकार भरला. हे त्यालाही माहीत होते, की मी केवळ पैशांसाठी काम करत नाही; पण त्याचा हॉटेलच्या कामाचा चांगला-वाईट अनुभव दांडगा होता. असो! दुसऱ्या दिवशी जाऊन हिशेब सकारण घेऊन आलो. मॅनेजरची तक्रार असण्याचे कारण नव्हते. इथेच काम करताना एकदा मॅनेजरशेजारी स्वतः मालक सुरेशशेठ बसलेले होते. मी पुढल्या काऊंटरवर. कुणी नव्हते म्हणून उभा राहिलो. एवढ्यात एक ग्रामीण भागातील महिला लस्सी पिऊन बाहेर पडताना बडबडत चालली होती, 'काय अंबाट लस्सी आहे.' मी तिला म्हटलो, 'अहो बाई, लस्सी अशीच असते.' बस्स, सुरेशशेठच्या कानावर माझे वाक्य गेले अन् कानावर शिवी आली, 'ये हरामखोर, चूप बस!' झाले. हवा टाईट. बाकीच्या कामगारांनाही कळाले. चार-साडेचारला सुरेशशेठला अस्सल दुधाचा चहा लागायचा. आमचा एक कारागीर दिवाना नाव त्याचे, तोच करायचा. त्याने हाक मारून मला बोलाविले, 'मनोज, जा शेठला चहा दे.' मी उडालोच. 'दिवाना, तुम्हाला काही खुन्नस काढायची आहे का?' पण दिवाना छान माणूस होता, हे माहीत होते. ताटात चहाचा ग्लास घेऊन घाबरत शेठच्या खुर्चीजवळ गेलो अन् चहा ठेवून पटकन् दूर झालो. पण, पळायची सवड सुरेशशेठने दिली नाही. पाठ वळताच हाक मारली, 'हे राजू.' ते फार कमी कामगारांना नावाने ओळखायचे. बाकी सारे राजूच... संपले आता सारे काही. वळालो. म्हटलो, जी शेठ! तोपर्यंत चहाचा एक झुरका मारून झाला होता. मला जवळ बोलावले अन् विचारले, 'काय नाव तुझं? असं गिऱ्हाईकाला बोलू नये.' मी तात्काळ उत्तरलो, सॉरी शेठ! तो शब्द ऐकून सुरेशशेठने हाताला धरले अन् विचारले, नाव काय तुझे?' सांगितले. काय करतोस? म्हणालो, 'आठवीत आहे. बी. डी. भालेकर शाळेत. आता सुटी आहे म्हणून कामाला येतो.' शेठच्या डोळ्यांत वेगळीच चमक दिसली. म्हणाले, 'छान. शाळा सोडायची नाही अन् काही मदत लागली तर सांगायची. हा घे ग्लास.' दुसऱ्या दिवसापासून शेठ मलाच चहा आणायला सांगू लागले, नाव मात्र राजू ठेवूनच.

कैलासच्या सांगण्यावरून पांडे मिठाईचे काम सोडले. मग जिवलग मित्र संजय भालेराव (संज्या) म्हटला, 'बराबर हाये ना, मनवा त्याचे...' तो मला आवडीने मनवा म्हणायचा. 'पण, एक चांगले काम आहे. इथंच रेणुकाबागेत (म्हणजे नगरमध्ये) रंगाचे.' म्हटलो चाल. तिथे फुलेनगरचा एक ठेकेदार होता. त्याने विचारले, अगोदर कुठं काम

केले? सांगितले. त्याने तर भाषणच ठोकले, 'काय रे, तुम्ही पोरं, एवढे शिकून हॉटेलात कामाला जात्या? आपला समाज किती पुढं गेला. चाल लाग कामाला आजपासून. पंधरा रुपये हाजरी मिळंल मस्त!' पगार तिप्पट, घराजवळ काम, त्याच्या भाषेत विज्ञत जायची फिकीर नाही. लागलो कामाला.

ठरल्याप्रमाणे दहावी बोर्डाच्या परीक्षेत पास झालो अन् अकरावीला बी.वाय.के. कॉलेजमध्ये प्रवेश घेतला. बारावीला मात्र मालिका खंडित झाली. अर्थशास्त्र विषय राहिला. कारण पटेल की माहीत नाही. पण, अजूनही वाटते, की तो खंड पडला नसता तर वेगळी वाट नक्कीच मिळाली असती. अर्थात, आलो ही वाट त्यापेक्षा अधिक आवडीची आहे. त्यामुळे त्याची फार खंत, शल्य नाही. त्याचे झाले असे, अगोदर फारसा अभ्यास करण्याची सवय नव्हती. एकपाठी असल्याने परीक्षेच्या आदल्या दिवशी जो अभ्यास तोच. बारावीच्या अर्थशास्त्राच्या पेपरच्या आदल्या दिवशी घरात अभ्यासाला बसलो. आतापर्यंत परिवाराची आर्थिक परिस्थिती चांगलीही झाली होती. आता आईसोबतच मोहन, कैलासही मनपात सेवेत दाखल झाले होते. दोघांचे लग्नही झाले होते. अभ्यास सुरू केला अन् शेजारी माधवरावचा धिंगाणा सुरू झाला. तो नेहमीचाच होता; पण किमान परीक्षेच्या काळात नको म्हणून सांगण्यासाठी गेलो. वहिनीलाही सांगितले. तीपण वैतागली होती. म्हणाली, 'जाय अन् दे त्याला पोलिसांत.' मला काय माहीत तिला फक्त धमकवायचे होते म्हणून. पण, माधव काही ऐकण्याच्या मूडमध्ये नव्हता. अंगुरकी बेटीच्या पुऱ्या तावडीत तो सापडल्याने रात्रभर हे सुरू राहील अन् पेपरचे उद्या नुकसान होईल, या भीतीने सरळ भद्रकाली पोलिस ठाणे गाठले. अकोलकर इन्स्पेक्टर होते त्यांना सांगितले. दोन पोलिस सोबत दिले. आले. माधवला अन् मला घेतले अन् गेले ठाण्यात घेऊन. त्यांच्याच खर्चाने, रिक्षाने. साहेबांनी माधवला जमा करून घेतले अन् मला जायला सांगितले, अभ्यास करायला. तेव्हा माझी बहीण ताईबाईपण आलेली होती मुंबईहून. शांतपणे घरी आलो. येताच वहिनीने विचारले, 'तुमचा भाऊ?' मी म्हटलो, 'पोलिसांनी केला जमा. सकाळी सोडतील.' बस्स! वहिनी, आई अन् ताईबाईकडून वस्तीच्या नावाने नोंदणीकृत सगळ्या शिव्यांचे हार गळ्यात पडले, 'अरे, तू हे काय केलं? फक्त दम द्यायला सांगितले होते.' आता हा पेपर कसा सोडवायचा? असह्य होऊन पुन्हा पळालो पोलिस स्टेशनला. साहेबाने विचारले, आता काय? म्हटलो, 'साहेब, माझ्या भावाला सोडा, घरचे फार शिव्या देऊ राहिले.' साहेब डाफरला, 'तुझ्या बापाचे नोकर आहे का आम्ही? तू म्हणशील तेव्हा धरा, तू म्हणशील तेव्हा सोडा... पळ इथून नाहीतर

तुलाही जमा करील.' तसाच घरी आलो. पुन्हा धिंगाणा सुरू. उद्या कोर्टातून सोडवून घ्या, असं साहेबांनी सांगितल्यावर तर वहिनीने माझ्या नावाने बांगड्याच फोडल्या अन् मोठ्या पोरीला म्हणाल्या, 'ये जाय गं तू पण कपडे फाडून पोलिस ठाण्यात अन् कर या मेल्यालाही जमा.' आता मात्र माझाही बांध फुटला होता. 'अरे तुम्ही माझ्यासाठी काय केलं. बारावीचं वर्ष आहे म्हणून एक दिवस तुम्हाला घर शांत ठेवता येत नाही? चला करा मला अटक' अन् धाय मोकलून रडू लागलो. एव्हाना मोहन आला होता. त्याने साऱ्यांची समजूत काढली अन् मलाही शांत केले. सकाळी पेपरला नक्की जा, असेही सांगितले. तसेच सारे झोपण्याचे सोंग करून पडले. सकाळी उठलो, तयारी केली अन् परीक्षेला पळालो. कुणी चहापण विचारला नाही. अकराला पेपर होता बोर्डाचा. पण, काही कळेना. चित्त लागेना. किमान वेळ गाठली. नाव आदी टाकून पेपर जमा केला अन् बसने कोर्टात (सीबीएस) आलो. तोपर्यंत बारा वाजले होते. मोहन अन् कैलास अगोदरच हजर होते. वकिलाने त्याचे काम केले होते. जामीन झाला अन् माधवच्या बेड्या काढून घेण्यात आल्या. मग चौघंही भाऊ कोर्टाच्या जुन्या कँटीनमध्ये गेलो. माधवला भूक लागली होतीच. मोहनने न विचारताच वडा रस्साची ऑर्डर दिली. मी माझ्यासाठी नाही म्हणून सांगितले. मोहनने मला विचारले, 'पेपर दिला का?' मानेनंच 'होऽऽ' म्हणालो. कैलासने माधवला विचारले, 'काल लॉकअपमध्ये काही त्रास झाला का?' पोटात भर पडलेला माधव म्हणाला, 'लय नाही; पण डास होते अन् बीडी बंडलही नव्हता.' पायीच घरी आलो. वहिनी काहीतरी बोलणार तेवढ्यातच मी गरळ ओकली, 'ए, आता ज्यादा शहाणपणा नको करूस. आमच्या भावाला आम्हीच आणलं ना सोडून! तू आलीस का? यापुढं पाहतो ना, तुमच्यामध्ये कोण येतंय ते?' ती बिचारी आमच्या भाऊबंदकीसमोर काय बोलणार? पण ताईबाई मध्यस्थी करायला पुढे आली. आता ऐकायची वेळ तिची होती, 'ए, तू गप्प बस. पाहुणी म्हणून आलीस ना. पाहुणीसारखी राहा.' ताईने पलटवार केला. तो परतवण्यासारखा नव्हता, 'गप्प रे भाड्या, पाहुणी म्हणून काय तुझ्या दारात नाही आले. माझी आई अजून जिवंत आहे.' काय बोलणार? आज आई जिवंत आहे; पण पुढे... ताईबाई, सोनूबाई (वहिनी), मोहन अन् माधवराव क्रमाने आईचं घर रिकामे करून गेलेत कायमचे...

# बांधणी... आतून... बाहेरून!

ठरल्याप्रमाणे बारावीत नापास झालो. अगोदरच माहीत असल्याने फार वाईट वाटले नाही; पण अपयशाची चव माझ्याअगोदर आईला (गीताई) कळाली असावी. कामावरून आल्या आल्या धाय मोकलून अन् गळ्यात पडून रडली. नापास झालं की पोरं आत्महत्या करतात, हे ती ऐकत होती. म्हणून धीरही देत होती. तिचा भार हलका करण्यासाठी डोळे पुसत सांगितले, 'घाबरू नकोस, ऑक्टोबरला पेपर देईन. एक तर वर्ष मागे राहील.' तेव्हा कुठं शांत झाली. त्यानंतर मात्र किमान अभ्यास किंवा शिक्षण याबाबतीत तिने कधी कॉम्प्रमाईज नाही केलं. या रिकाम्या वर्षात मग रोज शेजारच्या नातेवाइकांकडून, मधूभाऊकडून दैनिक आणायचं, छोट्या जाहिरातीतील नोकऱ्या सदरावर, चौकटीवर नजर टेकवायची. चार-पाच पत्ते लिहून घ्यायचे. आईकडून दोन रुपये घेऊन त्यातून एक डझन (बारा) रेखी फूलस्केप पेपर्स आणायचे अन् अर्ज खरडायचे. हा दुपारी एकपर्यंतचा कार्यक्रम. नंतर जेवण करून दोन ते सहा हा अर्ज देण्याचा. असे जवळपास महिनाभर शंभरावर अर्ज केल्यानंतर एकदा एक पोस्टकार्ड आले. नेमका अरुण ठाकूर

घरी आलेला होता. तोपर्यंत मी समता आंदोलन या समाजवादी संघटनेत सामील झालो होतो. अरुणला माहितीच देत होतो अन् हे पत्र आले. प्रमोटर्स अँड बिल्डर्स असोसिएशन या बिल्डर्सच्या संस्थेचे ते पत्र होते. मुलाखतीचे, ऑफिसबॉयच्या. अरुणने दुसऱ्या दिवशी सर्कल सिनेमाजवळ बोलाविले. मुलाखतीला पाच-सहा दिवसांचा वेळ होता. गेलो. तेव्हा अरुण, माधवराव लिमयेंना धर्मानंद कोसंबी हिंदीतून वाचून दाखविण्याचे काम करीत होता. माझी ओळख करून दिली. नोकरी आणि मुलाखतीसंबंधी सांगितले. त्यांना पदाधिकारी माहीत होते. अध्यक्ष श्री. रामेश्वर सारडा यांना चिठ्ठी देऊन मुलाखतीला जायला सांगितले. गेलो. मटलानी नावाचे गृहस्थ व्यवस्थापक म्हणून काम पाहत होते. वेळ दुपारी चार ते रात्री साडेआठ अशी पार्टटाईम होती. म्हणजे बाकी सारे उद्योग शक्य होते. तसाही सकाळी वर्तमानपत्रे टाकायचे काम करीत होतोच; पण ते सुटले कॉलेजमुळे. आता संघटनेचंही काम सुरू झालं होतं. मुलाखत झाली. मटलानींनी सांगितले, 'पार्ट टाईम जॉब आहे, पावणेदोनशे रुपये महिना पगार मिळेल.' विनंती केली, 'फार पगार नको काम पाहिजे.' माधवकाकांची चिठ्ठी आठवणीने दिली. अरुणला दुसऱ्या दिवशी रिपोर्टिंग केलं. मटलानींनी बोलावलेल्या दिवशी गेलो. काम पक्के झाले होते. खूप आनंद झाला. आता कुठेतरी नियमितपणा यायला लागला होता. ऑफिसात काम आहे म्हटल्यावर मोहनही खूश झाला. ऑक्टोबरच्या निकालात अर्थशास्त्र पास म्हणजे बारावी उत्तीर्ण झालो होतो. आता जूनमध्येच प्रवेश करायचा होता. बराच निवांतपणा होता. संघटना बांधली जात होती. अभ्यासवर्ग होत होते. न चुकता रविवारी बैठका पार पडत होत्या. अभ्यासवर्गातच लक्ष्मण माने यांचं उपरा मांडण्याची संधी मिळाली. आठवड्यात वाचून छान मांडणी केली; पण प्रस्तावनाच नव्हती वाचली. प्रस्तावनेची दहा-बारा पाने तेव्हा पुस्तकाचा भाग वाटली नव्हती. मांडणी आणि इतर कार्यकर्त्यांची मते ऐकून झाल्यावर अरुणने महत्त्वाची माहिती दिली व संस्कार केले, पुस्तक वाचनाचे. प्रस्तावनेचे महत्त्व सांगताच मानेंनी महत्त्वाचा उल्लेख केलाय तो म्हणजे 'उपरा' लिहिले तेव्हा त्यांच्या साऱ्या बहिणींची लग्ने झाली होती. अगोदर लिहिले असते तर कुणीही तयार झाले नसते. हा संदर्भ पुढे वाचनाचा गाभा ठरला. फार वाचन नाही झाले; पण जे केले तेव्हा आठवणीने पहिल्या शब्दापासूनच!

प्रमोटर्स अँड बिल्डर्सचे काम सुरू केले. कार्यालयीन कामासोबतच सभासद करण्याचे म्हणजे बिल्डर्सच्या कार्यालयात सभासद अर्ज घेऊन जाणे, त्यांना संस्थेची माहिती, फायदे, विषय करून सांगणे आणि सभासद फी आणणे फॉर्म भरून. कित्येकदा चार-

चार वेळा जावे लागायचे पायीच. मटलानीसाहेबांनी विचारले, ‘सायकल नाही का?‘ नाही म्हटले. पुढल्या कार्यकारिणीच्या बैठकीत माझा पाचशे रुपये ऑफिसिएल कर्जाचा, दरमहा पगारातूनच शंभर रुपये वजावटीचा अर्ज मटलानींनी पास करून घेतला. मधल्या काळात म्हणजे दोनच महिन्यांत रिकाम्या झालेल्या क्लार्कच्या जागेवर मला कामाचा उरक पाहून पद तेच ठेवून पगार दोनशे रुपयांनी वाढला होता. पावणेचारशे रुपये दरमहा? काय करायचे एवढ्या पैशांचे? त्यामुळे पाचशे रुपये कर्ज अन् बाकीचे दीडशे रुपये घालून नवीन सायकल घेतली. आता फारच सोय झाली होती. माझी अन् कार्यालयाचीही. मटलानींनी हळुहळू कार्यकारिणीच्या बैठकांनाही हजेरी लावण्यास सांगितले त्यांच्यासोबत. त्यामुळे कार्यकारिणीचे सभासद बिल्डर्स वैयक्तिक ओळखू लागले होते. अध्यक्ष रामेश्वरभाऊ सारडा यांना दररोजचे रिपोर्टिंग फाईलद्वारे व्हायचे. काही सूचना करावयाच्या झाल्यास चिठ्ठी लिहायचे किंवा बोलावून सांगायचे. प्रशासनाचा उत्तम नमुना म्हणजे रामेश्वरभाऊ. एक दबदबा असे त्यांचा. मोठ्या हॉटेलमध्ये मीटिंग व्हायच्या, रात्री उशीर व्हायचा. एक-दोनदा भाऊंनी विचारले कुठे राहतोस? सांगितले. तेव्हा ते आताचे नासिक्लब, तेव्हाचे नंदिनीमध्ये राहत होते. म्हणाले, ‘मीटिंग झाली की गाडीत बस.‘ काळजीपूर्वक अगदी पुतळ्यापर्यंत कारमधून सोडले. प्रत्येक सभासदाला आवर्जून संस्थेच्या लेटरहेडवर वाढदिवसाच्या शुभेच्छा पाठवायचे. एकदा सकाळी सातलाच नंदिनीवर पोहोचलो. सिक्युरिटीला सांगितले. त्याने फोनवरून आतमध्ये कळविले. कॉरिडॉरमध्ये बसायला सांगितले. दहा ते पंधरा मिनिटांत डोक्याचे केस कोरडे करीत भाऊ बाहेर आले, ‘काय रे अहिरे? काय महत्त्वाचे काम होते?‘ मी हसत नाही म्हटले आणि हातातील गुलाबाचे फूल त्यांना दिले. म्हटले, ‘भाऊ, आज तुमचा वाढदिवस आहे ना!‘ सातमजली खळखळा हसत रामेश्वरभाऊ म्हणाले, ‘अरे, तुला कुणी सांगितले?‘ घाबरत म्हणालो, ‘भाऊ, आपल्या सभासद अर्जात जन्मतारखेचा कॉलम आहे ना! अन् पहिला अर्ज तुमचाच आहे.‘ काय खूश झाले रामेश्वरभाऊ. चहा घेतल्याशिवाय परत पाठविले नाही. संस्थेचा एक विश्वासू कर्मचारी म्हणून कधीच वाहवा मिळविली होती. उत्तम प्रशासकाचे काम कसे असते, त्याचा दुसरा नमुना, रामेश्वरभाऊंचाच. बहुतेक राज्यस्तरीय फेडरेशनची बैठक असावी. निमंत्रक अर्थात भाऊच होते. मुंबई-पुण्यासह प्रातिनिधिक स्वरूपात प्रतिनिधी आले होते. बैठक अतिशय उत्तम झाली. जेवणही छान झाले. व्यवस्था नीट सांभाळल्याबद्दल साऱ्यांनी समाधान व्यक्त केले. दुसऱ्या दिवशी ऑफिसला आल्यावर रामेश्वरभाऊंनी फाईल घेऊन बोलावले. असे पहिल्यांदाच झाले

होते. कागदोपत्री सह्या झाल्यावर शांतपणे विचारले, 'आहिरे, काल बैठकीत ड्रिंक्स कुणी आणले होते?' म्हणालो, 'भाऊ मीच!' आवाज करडा करीत विचारले, 'कुणाच्या सांगण्यावरून?' मी उत्तरलो, 'भाऊ, एक-दोघांनी मागितलं मग कोल्ड्रींक्स सांगितले. सर्वांना नाही.' त्यांचाही गैरसमज दूर झाला, 'अरे ड्रिंक्स म्हणजे दारू कुणी आणली होती?' बाप रे! माझ्यासाठी शॉक होता. कारण कुणीही तसा वागतांना, वावरतांना दिसला नाही. बारकाईने आठवले, म्हटलो, 'हो भाऊ... साहेबांनी बैठक संपल्यावर त्यांच्या गाडीतून एक बॉक्स आणायला सांगितला होता. पण, नंतर तेच घेऊन आले. मला वाटते...?' अतिशय शांतपणे चेहऱ्यावर तणाव न ठेवता म्हणाले, 'ठीक आहे, जा. पण आपण कधीही दारू ठेवत नाही हं!' तिसऱ्या दिवशी एकट्या त्याच पदाधिकाऱ्याला नाही तर कार्यकारिणी सदस्यांना एक प्रेमाचे पत्र लिहून, जो दम रामेश्वरभाऊंनी भरला त्याच्यासाठी शालजोडी शब्द फारच लहान ठरावा. शुद्ध मराठीतील ते पत्र आजही स्मरणात आहे. असे अनेक प्रसंग या संस्थेचे काम करताना आले. ज्याचा माझ्या वैयक्तिक आयुष्यासाठी मोलाचा फायदा झाला.

दुसऱ्या बाजूला समता आंदोलनामुळे वैचारिक बैठक पक्की होत होती. पहिले समता संस्कार शिबिर पुण्याच्या हमाल भवनात अटेंड केले. प्रत्येक केंद्रातून (जिल्हा) फक्त पाच शिबिरार्थी निवडायचे होते. सारे विद्यार्थीच होते. त्यामुळे प्रवासखर्चही संघटनाच करायची. मी संघटनेत नवीन असल्याने माझा नंबर लागला नव्हता. फार निराश झालो. पण, आदल्याच दिवशी समजले, की निवड झालेल्यांपैकी एकाला जमणार नाही. अरुण ठाकूरच्या घरी धडक. म्हटले माझे तिकीट मी स्वतः काढतो; पण मला पाठवा. अरुणचाही नाईलाज झाला. दुसऱ्या दिवशी रात्रीची बस होती. सगळे जाणारे, पोहोचविणारे आले होते. तिकीट गाडीतच काढायचे होते. दोन गाड्या सोडाव्या लागल्या. एक शिबिरार्थी यायची बाकी होती. खूप राग येत होता. कारण मागील दोन्ही बैठकांना ती पाहिली नव्हती. अखेर आली. सारे खूश झाले. मी नवखा होतो. हाय-हॅलो करण्याचा प्रसंगच नव्हता. हळूच एकाला विचारले, 'कोण रे ही? दोन गाड्या सोडल्या हिच्यासाठी.' त्याने एका काटकुळ्या काळ्या सावळ्या पोरीकडे कौतुकाने बोट दाखवित सांगितले, 'ती! ती तर अनिता पगारे. डॅशिंग आहे.' मी हात झटकीत गाडीत बसलो. मनातल्या मनात दीडशहाणी म्हणत!

या शिबिरात फार मोठमोठ्या नेत्यांची चळवळीची भाषणे ऐकली. नोटस् काढल्या. प्रश्न विचारले, गटचर्चांमध्ये, वादविवादामध्ये भाग घेतला. भरपूर भूक लागायची. जेवण

अमर्यादित असल्याने कष्टाची भाकर केंद्राचे जेवण भरपेट हाणायचो. पुन्हा चर्चा. त्या पाच दिवसांमध्ये खूप संस्कार आणि विशेषतः वस्तीबाहेर वस्तीसाठी व्यापक विचार करणारा समूह मोठ्या संख्येने कार्यरत आहे, याची अनुभूती आली. पाच दिवसांच्या कार्यक्रमांची एक पुस्तिका, नियतकालिकासारखी शिबिरार्थींनीच काढायची, असे ठरले. संपादक मंडळात जाणे ऐच्छिक होते. मी मात्र पटकन सामील झालो. माहीत नाही का ते, पण आवडले अन् अतिशय चांगली पुस्तिका निघाली. हस्तलिखिताच्याच झेरॉक्स काढून वाटण्यात आल्या. जवळपास बारा ते चौदा पानांच्या पुस्तिकेत माझे एकमेव अर्ध्या कॉलमचे एक सदर होते. त्याचे नाव होते, ऐसा भी होता है... माझे पत्रकारितेचे पहिले लिखाण.

या शिबिरात दोन मुस्लिम शिबिरार्थींचा अनुभव फार नोंद घेण्यासारखा आला. गटचर्चेचा विषय असावा. रात्री जेवणानंतर विषय पूर्ण करण्यासाठी त्या गटातील मंडळी हॉलच्या गच्चीवर एका मुस्लिम शिबिरार्थीला घेऊन बसली. विषय होता देव, अल्ला आहे की नाही. मी मात्र झोपून घेतले. सकाळी उठल्यावर सहकारी मित्राला विचारले, 'काय झाले रे रात्री?' झोपही अर्धवट राहिल्याने तो वैतागून उत्तरला, 'काही नाही रे! रात्री दोनपर्यंत तो आमच्या देव-अल्ला नाही, याला प्रतिसाद देत होता. आम्ही पण खूश झालो, एकाला नास्तिक केले म्हणून. पण, उठताना काय झाले काय माहीत. तो म्हणाला, तुम कुछ भी बोलो लेकिन अल्ला हैच...!'

शिबिराच्या अखेरच्या दिवशी शिबिरार्थींच्या मनोगतात बोलताना एक मुस्लिम युवती म्हणाली, 'पूरे पाँच दिन क्या भाषण हुआ कुछ भी समझ में नही आया। लेकिन मुझे एक बात बहोत अच्छी लगी, वो यह की अगर घर पे खाने के लिये यह पत्रावळी वापरेंगे तो औरतों का कितना काम कम होगा।'

बाहेरचा वैचारिक परिघ वाढत होता. तसा वस्तीत येताच पुनः पुन्हा विद्रोह करावासा वाटत होता. काही गोष्टींना आपण प्रतिक्रियाही देत नाही अन् सहन करतो, याची चीडही निर्माण होत होती. हळुहळू ती बाहेर पडू लागली होती. प्रस्थापितांना हादरे देण्याचे प्रसंग येऊ लागले. सार्वजनिक कार्यक्रम ते नळावरच्या भांडणापर्यंत कौन्सिलिंग सुरू झाले. आणखी एक बाब खटकत होती, ती म्हणजे पोलिसांचा ससेमिरा! का जाणो, हे चुकीचे आहे असे वाटू लागले. पोलिस त्यांना वॉन्टेड एका कार्यकर्त्यासाठी बाकीचे दहा उगीचच जमा करू लागले. माझ्याही वाट्याला ते एकदा आले. कैलासचा (भावाचा) बँजो पार्टीचा धंदा होता. एकदा सकाळी कॉलेजमधून आलो. जेवण-नाश्ता काय ते केले. लुंगी लावली

अन् पुतळ्याजवळ आलो. तेवढ्यात एक रिक्षा येऊन थांबली. एकाने आवाज देऊन सांगितले, 'ए, मन्या, ही पाह्य सुपारी आली.' बँजोच्या चौकशीसाठी कुठले तरी मंडळ आले होते. मी माहिती देत होतो, तेवढ्यात एक पोलिस जीप आली. सारी पळापळ झाली. मला सवयच होती. मी बोलतच उभा राहिलो. कुठलीही चौकशी न करता इन्स्पेक्टरने गचांडी पकडली अन् गाडीत कोंबला. माझ्यासोबत एक जण अगोदरच गाडीत खेचला होता. काही समजायच्या आत गाडी भद्रकाली पोलिस ठाण्याकडे रवाना. गाडीत कुणीच काही सांगितले नाही. ठाण्यात एका बाकड्यावर बसविण्यात आले. अर्थात, पोलिसांच्या डिक्शनरीच्या शिव्या देतच. मी जरा भांबावून गेलो. १०-२०-२५ मिनिटं संपली. पुढं काहीच नाही. मी ठाणे अंमलदाराला विचारले, 'ओ साहेब, आम्हाला कशाला आणलंय इथं?' शिवी हासडतच एक हवालदार आला आणि एक फाटलेलं काळ्या रंगाचं टी शर्ट समोर धरून म्हणाला, 'हरामखोर, कुणाचं आहे हे सांग?' अगोदरच वैतागलो होतो. म्हटलो, 'आम्हाला काय माहीत?' तो घेऊन गेला. सवंगड्याने तात्काळ मला सांगितले. कुणाचे आहे ते. मी त्याला म्हटले, 'असं कुणाचंही नाव घेऊ नकोस.' त्याने अधिक माहिती दिली. काल सायंकाळी गल्लीत राईट (मारामारी) झाली होती. पोलिस आले होते. अमका एक हातात आला; पण तो हे टी शर्ट काढून सटकलाच.

मी म्हटले, घे आईची शपथ! त्याने घेतली. मी क्षणाचाही विलंब न लावता हवालदाराला हाक दिली, 'ओ साहेब! याला माहीत आहे.' पटकन् आला. पी. आय. कोरडेंकडे घेऊन गेला. म्हणाले, 'आणा त्या भडव्याला उचलून.' पुन्हा गाडी वाडग्याकडे निघायला लागली तर माझी आई, गीताई मी आतापर्यंत मिळविलेल्या प्रशस्तिपत्रांची फाईल घेऊन धावतच पोलिस ठाण्यात गाडीजवळ आली, 'साहेब, त्यानं काही नाही केलं. अहो, तो लई हुशार हाये पाहा!' साहेब थोडाच पाहणार होता. मीच म्हटलो, 'अगं आता घरीच चाललो. ने ती फाईल घरी'. गाडी निघाली, आलो. पुतळ्याशेजारीच संशयिताचे घर होते; पण तो नव्हता. तोपर्यंत सारी वस्ती दूरवर गर्दी करून पाहत होती. संशयिताचा भाऊ ताब्यात घेतला अन् गाडीत घातला. एवढ्यात इन्स्पेक्टर हळूच माझ्या कानात कुजबुजला, 'अजून कोण होतं सांग ना! लगेच उचलू.' आता थोडी भीडही चेपली होती. जोरात ओरडलो, 'ओ, मी काय खबऱ्या आहे का?' साहेबाने पुन्हा गाडीत बसविले आम्हा दोघांनाही. आता कसाईवाड्यातील चार-पाच ओळखीचे चेहरे पी. आय. कोरडेंच्या कॅबिनमध्ये समोर भिंतीजवळ उभे होते. इन्स्पेक्टरने संशयिताच्या भावाला फटके देत साहेबांसमोर उभा केला. त्यालाही कोपऱ्यात उभे केले अन् अगोदर

उभे असणाऱ्यांना विचारले, 'या दोघांपैकी कुणी होतं का रे?' आता मात्र घाम फुटला. खुन्नस म्हणून जर का होऽऽ म्हटले तर काय? पण ते खोटं नाही बोलले, 'नहीं, साब ये दोनो नहीं थे।' जीव भांड्यात पडला. साहेब परत गुरगुरला, 'या दोघांना मधी टाका अन् बाकीचे आणा उचलून.' माहीत नाही कुठून उर्जा आली; जोरात ओरडलो, 'ओ साहेब, ते नाही म्हणतात ना! अन् आम्हाला काय माहीत काय झाले? मी कॉलेजला जातो अन् सायंकाळी कामाला.' आता कोरडेसाहेब चमकले, 'या हरामखोराला आत घे', समोर. गेलो. विचारले, काय करतो, शिकतो? खोटं बोलण्यासारखं काही नव्हतंही. आणखी सारडांचे नाव सांगून फोन करून विचारायलाही सांगितले. बाकी साऱ्यांना लॉक-अपमध्ये पाठवून आम्हा दोघांना थांबायला सांगितले. शांत होत म्हणाले, 'अरे, आम्हाला काय आनंद होतो की काय, तुमचे नुकसान करायला? पण गाडी आली की सारे पळतात, मग आम्ही विचारपूस कुणाकडे करायची?' मुद्दा पटण्यासारखा होता. मी धीराने म्हटलो, 'साहेब, यापुढे माझ्या घरी पोलिस पाठवा; पण शिकणाऱ्या पोरांना उचलू नका. मी सगळी माहिती देत जाईल.' कोरडेसाहेब बऱ्यापैकी नरमले होते. म्हणाले, 'नको. तसं नको करू, त्रास तुला देतील; पण यापुढे बोलविलं तर ये.' थँक्यू म्हटले. हसून साहेब जा म्हणाले. आता हा विषय ऐरणीवरचा वाटू लागला होता. जवळच गणेश विसर्जनाचा कार्यक्रम होता. ड्राय डे असतो हे आता समजते; पण बाहेर दारू मिळत नाही त्या दिवशी एवढे मात्र माहीत होते अन् तेव्हा गणपतीची मिरवणूक वाकडी बारव, चौकमंडईपासूनच व्हायची. त्यामुळे रांग आपोआप वाडग्याला पार करून द्वारका पॉइंटपर्यंत जायची. मोक्याच्या ठिकाणी वाडगं होतं. दोन-तीन जणांनी वाघाडीतून फुगे (गावठी दारू साठविण्याची रबराची मोठी पिशवी) आणल्याचे पाहिले. दुसऱ्या दिवशी घेण्या-न-देण्याचा वस्तीत बाहेरच्यांचा राडा होईल, याचा अंदाज आला. पण, सांगणार कुणाला? भद्रकाली गाठले, तोपर्यंत कार्यकर्ता म्हणून वहीवाट सुरू झाली होती अन् आता तर संघटनेला ओळखणारे पी. आय. सुरेंद्र पाटील होते. हक्काने गेलो. परिस्थिती सांगितली. मिश्या पिळत खळाखळा हसले. म्हणाले, जा, करतो बंदोबस्त! अर्ध्या तासाने दहा-बारा पोलिसांचा ताफा पुतळ्याजवळ आला. मी उभाच होतो. पी.एस.आय. गायकवाडांनी माहीत असूनही मला ओळख दिली नाही. त्यांचा स्टँड बरोबर होता. घरी गेलो. जाताना पाहिले गावठी दारूचा घमघमाट सुटलाय. निरखून पाहिले तर नव्यानेच नगरपालिकेने बांधून दिलेल्या गटारींमधून पाण्याऐवजी दारूच वाहत होती. ज्यांनी आणली त्यांनी आपल्या मोरीतच दारूचे फुगे रिकामे केले होते. फार कुणी हाती लागले

नाही. पोलिसही तसेच परत गेले. एक समाधान वाटले मनोमन. ते म्हणजे साप भी मर गया, और लाठी भी नही टुटी. कुणीही अरेस्ट झाला नव्हता.

ही सुरवात होती वस्तीतील अन्यायकारक, घातक आणि स्वास्थ्य बिघडविणाऱ्या घटनांना प्रतिरोध करण्याची. कारण या वाडग्यावर अनेक हल्ले झाले. प्रशासनाचे वस्ती उठविण्याचे भूत तर आजही लोकांसमोरून जात नाही. परिणामतः आर्थिक ऐपत नसतानाही कूड जाऊन विटा-सिमेंटच्या भिंती उभ्या राहिल्या घरांच्या. मानसिकता मात्र तीच, वस्ती उठण्याची! आंबेडकरी नेतृत्वाच्या बऱ्याच सभा पाहिल्या वाडग्यात. नामदेव ढसाळ, राजा ढाले, रामदास आठवले आदी. आठवलेंवर वस्तीचं विशेष प्रेम होतं. पण, ही वस्ती जगविणाऱ्यांची फौज लहानपणी पाहिली, ती वेगळीच होती. एक घटना मनावर कोरली गेलीय, तिचा संदर्भ कसा लावायचा तो नंतर ठरवूया!

पलीकडे असलेल्या मुस्लिम म्हणजे कसाईवाड्यातील युवकांशी कायम भांडणं व्हायची. कशामुळं, कारण काय काहीच माहीत नाही. पण, तुंबळ युद्धच व्हायचं. अशीच एकदा मारामारी झाली. असाही वस्तीत अंधारच होता. पण, स्ट्रीटलाईटचा उजेड मात्र होता. आठची वेळ असावी, रात्रीची झाली हुल्लड. सारे सैरभैर पळाले. आपल्या संरक्षणार्थ. या वेळचा हल्ला थोडा पूर्वनियोजित असावा. समोरच्या वस्तीतल्या पोरांनी वाडग्याच्या म्होरक्याला टिपायचे ठरवूनच आले होते. तो गडीपण हमेशा अग्रभागी असायचा. पाच-पन्नासचा जमाव चाल करून आला. तुकड्या तुकड्याने एकेकाला गाठण्याचे धोरण अवलंबिले गेले. म्होरक्याला माणिकशेठच्या बंद दुकानाच्या कोपऱ्यात (कपारीत) घेरले. सात-आठ जणांचा जमाव असावा तो. मी जवळच पंधरा-वीस फुटांवरून पुतळ्याच्या मागे लपून सारा प्रकार पाहत होतो. म्होरक्यावर लाथा-बुक्क्यांचे प्रहार सुरू झाले. तो पण आपल्या परीने प्रतिकार, पलटवार करू लागला. एवढ्यात एकाने मोठा सुरा उगारला. सुरा इतका मोठा होता, की (ज्याने बैलाची हाडे फोडली जायची) एका घावात म्होरक्याचा मेंदू बाहेर यावा. सुरा उगारणाऱ्याने वार करावा, तोच अतिशय वेगाने इन्स्पेक्टर जंगम यांची बुलेट आली. तिचा हेडलाईटचा उजेड मारणाऱ्याच्या हातावरच पडला. जंगमसाहेबांनी तशीच बुलेटवरून उडी मारून त्याला पकडले. त्याने पटकन सुरा खाली टाकला; पण साहेबांनी एक भनकावून, त्याला उचलायला लावला. बाकीच्यांनी तोपर्यंत धूम ठोकली होती. आमच्या म्होरक्यानेही. काही पकडले गेले, काही पळाले. तेव्हापासून सारेजण वाडग्याच्या संरक्षणाची चिंता करू लागले. नजीकच आंबेडकर जयंती होती. दरवर्षी म्होरक्या आपला अध्यक्ष नेमायचा. सारे अर्थकारण,

वर्गणीचे हाती राहावे म्हणून. मला त्यात फार इंटरेस्ट नव्हता; पण पंधरा फुटांवरून पाहिलेला प्रसंग डोळ्यांसमोरून जात नव्हता. कधी कधी म्होरक्याच्या ठिकाणी स्वतःला पाहायचो अन् हादरायचो. या वेळी रणनीतीच ठरविली. कार्यकारिणीत घुसायची. बैठक लागली. सुरवात म्होरक्यानेच केली, एक नाव जाहीर करून टाळ्यांच्या गजरात नाव मंजूर, अध्यक्षपदाचे! माझ्या हालचालींची कुणकुण त्याला लागली होती. सावध होता; पण मीपण त्याच मातीचं पाणी पीत होतो ना! अध्यक्ष जाहीर होताच आणखी एक जण उठला आणि उपाध्यक्षपदासाठी माझे नाव घोषित केले. अगोदरच ठरलेल्या वीस-पंचवीस टाळ्यांनी बाकीच्यांनाही भाग पाडले. शिक्षित असल्याने तसा दबदबा होता. भाषण करायला उभा राहिलो. दोन सूचना मांडल्या. एक म्हणजे सर्व आर्थिक व्यवहार खजिनदार सांभाळील. मंजूर! रामदास (माझा मित्रच) झाला खजिनदार. दुसरी सूचना यंदा घरोघर जाऊन वर्गणी मागायची नाही वस्तीत. १ ते ७ तारखेपर्यंत सगळ्यांचे पगार होतात. एप्रिलच्या १ ते १३ तारखेपर्यंत पुतळ्याच्या हॉलबाहेर सायंकाळी ५ ते रात्री ८ दोन कार्यकर्ते पावतीपुस्तकं घेऊन बसतील. ज्यांना इच्छा असेल ते येऊन फाडतील. आग्रह केला जाणार नाही विशिष्ट रकमेचा अन् बाकी (उधारी) कुणाचीही ठेवली जाणार नाही. सारे काही विपरीतच होते. म्होरक्या याला खावू की गिळू असाच पाहत होता. कारण प्रत्येक सूचनेला टाळ्या पडून मंजुरी मिळत होती. मग मुद्दा उपस्थित झाला, एवढं १०-१२ दिवस दररोज तीन तास कोण बसेल टेबल मांडून? मी स्वतः जबाबदारी स्वीकारली. रामदासनेही होकार भरला, सोबतीला राहण्याचा. मी तिसरी सूचना मांडली, मग बाकीचे काय करतील? त्यांनी आसपासच्या पावत्या फाडायच्या; पण त्या दिवशीची वर्गणी खजिनदाराकडे जमा करून सही घेऊनच घरी परत जायचे. खरे पाहता माझे सारे प्रस्ताव सगळ्यांना सुखावून गेले; पण समोर म्होरक्याला कोण सांगणार? पावतीपुस्तके आली. १ तारखेला ठरल्याप्रमाणे टेबल मांडले. दरवर्षी जयंती झाल्यानंतरही काही घरांची वर्गणी बाकी (उधारी) असायची. पण, या वेळी चमत्कार झाला. ९ तारखेला प्रत्येक घराची वर्गणी गोळा झाली होती. टेबलावर येऊन आणि विशेष म्हणजे गेल्या वर्षी ५१ रुपयांसाठी रडणारा नागरिक १५१ रुपये देऊन गेला. अशी वाढीव वर्गणी मिळत होती. हे फक्त मला आणि खजिनदार रामदास दोघांनाच माहीत होते. रामदासला अगोदरच सांगून ठेवले होते. जमली त्याच्या चाराणे-तीस पैसेच रक्कम सांगायची. बाकीचे सारे सहकारी पाहिला ना शहाणपणा? असे डिवचू लागले. म्हटलो, 'पुढल्या वर्षी हा प्रयोग कॅन्सल!' जयंतीची मिरवणूक झाली. सारे काही पार पडले. तिसऱ्या दिवशी पहिल्यांदा

डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीचा जमा-खर्च फलकावर नागरिकांच्या माहितीसाठी लिहिला गेला. तेव्हा मात्र सगळेच बुचकळ्यात पडले. जवळपास ६-७ हजार रुपये शिल्लक राहिले होते. मग सूचना सुरू झाल्या. सामना, मेळा, गायन पार्टी, ऑर्केस्ट्रा आदी. म्हटलो, बैठक घेऊ. दुसऱ्याच दिवशी बैठक. हॉल तुडुंब भरलेला. साऱ्यांनी परत सूचना केल्या त्याच. बीजभाषण माझेच ठरलेले असायचे. उभा राहिलो. म्होरक्याच्या पुन्हा ध्यानात आले, एक पै आपल्या हाती हा येऊ देणार नाही. मी सुरवात करण्याअगोदरच मध्येच उभा राहून म्हणाला, 'हे पाहा भो, जो सगळ्यांचा निर्णय होईल तो मान्य करावा लागेल. बाकी शहाणपणा नाही चालणार. बस.' सुरवात केली. वरील सगळ्या गोष्टींना अगोदर पाठिंबा जाहीर केला. टाळ्या. मग माझा पत्ता टाकला, 'हे सारे प्रकार तर, आपण दरवर्षी करतोच. यंदा नाही केले तर?' एकाने प्रश्न केला, 'मग उरलेल्या पैशांचं काय करायचं?' सांगतो म्हटले अन् मग मारामारीचा तो प्रसंग उभा केला. आपण का पळतो ते सांगितले. कारण हत्यारच नसतात हाती. मग या पैशांतून आपल्या वस्तीच्या संरक्षणासाठी गुप्त्या तयार करून घ्यायच्या. चांगला शिकला सवरलेला पोरगा अन् ही भाषा? साऱ्यांना आश्चर्य वाटत होते. पण, माझा आवाजही टिपेला पोहोचला होता. मुद्दा पटवून देण्यात यशस्वी झालो. निर्णय झाला. पन्नास गुप्त्या तयार करून प्रत्येक कार्यकर्त्याच्या घरात एक ठेवायची. प्रत्येकाने मनमुराद टाळ्या वाजवून दाद दिली. म्होरक्याने तर कडकडून मिठीच मारली तिथल्या तिथे. कारण साऱ्यांना वैयक्तिक मतभेद माहीत होते. पण, प्रसंग त्याच्यावर गुदरला होता, मार्ग मी सांगत होतो. अर्थात, तिथे अन्य कुणीही असता तर माझी हीच भूमिका असती. असा हा वाडग्याचा आणखी एक टप्पा ज्याला आपण PROTEST FOR SERVIVAL असा म्हणावा लागेल.

आता नागसेननगर झाले होते. ही वस्ती संमिश्र जाती-जमातीची होती. कुणी कधी आक्षेप घेतला नाही. पण, संघटनेत व्यापकता पाहत होतो. जातीव्यवस्थेची रचना, त्याची उतरंड अभ्यासत होतो. म्हणून कदाचित मला एक भीती नेहमी वाटत होती दुफळीची आणि वस्ती टिकवायची असेल तर एकजूट हा फार मोठा दुवा होता आणि ती सिद्ध करण्याचा एकमेव कार्यक्रम होता, डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती! माझी भीती फार काळ टिकली नाही. पुढल्याच वर्षी जयंतीची बैठक लागली. बोर्डावर वेळ, आवाहन करण्यात आले होते. रात्री साडेआठची वेळ बोर्डावर होती; पण सुरू व्हायची दहाला. साऱ्यांना माहीत होते; पण मी आठला पुतळ्याजवळ येऊन थांबलो. एवढ्यात चार-पाच कार्यकर्ते आले आणि सांगू लागले, 'ए मनू, त्या खालच्या आळीत मीटिंग सुरू

आहे जयंतीची, गारुडी लोकांची.' म्हटले मग? 'नाही, नाही असं नाही चालणार सांगून ठेवतो.' त्यांच्यापैकी दोघांना सांगितले त्या बैठकीला जा. शांत बसा. काय निर्णय होतो तो पाहा. विठ्ठलला आणि सकटबाबाला बैठकीचा निरोप द्या. आणखी आले तर उत्तमच. बाकी भनकस नाही करायची. पोरं माझा मेंदू ओळखून होते. हसले आणि गेले. दहापर्यंत सारे आले होते. माझे डोळे चाचपणीकडे होते. दहाला विठ्ठल नाडे आणि समाजाचे बुजुर्ग कार्यकर्ते सकटबाबा आणखी दहा-बारा जण आले. म्होरक्याला याची काहीच माहिती नव्हती. तोपर्यंत बैठकीचा वृत्तांत माझ्यापर्यंत पोहोचला होता. उदात्त हेतू होता; पण घातक होता. यंदा फक्त गारुडी समाजाची वर्गणी काढून स्वतंत्र मिरवणूक काढण्याचा निर्णय झाला होता त्यांचा!

बैठक सुरू झाली. मी फिल्डिंग लावून बसलो. पण, आपल्याला काही माहीतच नाही अशा आविर्भावात. विठ्ठलला अगोदरच पुढे बसायचा आग्रह करून ठेवलेला. म्होरक्याने सालाबादप्रमाणे आपला अध्यक्ष घोषित केला. बाकी कुणी उठण्याअगोदरच मी उभा राहिलो. आता घाबरायची पाळी त्याची होती. आमच्या बैठकीत निर्णय जरी एकतर्फी होत होते, तरी लोकशाही मार्गानेच. आता मन्या काय खो घालतो, असा साऱ्यांना सवाल. मी हसून घोषित अध्यक्षाच्या नावाला अनुमोदन दिले. टाळ्या. तेव्हा कुठे म्होरक्याचा जीव भांड्यात पडला. मी पुढे सरकलो, बाकीची प्रस्तावना न करता सूचना मांडली, 'आपली वस्ती सगळ्यांची तशी जयंतीही अन् बाबासाहेबही सगळ्यांचेच (टाळ्या) म्हणून यंदाच्या मंडळाच्या उपाध्यक्षपदी ज्येष्ठ कार्यकर्ते विठ्ठल नाडे यांच्या नावाची शिफारस करतो.' माझ्या सूचनेला अनुमोदन देण्यसाठी रामदास तयारच होता. ठराव पारीत. आता चेंडू विठ्ठलच्या कोर्टात. जाम खूश झाला. उभा राहिला. म्हणाला, 'मंडळानं मला हे पद देऊन जो बहुमान केला, त्याबद्दल मी आभारी आहे. यावर्षी आम्ही समाजाची वेगळी मिरवणूक काढणार होतो. ती मी रद्द करीत आहे.' टाळ्यांचा कडकडाट! बैठकीअगोदर तक्रार घेऊन आलेल्या कार्यकर्त्यांनी माझ्या चलाखीला दाद दिली.

आज मी विचार करतो. मी अतिशय कमी वयाचा कार्यकर्ता. एक वस्ती टिकविण्यासाठी एवढ्या क्लृप्त्या लढवितो. माझ्या अगोदरच्या पिढीसमोर तर यापेक्षा मोठी आणि आक्राळ विक्राळ आव्हानं होती. त्यांनी कसं पेललं असेल हे सारं?

वस्ती, गल्ली, नगर अशा नामावलीत प्रत्येक वस्तीचा प्रवास असेल, हे वेगळं सांगायला नको. तेव्हा फार लहान-सहान परंतु नाजूक भक्कम अशा धाग्यांनी नागसेनवाडीची वीण बांधली गेली होती. हे सारं चित्र अनुभवण्याची अर्धी संधी वहिनीमुळेच उपलब्ध

होत होती. मी कॉलेजात जायचा लागलो. अरे-कारेचं रूपांतर अहो-काहोत कधी झालं कळालं नाही. आता वहिनी थोडी फार घाबरायला लागली होती. अर्थात, तो माझ्या शहाणपणाला दिलेला मान होता. शिक्षण नावाच्या अध्यात्माचा सन्मान होता. एकदा असाच कॉलेजमधून आलो. काही जुन्या सवयी अजूनही गेल्या नव्हत्या. वहिनी घरात नव्हती. शेजारी विचारले तर माहिती मिळाली, अमक्याचं कुणीतरी गेलंय (मेलंय) तिथे गेलीय. तिची सवय मला माहीत होती. ही जाणार, मढं (देह) कुणाचंही असो, अगदी त्याच्या डोक्याजवळ जाऊन बसणार अन् अशी रडणार की मुडद्यानंही उठून विचारावं की काय झालं? असो. गेलो. पाहिलं. चित्रात फरक अजिबात नव्हता. मृतदेहाजवळ बसलेल्या बाईच्या अन् वहिनीच्या रडण्यात काहीच अंतर नव्हते. मी गर्दीत आत शिरून समोर मृतदेहाच्या पायांच्या बाजूला हाताची घडी घालून उभा राहिलो. तीन-चार मिनिटांत वहिनीची नजर पडली. हळूच उठली अन् निघाली. मी मागेच होतो. घरात शिरताच मी तिच्यावर डाफरलो, 'कोण हाये ते आपले? हाँ हाँ करीत रडत होतीस?' वहिनी थोडी कावरीबावरी झाली; पण सावरत परतीचं उत्तर तिच्या भाषेत दिलं, 'पाहा ओ बाई! (आई होती शेजारी) कुणाच्या मेल्या गेल्याला जाऊ नाही का? हा मुडद्या पाहा काय म्हणतो.' मी पण तिचाच चेला होतो. म्हटलो, 'खबरदार, याच्यापुढं अशी बोंबा मारीत दिसलीस तर कुठं?' एका बाजूला तिनेच वाढलेलं ताट रिकामं करीत होतो. थोड्याच दिवसांत असाच प्रसंग घडला. आता मात्र रडायला जाताना माझं टायमिंग सेट करून जाऊ लागली. पुन्हा गेलो. मढं दुसरं होतं. क्रम तोच. पण, मला पाहताच आपण टीव्हीचं चॅनल बदलावं तसं ढसाढसा रडणारी सोनूबाई थांबली. पदराने डोळे पुसत खाडकन् उठली, आले गं बाई म्हणत जवळजवळ घराकडे पळाली. मी मागेच. आईने वहिनीला विचारले, 'काय गं सोनू, लगेच आली? गेली का काय मैत (मयत)?' माझ्याकडे रागाने पाहत म्हणाली, 'नाही ओ; पण हा मुडद्या आला नं मागंच!' आई समजायचे ते समजली अन् हसायला लागली. माझ्या बोलण्याचा परिणाम साधल्याने मोठ्याने हसू आले. आता वहिनीपण हसत होती. एक मात्र ॲफेडेव्हीटवर लिहून द्यायला तयार आहे, की वहिनी, सोनूबाई रडायची ती मनापासून. कारण, जाणाऱ्या माणसाची (व्यक्तीची) अन् तिची नाळ फार घट्ट असायची. त्यांच्या आठवणीनेच ती रडायची. परिवारातलं एक नातं कमी झालं म्हणून! अशा खूप सोनूबाई नागसेनवाडीचं रक्षण करीत होत्या. १९८३ मध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पुतळ्यावरून दंगल झाली. सारं नाशिक पेटलं होतं. आमची वस्ती अग्रणी असल्याचं मोठं कारण होतं. पुतळा द्वारका पॉइंटवरून पोलिसांनी उचलला

होता. तेव्हा नेमका मी मामाकडे ओझरला गेलो होतो. दोन दिवसांनी परतत होतो. द्वारका पॉइंटवरच उतरलो बसमधून. पाहतो तर काय? भर दुपारी सगळीकडे सामसूम, उजव्या बाजूला संत कबीरनगर, वाल्मीकनगर (तेव्हाची भंग्याळी), मातंगवाडा, पुढे राजवाडा अन् बेला पेट्रोलपंपापासून (डाव्या बाजूने) ते वामनदारांच्या घरापर्यंत रस्त्यावर दगडांची आरास, मोठ्या संख्येने पोलिस, हातात बंदुका, डोक्यावर हेल्मेट. एखाद्या छावणीचेच रूप आले होते. जवळच्याच गारुडाळीमधून घुसलो. घरी पोहोचलो. पाहतो तर काय? ओसरीतल्या लोखंडी पलंगाखाली दोन ॲल्युमिनिअमचे पातेले लाल तिखटाच्या पाण्याने भरलेले. घरात कुणालातरी विचारले, उत्तर मिळाले, अरे कालपासून दंगल सुरू आहे. आपला बाबासाहेबांचा पुतळा पोलिसांनी हलविला. बातमी अर्धीच ऐकली. आपला म्हणजे नागसेनवाडीचा असा समज करून कैलासने कधी काळी एक चामड्याचा मोठा चाबूक आणला होता तो काढला बाहेर. चाबकाची लांबीच आठ फूट असावी अन् निघालो पुतळ्याकडे. पोरं सारी पांगलेली होती. चाबूक माझ्या उंचीच्या अन् वयाच्या मानाने फार लांब होता. पण, निघालो घेऊन. चार-पाच घरं ओलांडली असतील. एका बाईचा आवाज आला, 'ए गाभरा, इकडं ये.' (गाभरा, एक प्रेमळ शिवी) आवाज तर वहिनी किंवा आईचा नक्कीच नव्हता. आवाजाच्या दिशेनं पाहिलं. ती बबनबाई शिंदे होती. गेलो. म्हटलो, 'काय वं आई?' (आम्ही बरीच पोरं आयांना आईच म्हणायचो, प्रत्येकाच्या) जवळ जाताच चाबूक घेतला हातातून. म्हटलो, आता ही सांगेन पळ घरी, कुठं चालला दंगलीत मरायला? पण ती आमची, वस्तीची, आंबेडकरी चळवळीची प्रेरणा, स्फूर्ती, बलस्थान होती. हातातल्या चाबकाच्या तीन घड्या करून हातात दिला, अन् म्हणाली, 'आता जाय, तसा गेला असता तर तुलाच गुंडाळून घेतलं असतं चाबकानं.' एका वाक्यात चाबूक चालविण्याचं प्रशिक्षण तिने मला देऊन टाकलं. आज अनेक उत्सव होतात. मिरवणुका निघतात. तुलना करीत नाही; पण आंबेडकर जयंतीच्या मिरवणुकीत सामील महिलांची संख्या नजरेत भरणारी असते. आजही बाबासाहेबांची चळवळ खऱ्या अर्थाने महिलांच्या हातात आहे की काय, असा भाबडा प्रश्न पडतो.

## वाडग्यातून बाहेर...

तेव्हा पाहिलेल्या, भोगलेल्या गरिबीला, भुकेला आजही दोष द्यावासा वाटत नाही. पुढं कधीतरी एक मिळमिळीत गाणं शिबिरात ऐकलं होतं, ‘हे असे आहे तरीपण, हे असे असणार नाही. दिवस तुमचा येत आहे. तो घरी बसणार नाही.’ मला मात्र अजून दिसतंय की, तो दिवस आपोआप कधीच येणार नाही. तो आणावाच लागतो. हिमतीने, कष्टाने, मेहनतीने, अक्कल-हुशारीने नाही जमलं तर ओरबाडून, हिसकावून, धमकावून! पण, तुम्हालाच आणावा लागतो. तो गेल्या चाळीस वर्षांत (माझ्या आयुष्याच्या तरी) आला नाही. मी म्हणतो दोष द्यावासा वाटत नाही. कारण तो फरक मानवनिर्मित आहे, हे समजायलाच अनेक वर्षे लागली.

देव मात्र सार्वजनिक आयुष्यातून फार अगोदरच हद्दपार झाला होता. त्यासाठी फार प्रयत्न करावे लागले नाहीत. पुढे तर जेव्हा बाबासाहेब समजायला लागले तर मात्र तेव्हाच्या निर्णयाचा आजही अभिमानच वाटतो.

माधव एकदा फार आजारी होता. तापाने फणफणला होता. घरातला कर्ता माणूसच

अंथरुणावर म्हटल्यावर उपासमार आलीच. जवळपास आठ दिवस ताप अंगात होता. घरातले एक-दोन तांबे, पितळाची भांडी, कानातली डुलं, नाकातली नथ अगदी पायातल्या चांदीचे जोडवे (अंगठी) वहिनीनं सारं गहाण ठेवलं अन् चूल पेटती ठेवली. तेव्हा ताईबाईपण इकडेच होती. आता काहीच उरलं नव्हतं. एक शेळी पाळली होती. आजारी असूनही माधवनं विकायला विरोध केला. कारण घेणारा कसाई होता. सारे माधवच्या मतात सामील होते. शेवटी ठरलं की बुधवारच्या बाजारात, गंगेवर नेऊन विकायची. माधवसोबत मी गेलो. ताप अंगात असताना, चाराण्याच्या विड्या अन् एक माचीस एवढा शिधा घेऊन निघालो. मी म्हणालो, ‘शेळी दे माझ्याकडे.’ गुपचूप दोरी हातात दिली. गंगेवर बाजारात गेलो. गिऱ्हाईकं आली, फार पाडून किमती सांगू लागली. माधवला बाजारभाव माहीत होता. नाही म्हणत होता. चार-पाच गिऱ्हाईकांत एक आले. माधवला किंमत विचारली. मला आता आठवत नाही; पण तो कबूल झाला. पण, माधवने नकार दिला शेळी द्यायला. मला काहीच समजले नाही. बाजार अर्ध्यापेक्षा जास्त उठला होता. माधवचा ताप वाढत असावा. म्हटला, ‘जाऊ दे, चल घरी. नंतर पाहू.’ आम्ही निघालो. गंगेवरच्या रोकडोबा तालमीजवळ ओट्यावर माधव बसला. पोटात अन्नाचा कणही नव्हता. आणखी अंगात ताप. धापा टाकीत खिशात हात घातला. चाराणे निघाले. म्हणाला, ‘दहा पैशांचा भत्ता घे अन् बाकीच्या बिड्या आण.’ शेजारीच दुकान होते, आणले. पुडा सोडला त्यानेच. म्हणाला, ‘खाऽऽ. मी म्हणालो, तू पण घे. पण भत्त्याची क्वांटीटी पाहून नाही म्हणाला. आता घरी कसे जावे, असा विचारच करत असताना माधवचा मार्केटमधला एक सहकारी रिक्षा टेम्पो घेऊन जात होता. त्याने पाहिले. थांबला. बसा म्हटला. छान वाटले. आरामात माधव, मी अन् शेळी मागच्या बाजूला बसून घरी आलो. तो शेजारीच कसाईवाड्यात राहत होता. वहिनी अन् ताईबाईने खुणेनंच विचारले. मीही नकारार्थी मान हलविली. माधव तर घरात घुसताच घोंगडीवर आडवा झाला. त्याला ताईने पाणी दिले. कुठून तरी गूळ आणला होता, त्याचा एक कप चहा करून पाजला. आता माधवला तरतरी आली होती. मग ताईनेच त्याला विचारले. तर म्हणाला, ‘नको, तिथंही साले कसाईच होते. राहू दे...’ आम्हाला माधवचा जीव अधिक प्यारा होता. आता तापही आणखी वाढत होता. बाहेर येऊन ताईने मला सांगितले, ‘सकाळी जो वस्तीतलाच कसाई होता (पहिलं गिऱ्हाईक) त्याला बोलावून आण.’ मी धावत गेलो. आला, पण आता भाव त्याने सांगायचा होता. घराच्या बाहेरच ताईने त्याला गाठले अन् परिस्थिती सांगितली. पण, आता तर त्याने आणखी पन्नास रुपये

कमी सांगितले. कसाईच तो. दिली शेळी. ताईने मला सोबत घेऊन राजवाड्यातल्या डॉक्टरला घरी घेऊन आली. त्याने इंजेक्शन, औषधं दिली. मेडिकलमधून गोळ्या आणल्या. उपाशीपोटी देऊ नका म्हणून सांगितले. ताईने कणकेचा भात केला. त्यात लाल तिखट-मीठ घातले अन् बळजबरी माधवला खावू घातले. गोळ्या दिल्या. माधव शांत झोपला. तापही उतरत होता. तोपर्यंत ताईने काळा गुळाचा चहा अन् बटर (पावाचा प्रकार) बाकीच्यांसाठी केले होते. ते खाल्ले. सायंकाळी झोपेतून जागे झाल्यावर माधवने विचारले, 'पैसे कुठून आणले?' ताई फार घाबरायची माधवला. गप्प कोपऱ्यात उभी. वहिनीने एक कानफडात बसेल अशा तयारीने खरेखरे सांगितले. दोघींना पाच-सात शिव्यांचा लाभ झाला; पण परिस्थिती त्याला माहीत होती. तोही हतबल होता. परत आडवा होत म्हणाला, 'याच्यापुढं घरात जनावरच आणायचं नाही.' अजूनपर्यंत दिसलं नाही.'

१९७९ चे वर्ष होते. बापाच्या मृत्यूचा दाखला आहे म्हणून ठामपणे वर्ष लिहू शकतो. गणेशोत्सव सुरू होणार होता. आम्ही दहा-बारा सवंगड्यांनी मिळून गणपती बसवायचे ठरविले. वर्गणी जमा केली. अडीच-तीन रुपये झाले असतील. शेजारी दोन-तीन झोपड्या सोडून एका मित्राच्या ओट्यावर दोन बाय दोन-अडीच फुटांचे डेकोरेशन केले. ७५ पैशांचा गणपती आणला. बसविला. आत लाकडी भुश्याचा डोंगर, फुलं-पानं असं काहीतरी डेकोरेशन केलं होतं. मांडव बांधण्यातच दिवस गेला होता सगळ्यांचा. तयारी पूर्ण झाली होती. सायंकाळी आरती म्हणायची होती, दररोज. मग प्रसाद. तीन-चार केळीही आणली. पण, आरती कुणाच्या बापाला येत होती? साऱ्यांना माझ्या वाचनावर दांडगा भरवसा होता. दहा पैशांचं आरतीचं पुस्तक आणलं. गणपतीशिवाय इतरही देवांच्या आरत्या असतात, पहिल्यांदाच कळालं. सारी तयारी झाली होती. सायंकाळची वाट पाहत होतो. इकडे घरी म्हातारा म्हणजे माझा बाप, देवराम बाबा खूप आजारी होता. अंथरुणावरच पडून होता. पाच-सात दिवसांपासून काही खाणेही बंद केले होते. आता घरी तशी खाण्याची परवड नव्हती; पण तब्येत साथ देत नव्हती. सारखीच खालावत होती. त्याच्या खोलीत फारसे कुणी जात नव्हते. हगण्या-मुतण्याच्या वासाने दुर्गंधित झालेली होती. सोनूबाई सारं करायची त्याचं. आई होती; पण कामावर जायची. गेलो तर मीच. पण, पटकन् बाहेर पळायचो वासाने. तर इकडे गणपतीचीही तयारी झालेली. एवढ्यात वहिनीने हाक मारली. पळत गेलो. पैसे हातात दिले. म्हणाली, 'जा पटकन भजे घेऊन ये चौकमंडईतून. पहिल्यांदाच काहीतरी खायला मागितलंय म्हाताऱ्याने!' खूप

राग आला होता; पण नाईलाज होता. पळतच गेलो, एक प्लेट भजी रामच्या हॉटेलमधून आणून दिली. आई, ताई, वहिनी बापाला चमच्याने दूध पाजत होत्या. भजी दिली अन् पळालो गणपतीकडे. बाकीच्या सहकाऱ्यांनी सारी तयारी करून ठेवली होती. थोडे वैतागलेही होते. वेळ झाला म्हणून. आलो. एकानं आरती हातात दिली अन् मी लहानशा आरतीच्या पुस्तकाचे पान उघडले. आरतीला सुरवात केली. बाकीच्यांनी टाळ्यांनीच साथ द्यायला सुरवात केली. त्या मेणबत्तीच्या उजेडातही साऱ्यांचे चेहरे उजळून निघाले होते. एका कार्यसिद्धीच्या कामामुळे. दुसरे कडवे सुरू केले अन् माझ्या घरातून एकदम बायांचा रडण्याचा एकत्रित आवाज आला. पुस्तक अन् आरती टाकून तसाच घराकडे पळालो. बापाने जीव सोडला होता, अर्धच भजं खावून. एक आघात झाला होता माझ्या बालमनावर. पुढे चळवळ, वाचन, वास्तव याचं भान येत असताना तो अधिकच गडद झालाय. हा कसला आला विघ्नहर्ता? कमीत कमी आरती तर पूर्ण होऊ द्यायची होती ना? बापाचा जीव जाण्याअगोदर! तेव्हाचे ते बालमनाचे प्रामाणिक वाक्य आज शाश्वत सत्य म्हणून स्वीकारले आहे.

त्याच काळात अलीकडे-पलीकडे मनोजकुमारच्या जय संतोषी माँ सिनेमाने महाराष्ट्रात थैमान घातले होते. मराठी माणूस वेडा होण्यास पार उपद्व्याप करावे लागत नाहीत, हे आता गणपती दूध पितो अशा उदाहरणांनी अनेकदा सिद्ध झालंय. जय संतोषी माँने आमच्या वाडग्यालाही पछाडलं होतं. माझ्या आईनेही सोळा शुक्रवार केले. त्याचं साग्रसंगीत उद्यापन केलं. खीर, भजी, वरण-भात असा मोठा बेत केला होता. मला मजा वाटली. चला खायला तर चांगले मिळतेय. शिवाय आंबट-चिंबट, वैशाट अजिबात नाही. आईसोबतच अनेक महिला शुक्रवारचा उपवास करायच्या. सकाळपासून उपवास करायच्या. सोळा शुक्रवार आणि अखेरच्या शुक्रवारी वर सांगितल्याप्रमाणे सांगता करायची. तोपर्यंत किमान उपवासकर्त्याने किंवा कर्तीने आंबट-चिंबटला शिवायचंदेखील नाही. आईमुळे आता माझीही वेगळी शाकाहारी भाजी होऊ लागली. पण, दररोज नव्हती. वस्तीत सायंकाळी उपवास सोडण्याअगोदर सोळा शुक्रवारची कथा क्रमशः वाचनाचे काम आपोआप माझ्याकडे आले. बामणाप्रमाणे शुक्रवारची वेळ ठरवून दिलेली असायची. अर्थात, पोथी वाचायची तयारी करूनच. सर्वांची सुरवात एकाचवेळी झाल्याने पोथीचा क्रम फार बदलत नव्हता आणि उपवास सोडताना गूळ व फुटाण्याने सोडायचा असे. मला जरा अधिकचे मिळायचे बामण म्हणून. प्रत्येक घरी पोथी वाचायला गेल्यावर एक प्रश्न विचारला जायचा, 'ए मन्या, आज मटण नाही खाल्लं ना!' कारण साऱ्यांना

माहीत होतं. आमच्या घरात एकच भाजी असते, मटण! पण हो म्हटलो तर गूळ-फुटाणे जायचे. मानेनंच नाही म्हणायचो. 'मग ठिकाय, वाच पुढं', आदेशवजा विनंती व्हायची. त्या दिवशी सायंकाळी घरी जेवण करायचो नाही. गूळ-फुटाण्यांनी पोट भरलेलं असायचं! अशावेळी संतोषी मातेशी एक समझोता करायची कल्पना सुचली अन् ती मस्त शंभर टक्के पार पडली.

एका शुक्रवारी सकाळी उठलो, डोळे चोळत आईकडे गेलो. म्हणालो, 'आई, रात्री मला एक स्वप्न पडले. एक बाई माझ्या स्वप्नात आली. आता आई वर्णन ऐकून कान देऊन ऐकू लागली होती. मी सारं पुस्तकात, पोथीत वाचलेलं, संतोषी मातेचं वर्णन करीत होतो. पांढरी साडी, मोकळे सोडलेले केस, मोठे डोळे, पण बाई देखणी. काय काय पुड्या सोडल्या आता आठवत नाही; पण साऱ्या भरलेल्या निघाल्या. आई म्हणाली, 'अरे बाबा, तुझ्या सपनात तर संतोषी माताच आली मन्या!' मी उसणं अवसान आणून म्हटलो, ह्या काहीतरीच काय बोलतेस? उपास तू केले अन् सपनात माझ्या कशाला येईल?' आई पुढे म्हणाली, 'अरे, तसं नाही, तू तिची पोथी वाचतो ना दर शुक्रवारी? तुला दिष्टावा दिला (दृष्टांत) संतोषी मातेनं!' आता गाठ पक्की करायची वेळ माझी होती. 'आता गं आई? काय करायचं?' आई म्हणाली, 'मन्या, तू उपास कर. तुला पावंल ती.' मी जुजबी उत्तरलो, '(अटी, शर्ती) पण तिचेही फार कडक असतात ना! अन् आपल्या घरात तर रोज मटण!' आई म्हणाली, 'ते जाऊ दे, काहीतरी चटणी-मिरची करू तुझ्यासाठी; पण तू उपास करंच.' संतोषी माता गेली... या मातेचं तर ऐकायलाच पाहिजे ना! ही तर समोरच, दिसतही अन् पावतही होती, माझा वैश्याटापासून सुटकारा करण्यासाठी. किमान चार महिने का असेना उपवास सुरू झाले; पण एका माणसासाठी वेगळी भाजीची ऐपत कुठं होती? मग आई चाराणे द्यायची, फराळासाठी. कोण फराळ करतो? बाहेर मग मस्त पाव-रस्सा खायचो अन् सायंकाळी घरी पोथी वाचन. चार महिने जवळ आले तसं टेन्शन वाढायला लागलं. आईला सांगितलं; पण उद्यापन करण्यासाठी पैसे कुठं जमत होते. पुढल्या शुक्रवारी करत-करत आजचा दिवस उजाडला. आईपण विसरली. माझा प्रश्नच कुठंय? मी उपवास केलाच नाही. त्यामुळे मी शेंगा खाल्ल्या नाहीत, हे सुत्र मला आपोआपच लागू पडू शकते, नाही का?

वस्तीत, विशेषतः दलित वस्तीत वाढलेल्या पोरांवर संस्कार असे ठरवून कधी होत नसतातच मुळी. तो दिनचर्येचा, उपलब्ध परिस्थितीचा, आसपासच्या घटनांच्या प्रतिक्रियेचा अर्क असतो. जसा क्रम पुढे जातो, तशी परिभाषा त्याला आपल्या कवेत

घेत जाते. सार्वजनिक क्षेत्रात याच रचनेला मी संस्कार असे मानतो. व्यक्तिगतच अनुभव सांगायचे तर या संस्कारांमध्ये माझ्यावर माझ्या परिवारजनांची छाप बऱ्यापैकी पडली, असेच मी मांडीन. साऱ्यांनी मी शिक्षण घेत असल्याचे नेहमी कौतुक केले, अभिमान बाळगला. ऐपतीप्रमाणे प्रोत्साहन देत गेले. थांब... कुणीही कधीही म्हटले नाही आणि शिक्षण म्हणजे अमकी-तमकी डिग्री अशी व्याख्याही त्यांनी कधी मानली नाही. जे करीत गेलो, तो शिक्षणाचाच भाग आहे किंवा होता, अशी धारणा आजही कायम आहे. त्यामुळे समाजकारण, राजकारण हे माझ्या शिक्षणाचीच पायरी आहे, असेच त्यांचे मत होते. म्हणून पाठिंबा कायम राहिला.

नाशिक महापालिका प्रशासनाची राजवट जाऊन लोकप्रतिनिधींची सत्ता राबविण्याचा शासन निर्णय झाला, म्हणजे निवडणुका लागल्या. प्रशासक कायम ठेवून आता महापौर, उपमहापौर, स्थायी व इतर समित्या आणि नगरसेवक निर्णयप्रक्रियेत येणार होते. नाशिककरांनी या निर्णयाचे जंगी स्वागत केले. तोपर्यंत मी संघटनेत चांगलाच सक्रिय झालो होतो. पण, कोण जाणे घरात जागा पुरेना की अन्य काही कारणांनी मी आईला समजाविले, मला आणखी शिकायचे, पण इथं नाही होणार. तेव्हा वस्तीच्या, नागसेननगरच्या बाहेर पडावे, असं म्हणतोय. तिला वाटले, हा प्रस्तावित कार्यक्रम आहे. एक-दोन जुजबी प्रश्न विचारून 'पाहा' म्हणाली. मी तोच होकार पुढे मानून कामाला लागलो. अरुण ठाकूरलाही सांगितले खोली पाहायला. खोली लगेच मिळाली. त्र्यंबकरोडवरील डेअरीसमोर मिस्त्री चाळीमध्ये! पावणेदोनशे रुपये भाडे. डिपॉझिटसाठी कुलकर्णीमॅडम, अरुण आदी सहकाऱ्यांनी पैसे दिले होते, तीन हजार रुपये. दिवस ठरला. १ ऑगस्ट १९९१. घर, वस्ती सोडण्याचा. अरुणला अगोदरच सांगून ठेवले होते. एक मोठे पोते, एक पत्र्याची पेटी, गोधडी, चादर, कपडे एकाच पोत्यात भरले. तोपर्यंत सकाळचे साडेदहा वाजले होते. आई कामावरून आली होती. पाहिलं, आचंबित झाली. तोपर्यंत दोन वहिन्यांनी ताटं, तांब्या, ग्लास, कळशी आदी वस्तू दिल्या होत्या. आईला सांगितले, तिला धक्का बसला. जाऊ नको म्हणाली. पण, समजावले. फार अडविण्याचा आग्रह केला नाही. शहाणा होतो ना मी! पण आई रडत होती आणि दुसरा हुंदडा ऐकू येत होता वहिनीचा, सोनूबाईचा! तिला तर काहीच समजत नव्हते. मी मात्र ठाम होतो. दररोज घरी येत जाईन, अशी समजूत काढली. निघालो. अरुणच्या कायनेटीकवर संसार वाहिला. त्याच सायंकाळी आक्का (अरुणची आई) जबाबदारीने घरी आल्या. बटाट्याची रस्साभाजी केली म्हणजे मला शिकविली. भात लावून दिला.

एक ॲल्युमिनिअमचे पातेले अन् अभ्यासासाठी एक पत्र्याचा टेबल दिला. समोरच जेवायला सांगितले. आपण निराधार नाही, असा ठाम विश्वास पहिल्याच दिवशी निर्माण झाला होता. पुढे कित्येकदा आक्का घरीच (त्यांच्या) जेवण खाऊ घालू लागल्या. त्या मेस (घरगुती) चालवायच्या. आता खोली हळुहळू संघटनेचं कार्यालय झालं होतं. मजा येत होती. कामही (नोकरी) सुरू होतं अन् संघटनेचा कारभारही. गरज म्हणून एकुलत्या एक चावीला दाराच्या वर एक खोबणी करून ठेवायचो. बाकीचे सहकारी येऊन संघटनेचं काम करून जायचे. सोबत खिचडीचे पातेले न विसरता रिकामे करायचे हक्काने. मला खूप आवडायचे ते पण! मग ब्रेड, लोणचं, बटाट्याची रस्सा भाजी असा मस्त भरपेट बेत असायचा. इथं एक अडचण होती. कॉलनी असल्याने सुटं दूध मिळायचे नाही एक रुपयाचे. मग कोऱ्याच (काळा) चहाची सवय लागली. मित्रमंडळी आली, की दुधाचा चहा व्हायचा. आई-वहिनी जमेल तशी मदत करीत होत्या. साखर, चहा, डाळी, तांदूळ, रॉकेल. आता घरचेही निश्चिंत झाले होते. एकदा आई-वहिनी घरी येऊन गेल्या आणि कायमच्या निश्चिंत झाल्या. निर्णय चांगला होता. पुढे भाषा, बोलणं-चालणं, राहणीमान आदी पाहून मोहननेही पावती दिली, 'चांगला निर्णय घेतलास, इथून बाहेर पडायचा. सुधारशील तू?' आता मात्र माझा श्वासच मोकळा झाला. या साऱ्या घडामोडीचं नागसेननगरात पडसाद उमटवितच होतो मी नकळतपणे. संघटनेचा वस्ती सर्व्हे, शाळा सर्व्हे, इतर कार्यक्रमांची जबाबदारी मी घ्यायचो तीच नागसेननगरपासून. त्यामुळे शाळा पाहणीतही आता माझ्या अजेंड्यावर पहिली शाळा असायची ती, कोंबडवाला बिल्डिंग, शाळा क्र. २४. परंतु, या साऱ्या शिष्टाचारांमध्ये कधी कधी ओळख द्यावी लागायची, मीपण इथलाच म्हणजे वाडग्यातला आहे म्हणून!

एकदा मोठा राजवाडा इथे एक व्याख्यान होते. म्हणजे सभा होती. भालचंद्र फडकेसर (तेव्हा ते मुक्त विद्यापीठात होते). मुख्य वक्ते होते. याच सभेत अनिताचे अतिशय सुंदर भाषण झाले. खूप छान बोलली. टाळ्या घेतल्या. समारोप झाला. सारे गेले. बसस्टॉपवर अनिताला बसवून द्यायची जबाबदारी माझ्यावर होती. आणखीही दोघं-तिघं थांबले सोबतीला. वामनदादांच्या घराच्या कोपऱ्यावरच स्टॉप होता. या बाजूला म्हणजे वडाळा नाक्यावर. राजवाड्याच्या बाजूला आम्ही सारे उभे असताना एक हीरो आला. मिथुन चक्रवर्तीसारखे केस वाढलेले. एकदम जवळ आला अन् अनितावर जवळजवळ खेकसलाच, 'काय वं, भाषणात सारखं काय आंबेडकर आंबेडकर म्हणत होती? भारतरत्न, परमपूज्य, डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर म्हणायला काय झालं व्हतं?' हा

हमला अचानक होता. भावना तीव्र आणि महत्त्वाच्या होत्या. आमच्यातील एकाने त्याची समजूत काढून रवाना केले. अनिता थोडी नर्व्हस झाली. स्वाभाविक होते. कुठे चुकले आपले? मग टाळ्या का वाजवत होते लोक भाषणाला? साऱ्यांनी समजूत काढून तिला रवाना केले. माझ्या मनात कुठेतरी सल होती. प्रश्न विचारणाऱ्याची औकात मला माहीत होती. साधारण एखाद्या आठवड्यातच दुसरा प्रसंग आला. असेच आम्ही संघटनेच्या कामाने त्याच स्टॉपवर उभे होतो. तो हीरो परत आला. आता मात्र थट्टा केली अन् निघून गेला. अनिता कधी रवाना होईल, असे झाले होते. लवकरच गेली. तो हीरो अजून तिथेच होता. विसरूनही गेला होता सारे. आता, मी त्याच्याकडे गेलो. बाकी दोघा-तिघांना माझा चिडचिडा स्वभाव माहीत होता. मला रोखायचा प्रयत्न केला. म्हटलो, थांबा जरा! त्याच्याजवळ जाऊन खांद्याला हात लावून विचारले, 'काय म्हणतो रे तू?' हे त्याच्यासाठी अनपेक्षित होते. तो उत्तरला, 'काय म्हणतो म्हणजे? काय चुकीचं इचारलं? तुम्ही समतावाले काय पण बोलाल का बाबासाहेबांना?' आता माझी सटकली होती. गच्चीला धरला अन् विचारले, 'सांग बाबासाहेबांची संपूर्ण जन्मतारीख.' आता तो बावरला. १४ एप्रिल पलीकडे कधी गेलाच नव्हता. जुजबी विरोध करीत म्हणाला, 'त्याचा काय संबंध?' आता मात्र मी रग्गा दिला, 'जर का याच्यापुढं समताचं नावही घेतलं तर हे इसरू नकोस का मी पण वाडग्यातलाच हाये म्हणून?' बेंबीच्या देठापासूनचा हा इशारा पुढचे सारे मैदान साफ करून गेला होता. मग कधीही अडचण आली नाही.

पुढे संघटनेच्या कामासोबतच नागसेननगरच्या घडामोडीत सहभाग राहतच होता. कार्यकर्त्यांशी संवाद साधला जात होता. स्थानिक प्रस्थापित मंडळाच्या रचनेचा धक्का लागता कामा नये, अन् पर्यायपण द्यायला पाहिजे असे सारखे वाटत होते. समता आंदोलनात काम करताना समविचारी मित्रसंघटनांसोबत कार्यक्रम राबविण्याची प्रॅक्टिस झाली होती. इथेही नागसेननगरमध्ये नालंदा सांस्कृतिक-कला-क्रीडा मंडळ स्थापन केले. सुरेश निकम (मायकोचा कर्मचारी) अध्यक्ष अन् मी सचिव. बाकी सारे रीतसर पदाधिकारी नेमले होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर जन्मशताब्दी चांगला मुहूर्त होता जनतेसमोर कार्यक्रम नेण्याचा. आठवडाभर छान कार्यक्रम झाले. साऱ्यांना सामील करून घेतले होते. विशेषतः शिकणाऱ्या पोरांचा सहभाग अधिक घेतला. दररोजची सायंकाळ या सात दिवसांत भरगच्च कार्यक्रमांनी पार पडली. कार्यक्रमाच्या निमित्ताने पुतळा आणि परिसर स्वच्छ होऊ लागला. पाणी शिंपडले जाऊ लागले. अगदी प्रसन्न वातावरण होते.

पारितोषिक वितरणाला व्ही. डी. मिश्रा या मोठ्या पोलिस अधिकाऱ्याला आणि भद्रकाली पोलिस ठाण्याच्या पोलिस निरीक्षकाला प्रमुख पाहुणे म्हणून मुद्दाम बोलाविले. का ते फक्त सुरेश अन् मलाच माहीत होते. कार्यक्रम सुरू करण्याअगोदरच मंडपवाल्याला सांगितले होते, की कार्यक्रम संपताच मंडप सोडून घे. नुकसान झाले तर आम्ही जबाबदार नाही. मस्त कार्यक्रम झाला. जवळपास शंभरावर प्रशस्तिपत्रे, मेडल, कप वाटले. सूत्रसंचालन मीच करीत होतो. सारे ठरलेले होते. सुरेशने प्रास्ताविक केले. पारितोषिक वितरण, साहेबांचे भाषण अन् शेवटी आभार मी मानणार. सारे झाले. साहेबांनी खूश होऊन खूप कौतुक केले. काही पण मदत लागल्यास सांगा म्हणाले. आभारासाठी उभा राहिलो अन् भाषणच ठोकले, 'साहेब, तुम्हाला इथे बोलविण्यात आमचा खूप मोठा स्वार्थ आहे. आता ज्या पोरांचा तुम्ही सत्कार केला, कौतुक केलं त्यांचे भविष्य उद्ध्वस्त करण्याचे काम तुमचेच पोलिस करताहेत. एका गुन्हेगारासाठी सगळ्या निरपराध आणि शिकणाऱ्या पोरांना बंद केले जातेय. तुम्हीच सांगा आम्ही काय करावे?' असं काहीबाही बोललो. जमावाने टाळ्या वाजवून पाठिंबा दिलाच होता. खाली उतरताच मिश्रासाहेबांनी भद्रकाली पोलिसांना आमच्यासमक्षच ताकीद दिली. कार्यक्रम यशस्वी झाला होता. साहेब रवाना झाले होते. मी सुरेशला हळूच म्हणालो, 'स्कूटर काढ, नाश्ता करून येऊ, चल पटकन्!' सुरेश म्हटला, 'थांब रे थोडा. काय घाई झाली तुला?' मी म्हटलो, 'घाई नाही, राडा होईल, पळ इथून थोडा वेळासाठी.' सुरेशला समजली नाही माझी ईशाऱ्याची भाषा. थोडा मोठ्या आवाजात म्हणाला, 'राडा अन् कोण करील? एवढा चांगला कार्यक्रम झाला. काही नकोस बरळू.' मी म्हटलो, 'बरं ठीक, थांब मग!'

झाले. पोलिस गेले अन् पुतळ्याजवळ म्होरक्याच्या घरातील साऱ्या महिला सात-आठ असतील, सुरेश किंवा माझ्या नावाचा उल्लेख न करता एकाच वेळी शिव्या देऊ लागल्या, 'भाडखावू कुठले, मुडदे... सगळे पोलिस आणले व्हते...' हा गोंगाट पाहून सुरेश तर दचकलाच. म्हणाला, 'अरे बाप रे, काय रे मनू, ही काय भानगड, या कुणाला शिव्या देताहेत?' म्हटलो, 'तुला अन् मला आणखी कुणाला? म्हटलो होतो तुला कलटी घेऊ. आता ऐक.' त्याच गोंगाटात सुरेशने स्कूटरला किक मारली. मी मागे बसलो अन् निघालो. मागून सामूहिक मिश्रित शिव्यांचा वर्षाव झाला, 'चालले भाडखाऊ, आता भद्रकालीत!' मागे न पाहताच सुरेशने स्कूटर पळविली. हॉटेलात सुरेशने हसतच विचारले, 'तुला कसे माहीत होते रे सगळे?' जोरात हसलो. म्हटलो, 'आधी भजे सांग, अर्ध्या तासात शांत होईल सगळे. मग जाऊ.' खरोखर तसेच झाले. नागसेननगर, वाडग्यात परतलो. सारे

काही सुरळीत होते. सुरेश आमच्या वस्तीतला पहिला ग्रॅज्युएट होता. पण, मी वस्तीची भाषा समजणारा पोस्ट ग्रॅज्युएट होतो. कारण साधे अन् सोपे होते. नागसेननगरकडे मी चळवळीच्या माध्यमातून बाहेरहूनही पाहत होतो. अविचारी, अविवेकी असं काही वाटण्याचं कारण नव्हतं. बदलाची अपेक्षा मला होती. त्यांना नाही. खूप प्रश्न होते, तशी उत्तरेही द्यावी लागणार होती यथावकाश!

## ३६ मते...

अशा चळवळी करत असताना खूप अनुभव क्रमशः आले. अडचण आली की उत्तर शोधायचा कार्यक्रम ठरलेला. अगोदर म्हटल्याप्रमाणे नाशिक मनपा झाल्यानंतर पहिल्यांदा प्रशासकीय राजवट जाऊन लोकप्रतिनिधींचं राज्य येणार होतं. काहीतरी १७-१८ वर्षांनंतर! नगरसेवक निवडून येणार होते. वस्तीचा, शहराचा विकास होणार होता. मग ही संधी का सोडायची? नागसेननगरमध्ये काम तर सुरूच होते ना! अनिताही नर्मदा बचाव आंदोलनात सामील झाली होती. टीवायबीएचे ते वर्ष होते. तिच्या नाशिक-मुंबई-धुळे-वडोदरा-सरदार सरोवर-नर्मदा डॅम अशा फेऱ्या सुरू होत्या. निवडणुकीत म्होरक्या नक्की उभा राहणार, प्रस्थापित पक्षाकडून पैसे खाणार अन् पडणार हे गणित चांगलेच माहीत होते. मी तेव्हा त्र्यंबकरोडला मिस्त्री चाळीतच राहत होतो. सुरेश निकमला विश्वासात घेतले, तोपण तयार झाला. फॉर्म भरण्याच्या अगोदरच्या दिवसापर्यंत कुणालाच खबर नाही. अगदी माघारीपर्यंत! म्होरक्या खूश, काहीच अडथळा नाही आणि माघारीच्या रात्री वस्तीसमोरची सगळ्यात मोठी भिंत म्हणजे रेणुकानगरची दगडी वॉल

कंपाऊंड चुन्याने रंगविले गेले. सुरेश निकम आपला उमेदवार, निशाणी मशाल! आता दमबाजी, हाणामारी, शिवीगाळ करण्यात काहीच अर्थ नाही, याची कल्पना म्होरक्याला आली होती. त्याला हेही चांगले माहीत होते, की डोके कुणाचे आहे यामागे. पण, किती जणांना आणि कसे पटविणार? लढत होणार होती. प्रचार अतिशय सुनियोजित पद्धतीने सुरू होता. म्होरक्या आम्ही दिसताच खाऊ की गिळू नजरेनं पाहायचा. आम्ही पण खुन्नस द्यायचो. एक माहीत होते, मारामारी झाली तर आता नुकसान त्याचेच अधिक होणार होते. पोलिस दफ्तरी तो तसाही वाँटेड होताच.

मी प्रमोटर्स अ‍ॅण्ड बिल्डर्सची नोकरी करून सारे करत होतो. सकाळची अग्रवाल सभेची आणखी एक नोकरी धरल्याने कॉलेजला जवळपास सोडचिट्ठीच. अखेरच्या टप्प्यात सुटी टाकून झपाटून कामाला लागलो होतो. पर्याय उपलब्ध करायचा होता. मेहनत घ्यावीच लागणार होती. केवळ वस्तीचं जरी मतदान झालं, तरी एका बाजूने तरी गणित जमणारं होतं. सारी कॅलक्युलेशन्स जमत होती. आता तर पोरांची साथही उघडपणे मिळू लागली होती. अखेर मतदान झाले. दोघंही पडले होते. सुरेश अन् म्होरक्याही. नाशिक शहरात प्रत्येक वॉर्डात अशीच परिस्थिती होती. वाडगं नसूनही! नाशिकचे पहिले पोलिस आयुक्त के. के. कश्यप यांच्यासमोर कायदा आणि सुव्यवस्था राखण्याचे मोठे आव्हान होते. अतिशय तापलेलं वातावरण होते. सायंकाळी परतताच चित्र समोर दिसू लागले होते. वॉर्डात शिवसेनेचा उमेदवार निवडून आला होता. आमच्या वस्तीतीलही मतं फुटली होती. दोघांची एकत्र करूनही आकडे जुळत नव्हते.

अरुण ठाकूरला परिस्थिती माहीत होती. त्याच सायंकाळी सहाच्या गाडीने अनिता बडोद्याला जाणार होती. मी निरोप देण्याकरिता अरुणसोबत गेलो होतो. इतर वेळी जाण्यासाठी मला विरोध करणारा अरुण म्हणाला, जातो का सोबत? नाही म्हणायचा प्रसंग होता कुठे? काळी पँट आणि खादीचा पिवळा झब्बा अशा अवतारात बसलो गाडीत. तिकीट अरुणने दिले हातात अन् परतीचे पैसेही! खूश होतो अनितासोबत जायला. अरुणला घरी निरोप द्यायला सांगितले.

हा प्रवास अनितासाठी नेहमीचाच होता. छान गप्पा झाल्या, नर्मदेचा लढा समजावून घेता आला. पहाटे अहमदाबादला की बडोद्याला पोहोचलो. पुढे अनितासमोर मेधा पाटकर यांनी लिहून ठेवलेली कामांची यादी आणि काही कागदपत्रे ऑफिसमध्ये आली. अनिता एका बाजूला मला माहिती देत, दुसऱ्या बाजूला कामं उरकत होती. दुसऱ्या दिवशी बहुतेक डॅमसाईटवर जायचे होते. अनिता सारं काम छुप्या पद्धतीने करीत होती.

माझी धडधड वाढत होती. तिची सारी कामं पाहून. मग केवडिया कॉलनी, बस, ट्रक, टेम्पो मातीचा, जंगलाचा रस्ता कसा प्रवास केला, आता काहीच आठवत नाही. पुढे सुमारे आठ-दहा किलोमीटर डोंगरांमधून जाणारा पायी रस्ता. निर्मनुष्य! दिसायचे फक्त डॅमवर साहित्य पोहोचविणारे कंत्राटदारांचे अजस्त्र ट्रक्स. मी तर हादरलोच. या जंगल-दऱ्याखोऱ्यांत कामांची काय गरज? नाशिक-मुंबईला पाहिजे ते कर, असंही नकळत विनवत होतो. तेव्हा आमचे लग्न झालेले नव्हते; पण आंदोलनाचे महत्त्व पटवून द्यावे ते मेधा पाटकर आणि त्यांच्या कार्यकर्त्यांनीच! पुढे नर्मदेच्या वाकड्या-तिकड्या प्रवाहातून डुंगी (मोठ्या झाडाच्या मधल्या तुकड्यातील कोरून खोबणी तयार करून बनवलेली लहानशी होडी) जीवघेण्या पद्धतीने पळत होती. पलीकडे शूलपाणीश्वराच्या मंदिरासमोरच एक मोठी झोपडी होती. बांबू, कारवे आदींनी शेणा-मातीने लिपलेली. तेच नर्मदा बचावचे कार्यालय. रात्री उशिरा कधीतरी मेधा पाटकर आल्या. हातातला टॉर्च सगळ्यांच्या चेहऱ्यावर मारून बैठकीला बसल्या. मी जाम दमलो होतो. बोचऱ्या थंडीत अनिताने तिची ओढणी अंगावर पांघरली, तेव्हा कुठे झोप लागली. तिसऱ्या दिवशी निघालो. नाशिकलाच यायचे होते म्हणून मेधा पाटकर यांनी भरपूर कामांची यादी दिली. विभागीय कार्यालय नाशिकला असल्याने. अनिताने कुठून, कसे एका बसमध्ये बसवून दिले नाशिकला परतण्यासाठी. रात्री दोनला उशिरा रूमवर पोहोचलो. सकाळी मावशीने (घरमालकीन) सांगितले, 'अरे मनोहर, काल रात्री दोन-अडीचला चार-पाच जण आले होते. तुला भेटायला. कुलूप पाहून निघून गेले.' मला अंदाज आलाच होता. नागसेननगरची मंडळी असेल म्हणून. तीपण मोठी उत्सुकता होतीच की. काय झालं पुढं म्हणून! सायकलने अरुणकडे गेलो. त्याला माहीत असावे बहुतेक सारे. चहा पाजला अन् मला सायकल त्याच्याच घरी ठेवायला सांगून त्याच्या कायनेटिक स्कूटरवर घेऊन निघाला. काही एक विषय नाशिकचा न काढता थेट सी.बी.एस.जवळच्या पोलिस ऑफिसर्स कॉलनीत पोलिस निरीक्षक सुरेंद्रबापू पाटील यांच्या घरी घेऊन गेला. साहेब आंघोळ करूनच बाहेर पडले होते. टॉवेलने डोकं पुशीत हसत हॉलमध्ये येत म्हणाले, या, बसा! बसलो. चहा पिलो. साहेब म्हणाले, 'मग काय बाबा, किती बायकांना शिव्या दिल्यास? अन् ती तलवार कुठे आहे?' मी थोडा बावरलो. अरुण शेजारीच होता. तो खळाखळा हसत होता, नेहमीसारखा. साहेबही हसत होते. मी परिस्थितीचा अंदाज घेत विचारले, 'कुठे साहेब? इथे की नर्मदेत?' आता जरा गंभीर होत साहेब म्हणाले, 'मला माहीत आहे; पण तुझ्यावर केस दाखल झालीय. शांतपणे घरी जा अन् आईला

भेट. तिला थोडं लागलंय!' सारं धक्कादायक ऐकत होते. पुतळ्याजवळ आमची गाडी येताच पोरंही गंभीर होऊन उभे राहिले. अरुणने स्कूटर थेट घराजवळ, डबलबाराजवळ नेली. मी जवळपास पळतच घरात गेलो. आईच्या डोक्याला मोठी पांढरी पट्टी बांधली होती. एक रक्ताचा डागही दिसत होता. विचारले काय झाले म्हणून? ज्या रात्री मी बडोद्याला गेलो त्याच रात्री नागसेननगरात तुंबळ हाणामारी झाली होती. टारगेट अर्थात मी आणि सुरेश होतो. सुरेशपेक्षा माझ्यावर अधिक राग निघाला होता. आमचा म्होरक्या भांडणात नेहमी बायकांना पुढं करायचा. इथेही असंच झालं होतं. एका लिमिटनंतर वहिनीनेही बहुतेक पलटवार केला असावा. मारहाणीत आईच्या डोक्यावर काठी पडली अन् सहा ते आठ टाक्यांची जखम झाली होती. आईची ती जखम पाहून आता माझा राग थांबेनासा झाला. जवळच एक काठी होती, भरलेल्या बांबूची. घेतली अन् शिव्यांची लाखोली वाहत म्होरक्याच्या घराकडे धावत सुटलो. मागे वहिनी, आई, बाकी सारी मंडळी मला रोखायला. पण, राग डोक्यात गेला होता. त्याच्या घरासमोर गेलो. घरात बायकाच होत्या. घाबरल्या. पळापळ, आरडाओरड सुरू झाली. सारी वस्ती पाहत होती. मला बायकांशी काही घेणे-देणे नव्हते. म्होरक्या सापडला तर दोन हात प्रत्यक्ष करण्याच्या मानसिकतेनं मला तिथंपर्यंत ओढत नेले होते. एकतर्फी मारा होत होता, मारामारी नाही! एवढ्यात पोलिस जीप आली. पीएसआय गायकवाड अन् पोलिस आले होते. गायकवाडसाहेबांनी काठी हातातून घेतली अन् म्हणाले, 'तू शिकलेला आहेस ना! मी पाहतोय सगळं. लवकरच त्याला मध्ये घेतोय. तू शांतपणे जा तुझ्या रूमवर.' ही सारी फिल्डिंग पाटीलसाहेबांनी लावली होती. अरुणनेही आता समजूत काढली. आईला दिलासा दिला अन् मला घरी परत सोडले. आता मात्र माझी इमेज वस्तीचा आणखी एक पुढारी, अशी तयार झाली होती. या इलेक्शनचा तो मला मोठा फायदा झाला होता.

त्यानंतरच्या पंचवार्षिकला कुणी उमेदवार तयार नव्हता. आतापर्यंत लग्न, राहुलवाडीत स्थलांतर आदी झालं होतं. पण, म्होरक्याला सोडायचा नव्हता. अखेर निर्णय घेतला. स्वतःच उभं राहायचा. त्या वेळी हा एकमेव वॉर्ड होता जिथं भाजप-शिवसेना उमेदवार देऊ शकली नव्हती. मागासवर्गीयांसाठी राखीव या मतदारसंघात (वॉर्डात) केवळ दलित (नवबौद्ध), मुस्लिम आणि वाल्मीकी अशीच ९८-९९ टक्के मतदार होते. या वेळी मी जनता दलाची उमेदवारी केली. प्रदेशाध्यक्ष निहाल अहमद यांची मोठी सभा बागवानपुरा भागात झाली. ७००-८०० चा जमाव नक्कीच असेल. इथंही मला काही टिप्स मिळाल्या. स्टेजवर असताना चंद्रसेन कळवणकर भाषण करीत होते. निहालभाईंच्या शेजारीच मी

होतो. स्टेजच्या उजव्या बाजूला एका मौलवीच्या नावाचा चौकाचा फलक होता. भाईंनी मला विचारले, कुणाचा आहे म्हणून! मी नकारार्थी मान हलविली. 'ठिकायं' म्हणाले. नंतर बोलायला उभे राहिले. फलकावरील नावाचा उल्लेख करीत त्यांनी भाषणाला सुरवात केली. सभाशास्त्राचा तो एक धडा होता. समोरच्या समुदायातलं, श्रोत्यांमधलं अंतर कमी करण्याचे माध्यम होते, हे मला कळाले. पुढे जाणीवपूर्वक ही गोष्ट करू लागलो!

या निवडणुकीत आणखी एक गमक समजले. उमेदवार हा स्थानिक असणे किती महत्त्वाचे आहे ते. मी पेठरोडला राहुलवाडीत राहत होतो आणि निवडणूक नागसेननगरमधून म्हणजेच काझीच्या वाडग्यातून लढवत होतो. रोज रात्री उशिरा घरी परतून सकाळी लवकर वाडग्यातून लढत होतो. एकदा भेटीगाठी दरम्यान वस्तीतल्या एका जाणकार मुस्लिम ज्येष्ठाला विचारले, 'याची सारी काळी कृत्ये तुम्हाला माहीत आहेत. मी का इलेक्शन लढतो आहे, हेही माहीत असून तुम्ही मला पाठिंबा का देत नाही?' मला सक्रिय राजकारणाचा दुसरा परिपाठ समजला. तो म्हणाला, 'खरं सांगू मनुभाऊ, तू शिकलेला, चांगला ज्ञान असलेला हुशार माणूस आहेस. आम्हाला हे माहीत आहे. पण, एक गोष्ट आहे. उद्या तू निवडून जाशील. गल्लीवर काही प्रसंग ओढवला तर तुला इथं पोहोचायला किती वेळ लागेल? तोपर्यंत गल्लीचं किती नुकसान होईल? तो आमची आई-माई काढतो; पण इथं आमच्यातच राहतो ना! आता तूच सांग!' राजकारण, समाजकारण, परिवर्तन, बदल याकडे दीडशहाणा म्हणून पाहणारा मी, मला त्या माणसाने अतिशय प्रेमाने मतदानाअगोदर पराभूत केले होते, त्याच्या वास्तववादी तर्कशास्त्राने!

मतदान झाले. मतमोजणीच्या वेळी म्होरक्या अन् मी शेजारी-शेजारी होतो. नागसेननगरची पेटी आली. त्याला म्हणालो, 'आता बघ. आपल्या गल्लीतून किती मतं बाहेर गेली.' ८० टक्के मतदान बाहेर गेलं होतं. तोही पडला होता अन् मीसुद्धा! पण पाच वर्षांत मोठा फरक झाला होता. घरी जाताना एकाच स्कूटरवरून गल्लीत परतलो. एकही शिवी नाही, की कुणाच्या डोक्यावर काठीही उमटली नाही. सारे चित्र स्पष्ट होते. मला ४६ मते पडली होती. अनिताने खूप आश्चर्य व्यक्त केले, 'फक्त एवढेच? एवढी मोठी सभा होऊनही?' मी शांतपणे उत्तरलो, '४६ मध्ये १० तर आपली घरातीलच आहेत. उरलेली ३६ कोण ते शोधूयात!'

# वामनदादा

आमचा दिवंगत विद्रोही कवी मित्र अरुण काळे याच्या रॉक गार्डन कवितासंग्रहात ‘साहेब, तुमच्या पायाच्या पुण्याईने...‘ कवितेत वस्तीचं, खरं तर खूपच वास्तववादी अन् देखणं चित्र रेखाटलंय. नागसेननगरही त्याला अपवाद नाही. याच नागसेननगरात म्हणजेच पूर्वीच्या वाडग्यात पुतळा नसताना आम्ही एक गृहस्थ पाहायचो. पांढरा शुभ्र पायजमा-शर्ट, कधी कधी स्वतःच कपडे धुताना पाहायचो. खेळता-खेळता एखादा चेंडू त्यांच्या घरावर पडला की पत्र्याच्या आवाजाने पायजमा, फुलबाह्यांच्या बनियानवरच ओरडत बाहेर यायचे. काय खडूस माणूस आहे हा म्हणत आम्ही पळायचो.

कालांतराने ज्या डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची गाणी रेडिओवर ऐकायचो, वस्तीत जयंतीनिमित्ताने आयोजित गाण्यांच्या सामन्यात ऐकायचो, रेकॉर्ड प्लेअरवर गाणी लावायचो ती याच माणसाची म्हणून हा माणूस मोठा असावा, असा साधा आणि सरळ अर्थ त्या वेळच्या बालपणाने घेतला. अर्थ चुकीचा अजिबात नव्हता. कारण हा माणूस होता वामन तबाजी कर्डक अर्थात कविवर्य, लोककवी वामनदादा कर्डक! आंबेडकरी

चळवळीतील कार्यकर्त्यांसाठी आणि चळवळीसाठी काव्यरूपी डॉ. बाबासाहेब आंबेडकर थेट बेंबीच्या देठापर्यंत पोहोचविण्याचं काम करणारा हा सेनापती आमच्या वस्तीत राहत होता. तेव्हा नाही; पण आता सर्वकाही सुखेनैव झाल्यावर क्षणागणिक वामनदादांची आठवण होते. निवडणुका आल्या, की ती जखम अधिकच खोलवर ओली होते. 'अशा दीड दमडीच्या पायी माझा समाज विकणार नाही', अशा गाण्यांमधून वामनदादांनी समाजाला जागं करण्याचा प्रयत्न केला. अशा या वामनदादांच्या सहवासात आम्हाला राहायला, वावरायला मिळाले, हे थोर नशीबच.

सकाळी आठ-नऊला वामनदादा आपल्या बाहेरच्या खोलीत गाणी रचायला, रियाझ करायला बसायचे. आम्ही चार-पाच पोरं कोरस म्हणून शेजारी बसायचो. पण, दादांपर्यंत पोहोचण्याची कसरत आम्हीच करायची. दादा आमची वकिली करीत नसायचे. दादांची पत्नी शांताबाई कर्डक यांच्यासमोरून त्यांच्याच ओट्यावरून पाय ठेवून दादांच्या खोलीत शिरायचे म्हणजे परवानगी न घेता वाघा बॉर्डर क्रॉस करून पाकिस्तानात शिरायचं. म्हातारी दुसऱ्या खोलीत शिरली, की पटकन् पळत जाऊन दादांच्याभोवती बसायचो. पट्ट्यांची लेंगा पँट, बनियानवरच बहुतांश वेळी दादा असायचे. पेटीचा सूर लावायचे अन् इतिहासाच्या रचनेला सुरवात करायचे. मध्ये मध्ये म्हातारी येऊन जायची. कुत्सितपणे आमच्याकडे पाहून फक्त म्हणायची, आले का? दादा आणि आम्ही नजरही द्यायचो नाही अन् रचना सुरू व्हायची, 'सूटबूटवाले, आले भले, कुणी आमदार, कुणी खासदार, भीमा तुझ्यामुळे मान आम्हा मिळे...'

याच काळात दादांची अनेक गाणी ऐकली, पाहिली (रचताना). पुढे महाविद्यालयीन काळात युवकांच्या संघटनेत काम करताना हा यल्गार अधिक स्पष्ट झाला तो गाण्यांच्या रूपातच. यात 'सांगा आम्हाला टाटा-बिर्ला-बाटा कुठाये हो, सांगा धनाचा साठा आमचा वाटा कुठाय हो...' अशा गाण्यांनी आंदोलनाची धार तीव्र केली. समतावादी चळवळीत काम करताना गाण्यांच्या रूपात वामनदादा कायमस्वरूपी आमच्यासोबत होते.

दरम्यान, एक विधानसभेची निवडणूक लागली. नाशिक जिल्हा हा काँग्रेसचा बालेकिल्ला होता. अशा वेळी एक राजकीय खेळी खेळली गेली. (ती राजकीय खेळी होती हे नंतर उमजले.) काही कार्यकर्त्यांनी वामनदादांना निवडणुकीकरिता उभे केले. हत्ती निशाणी घेऊन. दादांसारखा बिदागी न ठरविता गाणी गाणारा माणूस निवडणुकीची प्रचारपत्रके तरी कसा छापणार? कुणी तरी एकाने एक जुनी जीपगाडी प्रचारासाठी दिली होती. बाकीच्यांनी आपापल्या सोयीने पोहोचायचे सभेच्या ठिकाणी! वामनदादांचा

मानसपुत्र रवी आणि मी दोस्त. त्याने एक सायकल मिळविली. नियम ठरला. सभेला जाताना (डबल सीट) रवीने सायकल चालवायची अन् परतीला मी. बऱ्याचदा पायीच ये-जा करावी लागत असे. कारण, त्या सायकलची चेनही सारखी गळायची. रिपेअरिंगला पैसे कुठे होते खिशात त्याच्याही. सभा म्हणजे एक-दोन भाषणं आणि बाकी दादांची ४-५ गाणी. निकाल लागला, काँग्रेसचा उमेदवार पडला अन् भाजपचा निवडून आला. मतमोजणी झाल्यावर निराश कार्यकर्ते घरी परतले. मोठा पराभव झाला होता वामनदादांचा. खरं तर आंबेडकरी चळवळीचा! एक मोठा कार्यकर्ता दुःख पचविण्यासाठी भरपूर दारू पिऊन आला अन् धाडकन् दादांच्या ओट्यावर आडवा झाला. ते पाहून शांताबाई बाहेर आली. त्याच्याकडे निरखून पाहत खडमी कडाडली, 'ये कोण रे तू?' दुसऱ्याच क्षणी ओळखून म्हणाली, 'अरे... तू? काय रे?' कार्यकर्त्याने रिस्पॉन्स दिला. 'बाई... दादा पडले.' आता शेवट खडमीने केला, 'ये ऊठ इथून, दादा, दादा म्हणत घातले बोट अन् केलं उभं. हा थेरडाही राहिला उभा अन् पडला. चाल उठ अन् जाय पड तुझ्या दारात!' हे वाक्य ऐकून त्या कार्यकर्त्याची आख्खी उतरली. पटकन् उठला, कपडे झटकून आपल्या घराकडे निघाला.

त्या वेळी रंजना आणि प्रल्हाद शिंदे जोडीचा सामना म्हणजे धमालच. दहाला सुरू झालेला सामना संपायचा तोच मुळी सकाळी नगरपालिकेच्या नळाला आलेल्या पाण्याच्या आवाजाने. सामन्याचे गायक कुणीही असोत, नागसेननगरात संपन्न झालेल्या कार्यक्रमाची सुरवात मात्र वामनदादांच्या गायनानेच. श्रोत्यांमध्ये बायकांच्या घोळक्यात शांताबाई असायच्या. (दादांनी त्यांना आवडीने दमाळी, खडमी अशी नावे दिलेली होती.) वस्तीतल्या बायाही त्यांना खडमीच म्हणत. शांताबाईलाही ते नाव आवडत असावं. गाणं सुरू झालं. अचानक दादांनी त्या दिवशी बायांमध्ये बसलेल्या खडमीला प्रतिस्पर्धी केलं आणि प्रसिद्ध गाणं गायलं, 'आत्ताशी पिकली पोळी, किल्ली हाताशी आली, अन् सूनबाई हसली गाली, सासूबाई म्हातारी झाली.' बायकांची उत्स्फूर्त दाद मिळत होती. गाणं शेवटच्या कडव्याकडं सरकलं. 'असेच एकाकी गेले सासूचे डोळे, अशीच वामनची सून पलंगी लोळे. सासूची गादी आता आली पलंगाखाली, अन् सूनबाई हसली गाली, सासूबाई म्हातारी झाली.' अर्थात कडवं म्हणतांना आपल्या नेहमीच्या शैलीत एका गुडघ्यावर बसलेल्या वामनदादांनी खडमीच्या दिशेने पोझ करून अन् हातवारे करून गायल्यानं म्हातारी लाजली. पदर तोंडावर धरून बायकांना म्हणाली, 'या मेल्याला काही लाज वाटते का असं म्हणायला?' बायका खदाखदा हसत होत्या अन्

स्टेजवर दादांच्या गालावरची खळीही खुलली होती. असे रोमँटिक वामनदादा आमच्या वस्तीची राखण करीत होते अन् येथूनच उभ्या महाराष्ट्राची भ्रमंती करीत होते.

श्रीमती इंदिरा गांधी नाशिकच्या गोल्फ क्लब मैदानावर आल्या होत्या. जातांना पांढऱ्या शुभ्र साडीतील, काळा गॉगल डोळ्यावर असलेल्या इंदिराबाई कारच्या मागच्या सीटवर बसून आम्हाला टाटा करीत गेल्या. कार्यक्रम संपवून परतीच्या वेळी रस्त्याच्या दुतर्फा उभ्या असलेल्या जमावाकडे एकेक हार फेकत गाडी संथगतीने चालली होती. योगायोगाने एक हार आमच्या शांताबाईच्या हातात पडला. शांताबाई भाबडेपणाने हार घेऊन तरातरा पुतळ्याकडे निघाल्या. बायकाही वस्तीत परतत होत्या. जशा शांताबाई हार घेऊन पुतळ्याकडे सरकल्या तशा बायकाही झपाट्याने पुतळ्याजवळ आल्या. बायकांनी विचारले तर शांताबाई म्हणाली, 'इंदिरा गांधीनं बाबांच्या गळ्यात टाकायला हा हार दिलाय.' झालं! बायका संतापल्या. सीनिअर असलेली आमची राह्याई (राहीबाई) कडाडली, 'ये खडमे, सरक मागं, फेक तो हार तिकडं. तिला एवढं वाटत व्हतं तर पाच मिनिटं गाडी थांबून हार घालायचा होता. खबरदार पुतळ्याजवळ तो हार नेला तर...' खडमीला काय माहीत राह्याई तिच्याच वामनदादांचं गाणं गात होती म्हणून!

# समता आंदोलन...

समता आंदोलन संघटनेनं बराच जोर धरला होता. संघटनेच्या कार्यक्रम पत्रिकेवर जवळपास सारेच कार्यक्रम हे वस्तीसाठी असायचे. त्यामुळेही एक वेगळ्या प्रकारची आस्था आणि निष्ठा तयार होण्यात मोठी मदत झाली. एकदा एका कार्यकर्तीने तर साप्ताहिक बैठकीत तक्रार अन् नाराजीही व्यक्त केली होती. कॉलनीत प्रश्न नसतात का म्हणून? पण आम्हा कार्यकर्त्यांना त्याची फिकीर नव्हती. अरुण ठाकूर नावाची नामांतराच्या लढ्यात सक्रिय सहभाग अन् तुरुंगात गेलेली डिक्शनरी साऱ्या प्रश्नांची उत्तरे देत होती. फार मजेशीर अनुभव आले या साऱ्या संघटनेच्या प्रवासात.

एच.पी.टी. कॉलेजचे कट्टे आमचे कार्यालय झाले होते जणू. अनिता के.टी.एच.एम.ला होती; पण वर्ग अटेंड करायची ती आमच्या वर्गांमधून म्हणजे एच.पी.टी.त. याच कट्ट्यांवर दिवसभराचे कार्यक्रम ठरायचे. आदल्या दिवसाचे रिपोर्टिंग, वाद-संवाद व्हायचे. एक दिवस आमच्या एका कार्यकर्त्याने विषय मांडला. बी.वाय.के.त शिकणाऱ्या एका पोरीच्या हातावर चाकूचा वार झाला म्हणून. मग काय? लागली टीम कामाला.

अनिता, श्यामला चव्हाण, गौरी काळे झाल्या पुढे. पोरींशी बोलायचं होतं म्हणून. भेटल्या. कहाणी सांगितली. येणाऱ्याच साप्ताहिक बैठकीत निर्णय झाला ओझरला जाण्याचा, पथनाट्य करण्याचा आणि पोलिस व स्थानिक एच.ए.एल. प्रशासनाशी बोलण्याचा! तेव्हा व्ही. पी. सिंह सरकारने नुकताच मंडल आयोग लागू केला होता. अभ्यास वर्गात विषय किमान पातळीवर समजला होता. तेव्हा एवढंच समजलं होतं, की ज्या समाजासाठी आपण (संघटना) भांडतोय, ते प्रश्न काही प्रमाणात यात सामील आहेत. मग वस्तीतला माणूस तर परिसंवाद, चर्चासत्र, व्याख्यानाला येत नाही. त्याला विषय कसा पोहोचवायचा? उत्तर सापडलं. पथनाट्य! मला भलतंच आवडलं. कारण लिखाण, वाचन, भाषण नाही. संवाद फेकायचे होते. ॲक्टिंग करायची होती. (कधीतरी एका सिनेमाच्या कामासाठी मुंबईला जाऊनही आलो होतो. पेपरमधील जाहिरात वाचून) पण बोलीभाषेत, प्रत्यक्षात हो ला हा च म्हणत होतो. काय गं ला काय वं च उच्चारत होतो. ताटातल्या पदार्थाला वाढाऐवजी टाकाच म्हणत होतो. या संस्कारातल्या भीतीने पथनाट्यात स्वतःहून नाव दिलं नाही प्रमुख भूमिकांमध्ये. बहुतेक अनिताच्या घरी, राहुलवाडीत वरच्या मजल्यावर पथनाट्याची प्रॅक्टिस सुरू होती. प्रसंग होता मनपाची शाळा, शाळेत जाणारा मुलगा, त्याला विनवणी करणारी आई. पुढे शाळेत गेल्यावर छप्पर कोसळते, पत्र्याचे. पत्रा डोक्याला लागतो. आई धावत रडत येते. शाळा कायमची सुटावी म्हणून जरा अधिकच बोंबलतो. असा काही प्रसंग होता. उद्देश होता, की यानिमित्ताने मनपाच्या शाळांची दुरवस्था जनतेसमोर, पालकांसमोर आणि मनपासमोर आणणे आणि जुन्या नाशिकमध्ये एका शाळेत अशी घटना नुकतीच घडली होती. त्यामुळे भ्रामक असे काही नव्हते.

पोराच्या आईची भूमिका अनिता रंगवित होती. ती वस्तीतलीच असल्याने डायलॉग पॉवरफुल्ल आणि ओरिजनल येत होते. शाळेत जाणाऱ्या पोराची भूमिका आमची एक सहकारी मैत्रीण श्यामला करीत होती. पण, बरेच रिटेक होऊनही तिच्याकडून डायलॉग जमेना. म्हणजे तिची बोलीभाषा जमत नव्हती. मी गमतीने म्हटलो, मी करून पाहू का? इलाज नव्हता. केलं. मस्त रंगलं. पुन्हा वाडग्याचं रक्त कामात आलं. कुठलाही आविर्भाव न आणता संवादफेक होऊ लागली. चेहऱ्यावर कणव आणण्याचा प्रश्नच नव्हता. रोते क्यों हो? तो म्हणे सूरतही ऐसी! मात्रा लागू पडली. रस्त्यावर उतरलो. कागदावरची स्क्रीप्ट कागदावरच राहिली. एरिया, प्रश्न, समस्या, नागरिक, प्रतिसाद आणि गर्दीने प्रत्येक प्रयोगाला स्क्रीप्ट अपडेट होत होती. इतरही स्थानिक प्रश्न मांडले

जात होते तेवढ्याच पोटतिडकीने. मात्र, धम्माल केली, टाळ्या आणि बेंबीच्या देठापासून प्रतिसाद मिळाला तो अनिता आणि माझ्या शाळेच्या प्रसंगाला. नाशिककर खऱ्या अर्थाने आपलं दुखणं रस्त्यावर आमच्या तोंडून ऐकत, पाहत होते. फुलेनगरच्या भराडवाडीत पथनाट्य झाल्यावर फिरविल्या जाणाऱ्या डब्यांमध्ये एका दारूड्याने टाकलेली लाल रंगाची, चुरगळलेली मळकट वीस रुपयांची नोट सगळ्यात मोठी बिदागी होती आमच्या पथनाट्याला. बाकी चाराणे-आठाणे-रुपया नियमितचा होता. त्या नोटेला त्याच्या घस्टीसोबतच दिवसभरच्या घामाचा सुगंध होता. आमच्यासाठी अर्धपोटी राहून, बेफाम होऊन जनआंदोलन करणाऱ्या युवक-युवतींसाठी आयुष्यभर पुरणारा साठा होता. याच पथनाट्याचा प्रयोग सातपूर कॉलनी परिसरात होता. कॉलेज करून प्रयोग व्हायचे अन् लोकांच्या सोयीचंही असायचे. त्यामुळे सायंकाळीच होत. कामगार वसाहत असल्याने थोडा उशिरा. अर्धे पथनाट्य रंगात आलं. बाया-बापडे, पोरं मोठं रिंगण करून प्रत्येक वाक्य संवादाचं कान देऊन, पाहिजे तिथे हसून, टाळ्या वाजवून दाद देत होते अन् वीज गेली. साऱ्यांचा हिरमोड झाला. आम्हीही थोडे हिरमुसलो; पण माहीत नाही कसं जमलं सारं. दहा-बारा मिनिटांत चाळीमधल्या महिलांनी घरातील कंदील, रॉकेलचे दिवे, टॉर्च आणले आणि उजेड तयार केला. पुढचं करा म्हणाले, व्वा, क्या बात है! या ठिकाणी प्रोत्साहन, प्रेरणा नावाच्या संकल्पनेला हद्दपार करून पुढे सरकलेलं हे पाऊल रोखणारे आम्ही कोण होतो? त्या मिणमिणत्या उजेडात आम्ही पथनाट्य करीत होतो. शाळांचे, कामगारांचे प्रश्न मांडत होतो अन् उपलब्ध उजेडापेक्षा दहापट मोठ्या अपेक्षांचं तेज पाहणाऱ्यांच्या चेहऱ्यावर आम्ही पाहत होतो, कार्यकर्ते म्हणून!

याच काळात जॉर्ज फर्नांडिस यांची नेहरू उद्यानाजवळ एक सभा होती. जॉर्जसाहेब येण्याला अजून वेळ होता. नागरिकही जमत होते. नाशिकचेच होते ना ते? मग आमचं पथनाट्य कुणाचं होतं? आयोजक सहकारी मित्रांची परवानगी घेतली अन् स्टेजसमोरच्या मोकळ्या जागेत प्रयोगाला सुरवात झाली. तोपर्यंत मॉबचा आकार आणि दिशा पाहून सादर करण्याची कला, नेपथ्य सारे जमायला लागले होते. नेहमीसारखाच प्रतिसाद मिळत होता. ३५ मिनिटांचे पथनाट्य होते. दहा मिनिटे झाली असावीत. जॉर्जसाहेब आले. आम्ही थांबलो. आता सभा सुरू होणार म्हणून, मांड्या घालून समोरच पटापटा बसलो. स्टेजच्या पायऱ्या चढताना साहेबांनी बहुतेक पथनाट्याचा संवाद ऐकला असावा. माहिती घेतली अन् आयोजक कार्यकर्त्यांनी पटापट स्टेजवरचे माईक खाली दिले. आम्हाला सांगितले, पथनाट्य सादर करा. मोठा सुखद धक्का होता. एवढ्या

मोठ्या जमावासमोर आता डायलॉग पोहोचणार होता. पुढचं पथनाट्य जोरदार, धारदार हुंकाराने सादर झालं. जॉर्ज फर्नांडिस वरून, स्टेजवरून बारकाईने आमचं पथनाट्य पाहत होते. अशाच अनेक प्रसंगांनी या पथनाट्याने आम्हाला नाशिकची एक सक्रिय आणि परिणाम साधणारी संघटना म्हणून ओळख निर्माण करून दिली होती.

अनिता, श्यामला, गौरी ओझरच्या पोरींना भेटल्या. दुसऱ्या-तिसऱ्या दिवशी ओझरला काही कार्यकर्ते, पदाधिकारी जाऊन आलो. पथनाट्य आणि निवेदनाचा कार्यक्रम ठरला. आमचा दिवंगत पाठीराखा रतन जाधवने विशेष पुढाकार घेतला. आदल्या दिवशी बसस्थानक व मार्केट परिसरात पथनाट्य आणि दुसऱ्या दिवशी धरणे आंदोलन, एच.ए.एल. गेटसमोर. बसस्थानकावरचा प्रयोग ३५ मिनिटांचा केवळ पंधरा मिनिटांत सादर करावा लागला. का? बस आली की लोक पळायचे. बस पकडायला. त्यामुळे अनेक प्रसंग न दाखविताच आटोपले. मार्केटवरचा प्रयोग मात्र पाच मिनिटे अधिकच करावा लागला. कारण सारे कामगार कामावरून सुटले होते. बाया भाजी-मसाला घ्यायला आलेल्या होत्या आणि कशासाठी करतो म्हटल्यावर तर आणखीच जवळीक साधली. पाचशेचा किमान जमाव असावा. सायंकाळच्या गार हवेत मस्त प्रयोग झाला. परिणाम चांगला झाला. दुसऱ्या दिवशी आमच्या १५-२० कार्यकर्त्यांसमवेत स्थानिक नागरिकही धरणे आंदोलनासाठी मंडपात दाखल झाले. चहापान, नाश्त्याची सोय केली. प्रशासनावरही योग्य दबाव पडला. या निमित्ताने पोलिसांच्या फेऱ्या आणि अनेक दिवस तक्रार करून नादुरुस्तच राहिलेले पथदीप स्ट्रीट लाईट तातडीने सुरू करण्याचे प्रशासनाने मान्य केले. केलेल्या श्रमाचे चीज झाले होते. सारे खुशीत होतो. पुढे कॉलेजात संपन्न होणाऱ्या बैठका, कार्यक्रमांना बोलाविणे, निमंत्रणे आम्ही त्या पोरींनाही देऊ लागलो. फार वेळा आल्याचे आठवत नाही. वाईट वाटून घेण्याचेही कारण नव्हते. असे नेहमी घडायचे. पुढे किस्सा समजला, तेव्हा मात्र आश्चर्यच वाटले. ओझरच्या निमित्ताने स्थानिक कार्यकर्ते, राजवाड्यातले बोलवू लागले. आनंद वाटला. गेलो. बाबासाहेबांच्या पुतळ्यासमोर चावडीत पथनाट्याचे छान सादरीकरण झाले. नंतर कार्यकर्त्यांशी बैठक. चहापान आणि इतर चर्चा. एका कार्यकर्त्याने ओझरची घडलेली घटना सांगितली. बरेच विद्यार्थी नाशिकला शिकायला यायचे. त्यांना प्रशासनाने बसेसही दिल्या होत्या. यात मुलींची संख्या अधिक असायची. या पोरींची एक मोठी अडचण होती. बॉयफ्रेंडची. त्यांनी मान्यता दिलेला मित्र कॉलेजात असायचा. नाशिकचा. पण, स्थानिक पातळीवरही एखादा मागे असायचा. त्याचा ससेमिरा चुकविण्यासाठी काही

जणी, फार नाही, त्यालाही होकार द्यायच्या. आम्ही जिच्यासाठी आंदोलन केले, त्या पोरीचेही असेच झाले होते. तिने स्थानिकाला होकार दिला होता. एकदा तो अचानक कॉलेजला, नाशिकला आला अन् तिचा ओरिजनल हीरो पाहिला! दुसऱ्या-तिसऱ्या दिवशी या ओझरच्या बहाद्दराने सायंकाळी ती काही दळण-भाजी-क्लास कुठल्या एका कारणासाठी बाहेर पडल्यावर थोड्याशा अंधारात गाठले अन् थेट हातातला चाकू काढून तिला फैसला करायला सांगितले. ती बिचारी घाबरली. पुढं केलेला चाकू घट्ट पकडून (प्रतिकारासाठी) ओरडू लागली, याचीही हवा टाईट. जर लोक आले तर? म्हणून स्वतःची सुटका करून घेण्यासाठी असलेला चाकू खसकन् ओढून पसार झाला. या बयेनंही तो घट्ट पकडलेला होता. त्यामुळे चाकू उपसताना तळहातावर वार झाला होता. आम्ही काय बोलणार? राजवाड्यात. अरे जाऊ द्या. या निमित्ताने रस्त्यावरचे लाईट तर लागले ना! असे आमचे स्पष्टीकरण. खरं तर त्या लाईटचा उजेड या राजवाड्यात कधी येणारच नव्हता, हे आम्हालाही ठाऊक होते.

संघटनेच्या माध्यमातून, समता आंदोलनाच्या काही गोष्टी नेमक्या समजल्या. त्यापैकी एखादे जनांदोलन कसे पुढे रेटायचे, दिशा कशी ठरवायची, राजकीय भूमिकेचा स्पर्श न होऊ देता राजकारणही करायचे? याचे ट्रेनिंग छान झाले. त्याचे पडसाद समोर होणाऱ्या निर्णयांमध्ये दिसत होते. नाशिकमधील मनपाच्या दुरवस्थेचा प्रश्न पोटतिडकीने मांडण्याचा यशस्वी प्रयोग झाला. यासाठी जसे पथनाट्य उपयोगी ठरले, तसाच सातत्याने राबविलेला गेलेला गरिबांच्या शिक्षणाचा लढा उपक्रमही सार्थ ठरला. याच कार्यक्रमाला बळकटी देणारा एकलव्य गौरव समारंभ हा फार दिशादर्शक असा उपक्रम ठरला. दरवर्षी इयत्ता दहावीच्या परीक्षेत उत्तीर्ण होणाऱ्या वस्तीतल्या मुलांचा सत्कार करून, पुढील शिक्षणासाठी त्यांना प्रोत्साहित करण्याचा हा कार्यक्रम होता. दै. सकाळचे तत्कालीन संपादक उत्तम कांबळेंपासून ज्येष्ठ अभिनेते डॉ. श्रीराम लागू यांच्यासारख्या सहृदयी व्यक्तींनी सत्कारपात्र युवकांसह संघटनेच्या आम्हा कार्यकर्त्यांचे मनोबल कायम ठेवण्यात फार मोठा हिस्सा उचलला. संघटनेच्या या रेट्याने त्या वेळी मनपा प्रशासकांनी मनपाच्या शाळा दुरुस्तीसाठी ८० लाख रुपयांचा निधी मंजूर केला होता, हे यश नाकारता येत नाही. शिक्षण, महिला, सांप्रदायिकता यावर संघटना विशेष करून कार्यक्रम राबवित होती. त्या वेळी एच.पी.टी. महाविद्यालयाच्या अभ्यासिकेला लायब्ररीला डॉ. हेडगेवारांचा फोटो देण्याचा कार्यक्रम काही संघटनांनी ठरविला होता. त्या कोणत्या असतील हे अधिक सांगायला नको. आम्ही कसं सहन करणार? प्राचार्य

चौरेंना संघटनेच्या लेटरहेडवर विरोधाचे पत्र, निवेदन दिले. त्यांनी सांगितले, की भेटकर्त्यांनी विद्यापीठाकडून परवानगी आणली आहे. विद्यापीठाशी पत्रव्यवहार केला. पण, कार्यक्रम होणारच होता. ठरले. कार्यक्रमात जाऊन निषेध नोंदवायचा. टेन्शन होतं. संघाचा प्रचारक असलेला (आर.एस.एस.) एक वक्ता येणार होता. आम्ही दहा-बारा जण वेळेत पोहोचलो. अरुणही होता या वेळी. तो महाविद्यालयीन आंदोलनात पडद्यामागची सारी भूमिका एरवी पार पाडायचा. पण, हा धोका अधिक मोठा होता. झाले. कार्यक्रम सुरू. हॉल तुडुंब भरलेला अगोदरच. आम्ही रांगेत मागच्या भिंतीला टेकून हाताच्या घड्या घालून उभे. एक कार्यकर्ता साऱ्यांना कपाळावर टिळे लावत होता. माहीत असूनही आमच्यापर्यंत आला. आम्ही नकार दिला टिळे लावायला. ही सुरवात होती. दाढी वाढविलेला, धोतर-झब्बा घातलेला वक्ता आला. औपचारिक पुष्पहार घातला गेला. वक्ता बोलायला उभा राहिला. संघ परिवाराच्या विचारांनी प्रेरित झालेली अडीचशे-तीनशे महाविद्यालयीन युवक-युवती समोर होते आणि विरोध करणारी आम्ही १२-१५ लोक फक्त. काय कांडी फिरली माहीत नाही; पण डॉ. हेडगेवारांचा फोटो तर सोडाच, पण संपूर्ण दीड तासाच्या कार्यक्रमात एकदाही साधा उल्लेखही झाला नाही. उलटपक्षी प्रमुख वक्त्याने डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा उदो उदो केला. इथपर्यंत की, काळाराम मंदिर प्रवेशासाठी त्या वेळी डॉ. आंबेडकरांना विरोध करण्याऐवजी पायघड्या घालावयास हव्या होत्या, असे विधान करून आम्हालाही आचंबित केलं. वक्त्याचे भाषण संपताच अरुणने पाय काढला. आम्हीही हॉल सोडण्याचा तो इशारा होता. दुसऱ्या दिवशी आम्ही जाम खूश! कसा कार्यक्रम फेल केला म्हणून!

त्याचवेळी संघाचे दोन कार्यकर्ते आमच्याही बैठकांना येत होते. त्यांच्या अपरोक्ष आम्ही अरुणला सांगून त्यांना थांबव म्हणून सांगितलं होतं. पण, त्यांचे मन आणि मतपरिवर्तन करणे हेही संघटनेचे काम नव्हे तर भूमिकाच आहे म्हटल्यावर काय करणार? या कार्यक्रमानंतरच्या येणाऱ्या रविवारी बैठकीला ते दोघंही आले. खासगीत म्हणजे अनौपचारिक चर्चेत त्यांनी आमच्या साहसाला मनापासून दाद दिली आणि आमची भूमिका तिथल्यापुरती योग्य होती, असंही कबूल केलं. पुढे जाऊन सांगितलं, की तिथे आयोजकांमध्ये काही युवकांनी जाकिटस् घातले होते. त्यांच्याकडे चाकूसारखी हत्यारे तुमच्या म्हणजे विरोध करणाऱ्यांच्या बंदोबस्तासाठी होती. पण, फोटो देण्याचा कार्यक्रम का रद्द केला ते या दोघांनाही माहीत नव्हते. आम्ही एक मोठी लढाई जिंकण्याच्या उन्मादात होतो. अरुणने वेळ साधली आणि संघ परिवाराची काम

करण्याची, वार, पलटवार, संयम, समोरच्याची धार बोथट करण्याची, आक्रमक होण्याची पद्धत अतिशय परखड शैलीत मांडून आम्हाला जमिनीवर आणले. आतापर्यंत सांप्रदायिकता या मिळमिळीत वाटणाऱ्या शब्दाची दाहकता अरुणच्या त्या अभ्यासवर्गाने बऱ्याच अंशी जाणवली होती. आम्ही उन्मादापलीकडे जाऊन, संयमाने आणि धोरणी वृत्तीने पुढील प्रत्येक बाबतीत आखणी करू लागलो. आता भावनेला वास्तविकतेची जोड मिळत चालली होती. अरुण हे काम फार सुंदरपणे प्रत्येक व्यक्तीगणिक करीत होता. तो साऱ्यांचा मित्र होता. तसाच चळवळीतला जबाबदार पालक होता. हे पालकत्व अतिशय डोळसपणे तो झेलत आमच्यातला कार्यकर्ता, नेता, प्रतिनिधी तयार करीत होता.

एच.पी.टी. महाविद्यालयातला हा एक तात्त्विक संघर्ष सोडला तर प्रतिगाम्यांच्या विद्यार्थी संघटनांशी आमचा कधीही संघर्ष किंवा झगडा झाला नाही. उलटपक्षी या घटनेनंतर अ.भा.वि.प. आणि विद्यार्थी सेनेचे पदाधिकारी आता किमान चर्चा तरी करू लागले होते. विद्यार्थ्यांच्या फीवाढीविरोधातील आंदोलनात तर सारे एकत्र झाले होते. परंतु लीड, पुढाकार घेण्याचा मान नकळतपणे समता आंदोलनाकडे आला होता. तो केवळ वैचारिक शहाणपणामुळे. नियोजनात साऱ्या जागा ठरल्या होत्या. अनिता के.टी.एच.एम. कॉलेज, आम्ही बी.वाय.के., एच.पी.टी., आर.वाय.के., एस.एम.आर.के., एन.बी.टी. लॉ कॉलेज आणि सारे मिळून जमेल तसे पंचवटी कॉलेजच्या बैठका आणि आंदोलनाच्या दिवसाची जबाबदारी सांभाळायचो.

मी इंग्रजी स्पेशलचा विद्यार्थी असल्याने बरेच हिंदी भाषिक विद्यार्थी आमच्या वर्गात होते. अर्थात, मी लाईन मारीत असलेली पोरगीही होती. श्यामलाने याची छान गंमत केली. आखणी करतानाच माझ्याच वर्गावर मी कसे भाषण करील, अशी फिल्डिंग लावली. नकाराचा प्रश्न कुठं होता. गेलो वर्गावर. शिक्षकांना विनंती केली, पाच-दहा मिनिटे देण्याची. हिंदीत पाच-सहा मिनिटे मुद्याचे भाषण ठोकले. अर्थात, ती पोरगी बसली होती त्या रांगेकडे नजर न टाकताच. कोपऱ्याला उभी श्यामी (श्यामला) मात्र हसत मजा घेत होती. पण, मला कार्यकर्ता म्हणून अधिक फायदा झाला. दडपणाच्या वेळी आणि ठिकाणी संघटनेची भूमिका मांडता आली. त्यामुळे पुढल्या बैठकांमध्ये अधिक धारदार आणि प्रभावीपणे बोललो. आंदोलन यशस्वी झाले होते. ही माझ्यातील कार्यकर्ता घडवण्याची प्रक्रिया होती.

परित्यक्त्या महिलांच्या प्रश्नावर राज्यभर संघटनेचं मोठं यशस्वी आंदोलन छेडलं. त्याचा फार फायदा झाला. अगदी महत्त्वाचे कायदे करविण्यापर्यंत. एका अराजकीय

संघटनेने परित्यक्त्या महिलेला स्वतंत्र रेशनकार्ड आणि आई सांगेल तीच मुलाची जन्मतारीख विनापुराव्याची ग्राह्य धरून शाळेत प्रवेश देण्याचा कायदा पारित करण्यास शासनाला भाग पाडले. पुणे, नगर, नाशिक, ठाणे ते मुंबई अशा परित्यक्ता मुक्ती यात्रेच्या प्रवासाची आणि सुमारे वीस-बावीस हजार परित्यक्तांनी काळा घोडा परिसरावर दिलेली ती यशस्वी धडक होती. मला आठवते, त्याप्रमाणे वीस ते बावीस मागण्यांपैकी या मोर्चात आठ महत्त्वाच्या मागण्या मान्य झाल्या होत्या. वरील दोन त्यापैकीच.

कार्यकर्त्यांचे श्रम आणि बोलीभाषा काय जादू करतात? याचा याच विषयातील एक प्रत्यय आला. परित्यक्तांचा प्रश्न आणखी पुढे रेटण्यासाठी औरंगाबादला परित्यक्ता हक्क परिषद झाली. पुन्हा बैठका सुरू. आता मात्र वस्त्या, शाळा-महाविद्यालये अशा बैठका गरजेच्या नव्हत्या; तर लाभार्थी महिलांना शोधून, धुंडाळून त्यांनाच या परिषदेला न्यायचं होतं. या वेळी या कामासाठी आम्हाला दिवंगत कुसुमताई पटवर्धन आणि महिला हक्क संरक्षण समितीची मोलाची मदत झाली. नाशिकहून औरंगाबादला रेल्वेने म्हणजे दोन टप्प्यांत न्यायचे होते. नाशिक ते मनमाड आणि रात्री दोनला मनमाडहून औरंगाबादला जाणारी गाडी पकडायची होती. खूप पायपीट करावी लागली; पण ज्या बायकांना भेटत होतो, त्यांचा प्रतिसाद आमच्यातली ऊर्जा आणि ऊर्मी आणखी वाढवित होती. एक महिला तिरडशेत (त्र्यंबकरोडवर, पिंपळगाव बहुलाच्या अलीकडे) येथील होती. अनिता आणि मी पोहोचलो. घर सापडले; पण बाई घरी नव्हती. शेतावर मजुरीसाठी गेली असावी. पण, फार अंतर नव्हते. तिच्या पोरीने बोलावून आणलं. थोराड वाटत होती; पण पंचविशीपेक्षा जास्त नसावी. आली उत्साहाने. माहिती घेतली. चहा करून पाजला. नक्की येते म्हणाली. परतताना अनिताला म्हटलो, 'दिवसाढवळ्या आपल्याला इतका त्रास झाला इथं पोहोचायला. ही बाई नाही येणार.' फार बारकाईने नियोजन आणि जबाबदाऱ्या होत्या. होकार देणाऱ्या दोन हजार बायकांची पत्त्यांसह यादी तयार झाली होती. पोस्टकार्ड पाठविले गेले. गाडीची वेळ, पत्ता, औरंगाबादचा पत्ता, होईल तेवढी माहिती दिली, तेव्हा संपर्कासाठी काही साधनं नव्हती. थेट भेट!

ठरल्याप्रमाणे नाशिकरोड रेल्वेस्थानकावर बायका आल्या. अनिता आणि बाकी सहकारी बारीकसारीक माहिती घेत होत्या. आमच्या टीममधील न येणाऱ्या बायकांमध्ये ती तिरडशेतची बाई नव्हती आली. मला अपेक्षितच होते ते. नाशिक ते मनमाड रात्री बाराला पोहोचलो. दोनपर्यंत बायका जाग्या आणि जागेवर ठेवायच्या होत्या. मग गटागटाने गाण्याच्या भेंड्या आदी सुरू. दोनला येणाऱ्या गाडीत साऱ्या बायकांना बसविले. गाडी

बराच वेळ थांबली होती. बहुतेक कार्यकर्त्यांनी इंजिन ड्रायव्हरला सांगितले असावे. आम्ही चार-पाच जण उरलो होतो. एका बोगीत शिरलो तर खरे. गर्दी म्हणजे गर्दी. आम्ही आत घुसताच बोगीची दारं बंद. नंतर कळाले की ती सामानाची बोगी होती. दाराच्या फटीतून येणारा थोडासा वाराच गाडीचा वेग सांगत होता. पहाटे पाच-सहाला पोहोचलो. मंडपात बायकांना बसविले आणि निवांत झालो. आणखी काही चर्चा करत उभेच होतो, तर कडेवर एक मूल असलेली एक बाई अनिता अन् माझ्याकडे येत म्हणाली, 'ताई, वळखलं का मला?' आमचा विश्वासच बसेना. ती बाई होती तिरडशेतची आदिवासी परित्यक्ता! अनिताने काळजीने विचारले, 'अहो कशा आल्या? तुम्हाला गाडीचा टाईम माहीत नव्हता का? पत्र नाही मिळालं का?' उस्त्फूर्तपणे हसत तिने सांगितले, 'अहो नाही ताई, मी आले व्हते नाशिकरोडला; पण बस लवकर नव्हती मिळाली. तवा आपली गाडी निघून गेली व्हती. मग मी तशीच माघारी वळाले, सी.बी.एस.ला गेले. औरंगाबादची गाडी इचारली, अन् बसले बसमधी. उशीर तर नाही ना झाला?' आजही त्या बाईचा चेहरा समोर आला, की सलाम ठोकण्याशिवाय भावनाच मनात उमटत नाहीत!

समता आंदोलन ही एक सामाजिक संघटना होती; परंतु राजकारणाशी आमचा काही संबंध नाही, अशी अजिबात भूमिका नव्हती. त्यामुळे त्या त्या वेळी समाजाविरोधी उमटणाऱ्या राजकीय घडामोडींवर भाष्यही आम्ही करीत असू. संघटनेचे परिसंवाद हे बरेचसे राजकीय भूमिका मांडणारे आणि जनतेला बोलते करणारे असायचे. एकलव्य गौरवच्या माध्यमातून शिक्षणातील त्रुटींसोबतच राजकीय पक्षांची अनास्था जागी करण्याचे काम करीत होतो. जुन्या नाशिकमधील कथडा भागातील एका शाळेचा पत्रा अंगावर पडून एक विद्यार्थिनी जखमी झाली होती. मनपाचे म्हणणे होते, की मालकाने दुरुस्ती करायला हवी अन् मालक म्हणत होता शाळा कुणाची? संघटनेला त्यात काही रस नव्हता. दोघंही द्रोणाचार्यांची भूमिका पार पाडत होते. अंगठा कापण्याची! पहिला अन् एकमेव पालकांचा मोर्चा मेनरोड कार्यालयावर नेला. काँग्रेसचा बडा पुढारी शिक्षण मंडळाचा सभापती होता. त्याने केवळ कॅबिन सुशोभित करण्यासाठीच तेव्हा एक लाख रुपये मंडळाचे खर्च केल्याचे ऐकले होते अन् इकडे डोक्यावर पत्रा पडून एक गरिबाची पोर जखमी होते म्हणजे काय? सभापती, उपसभापती अगोदर येण्यास नकारच देत होते. आम्ही आणखी आक्रमक झालो. कार्यकर्त्यांनी ठरविले, मेनरोडच्या इमारतीच्या (कार्यालयाच्या) मोकळ्या जागेत शाळा भरवायची. एक लाकडी टेबल घेतलं. टेबलावर उभा राहिलो. मोर्चात दप्तरासह सामील एक विद्यार्थ्याकडून हिंदीचं पुस्तक घेतलं अन्

हिंदी कविता शिकवायला लागलो, 'निकला सूरज हुआ सवेरा, कोयलने भी कूक लगायी। अब तो जागो मेरे भाई।' चारशे पोरांचा चढलेला एकसुरी आवाज सभापतींच्या कॅबिनकडे एक साथ हात करीत घुमू लागला, 'अब तो जागो मेरे भाई।' मग काय? मेनरोड पॅक, नागरिकांच्या गर्दीने. काय तमाशा आहे म्हणून! पोलिसांचं टेन्शन वाढत होतं. त्यांनीच मग पुढाकाराने पदाधिकाऱ्यांना बोलाविले. आले सभापती, उपसभापती. थातूर-मातूर उत्तरं देऊ लागले. मागे पालकही उभे होते. बायकांचा भरणा अधिक होता अर्थातच! मला शिष्टमंडळात जाण्यात फारसा रसही नव्हता. म्हणून मागेच थांबलो. फार काही हाती लागत नाही, याचा अंदाज घेतला. उभ्या असलेल्या बायकांमध्ये पाच-सहा नागसेननगरच्याच होत्या. हळूच एकीच्या कानात कुजबुजलो, 'त्या पोरीच्या डोक्यात पत्रा पडला ना, तो याच्याचमुळं!' असं म्हणून सभापतीकडे खुणावले. संपलं. नंतर जे काही बायकांनी सुनावले आणि ज्या भाषेत सुनावले ते लिहिणे अन् वाचणेही अवघड व्हावे. इतकी भयानक वाक्ये होती, की अखेर उपसभापती, सभापतींनाच म्हणाले, 'जर तुम्ही ताबडतोब निर्णय घेणार नसाल तर मी माझा राजीनामा देऊन आताच या लोकांमध्ये सामील होईल.' घाव वर्मी लागला होता. तातडीने कारवाई, सुधारणांचे लेखी आश्वासन देण्यात आले. अपेक्षेपेक्षा जरा अधिकच यश मिळाले होते या आंदोलनाला! यानंतर मात्र पोलिसही गांभीर्याने दखल घेऊ लागले होते, संघटनेच्या कार्याची अर्थात पॉझिटिव्हली!

एकलव्य गौरव पुरस्कारार्थींना देण्यात येणाऱ्या प्रशस्तिपत्रावर छापण्यासाठी वि. वा. तथा तात्यासाहेब शिरवाडकरांनी चार ओळी खरडल्या. त्या सारं काही सांगणाऱ्या होत्या, असंच म्हणावं लागेल.

'ज्याला न नांव काही देऊन नांव त्याला.
ते नांव राखण्याला, घनघोर ही लढाई।'

दिवंगत तात्यासाहेब आम्हा युवकांच्या भूमिकेला साथ देत होते. १८ वर्षे वयाच्या व्यक्तीला मतदानाचा अधिकार मिळाला, कायदा झाला. संघटनेनं परिसंवादामधून पुढलं पाऊल टाकलं. फ्रेनीबाई दस्तूर हॉलमध्ये परिसंवाद झाला. मतदानाचा हक्क मिळाला, रोजगाराचे काय? तात्यासाहेब स्वतः आले; पण व्यासपीठावर नाही बसले. ठरवून भिंतीला टेकून शेवटच्या रांगेत बसले आणि सारा परिसंवाद ऐकला. पण, छान डिबेट झालं. समाजवादी आणि आंबेडकरी विचारधारांचा स्पार्कही दोन वक्त्यांच्या भाषणातून झाला. छात्रभारती संघटनेची प्रमुख असलेली कार्यकर्ती म्हणाली, 'रोजगाराची व्याख्या

तपासली पाहिजे. घरातील दळण आणून देणं काम नाही का? मग आजचा तरुण ते का स्वीकारत नाही?' तिचं भाषण जरा खटकलं होतं; पण आयोजक असल्याने मुद्दा कसा खोडणार? तेव्हा प्रा. गंगाधर अहिरे उभे राहिले बोलायला. तेव्हा ते बहुतेक शिकतच असावेत. झणझणीत भीमटोला लगावला, 'मॅडम, तुम्ही म्हणताय दळण आणणं हा सुद्धा रोजगार आहे; पण इथं आमच्या डबड्यात पीठच नाही तर दळण आणणार कुठून?' टाळ्या. तोपर्यंत तात्यासाहेबांना ज्ञानपीठ मिळाला होता. कान देऊन ऐकत होते. दाद दिली. अशी चर्चा, संवाद घडताना इतर पुस्तकं माझ्यासारखा कार्यकर्ता वाचणार कुठून अन् कधी? कामच इतकं होतं, की हिशेब नाही. आमच्या अरुण ठाकूरने तर नोकरी सोडायची भाषाच सुरू केली होती तेव्हा. आक्कासोबतच (अरुणची आई) आम्हीही हादरलो होतो. कारण तोपर्यंत आम्हीही शिकत होतो नोकरीसाठीच ना!

# हॉकर्स युनियन...

संघटनेचं काम जवळपास १९९१-९२ ला संपलं होतं. एक राजकीय आघाडी निघाली होती. आमच्या बऱ्याच युवकांचं म्हणणं होतं की ज्यांना सक्रिय राजकारण करायचं त्यांनी ते करावं, आम्ही संघटनेचं काम करतो. अर्थात, निवडणुकीत तुम्हाला सपोर्ट करूच. परंतु माहीत नाही तेव्हाच्या नेतृत्त्वाला काय भीती होती. निर्णय लादला गेला असेच म्हणावे लागेल. कारण या राजकीय आघाडीला विरोध करणाऱ्या ज्येष्ठालाच अनुमोदन देण्यासाठी असहाय्य करण्यात आले होते. एक अपरिपक्व राजकीय खेळी खेळली गेली. असो. यानिमित्ताने व्यक्तिगत, एक कार्यकर्ता म्हणून मला भरमसाट मिळाले होते. पुढच्या कामकाजात मला मोठी मदतच झाली.

काही काळ हॉकर्स युनियनचा समर्थनार्थी कार्यकर्ता म्हणून काम करण्याची संधी मिळाली. साथी शांताराम चव्हाण, सय्यद युनूस आदींसोबत काम केलं. लग्नही झालं होतं अन् कॉलेज अर्ध्यातच सुटलं. पण, सामाजिक आणि राजकीय व्याप मात्र कमी नव्हते झाले. हॉकर्सचा लढा हा अविरत संघर्षाचा लढा. त्यावर फार लिहिणे किंवा बोलण्याचा

माझा अधिकार नक्कीच नाही. कारण, मी स्वतः हॉकर्स, फेरीवाला नव्हतो. श्रमिक, कष्टकरी या समाजाचा भाग आहे म्हणून त्यांच्या लढ्यात होतो.

एकदा सकाळी नऊला अग्रवाल सभेत नोकरीवर जात असताना शांतारामभाऊंचा फोन आला, कुठे आहेस? सांगितले, घरीच आहे. म्हणाले, 'दहा-पंधरा मिनिटांत येतोय, वणीला जायचे आहे.' ऑफिसला फोन करून दुपारी येतो म्हणून सांगितले. दोन सुमो गाड्यांमध्ये हॉकर्स आणि भंगार व्यापारी युनियनचे पदाधिकारी आले होते. चहापान करून लगेच निघालो. अनिता अजिबात वेळ लावत नसे अशा कामांना. वणीला जाताना शांतारामभाऊंनी कारण सांगितले. तिथे हॉकर्स युनियनच्या एका पदाधिकाऱ्याचे हॉटेल होते. त्याच्या हॉटेलावर एक विधवा बाई पोळ्या, भाकरीचे काम करायची. तीन-चार दिवसांपूर्वी तिथेच रात्रीच्या अंधारात दोन जणांनी तिच्यावर बलात्कार केला. बाई आदिवासी होती. आमच्या पदाधिकाऱ्याने म्हणजे हॉटेलच्या मालकाने पोलिसांत तक्रार करूनही काही फरक पडला नव्हता. ते दोघे कल्याणहून तडीपार असलेले गुंड होते आणि इथे शिवसेनेचं काम करीत होते. रस्त्यातच रक्त सळसळत होतं. वणीला पोहोचलो. शांतारामभाऊंनी सारे नियोजन अगोदरच केले होते. त्याप्रमाणे सारे घडत होते. देवस्थानच्या ट्रस्टींना भेटलो. त्यांनीही घटनेला दुजोरा दिला. त्यांनाही समजावले. घटना देवस्थानाच्या जवळ घडली आहे. उद्या कारवाईच्या मागणीच्या निमित्ताने बदनामीही होऊ शकते. आता आम्ही सभा घेणार आहोत. तुम्ही या आणि देवस्थानची (ट्रस्टची) बाजू मांडा, जी काही असेल ती. हो म्हणाले, पण आले नाहीत. स्वाभाविक होते. आम्हाला फरक पडणार नव्हता. त्या दिवशी नेमकी गर्दीही अधिक होती. छान सभा झाली. शांतारामभाऊंच्या अगोदर सळसळत्या रक्ताचे प्रास्ताविकवजा भाषण मी ठोकले. दम भरला. इशारे दिले. साऱ्यांना आवडले. भाऊंना हेच अपेक्षित होते. पुढचा किल्ला त्यांनी लढविला. सभा झाल्यावर पदाधिकाऱ्याने हॉटेलमध्येच जेवण खावू घातले. चार दिवसांपूर्वी अत्याचार झालेली बाईच पोळ्या लाटत होती; पण घडाघडा बोलत होती. तिला शक्य तितके आश्वस्त केले. जेवण सुरू असतानाच इन्स्पेक्टरचा निरोप आला. जेवण झाले की चहाला या चौकीवर. अपेक्षित आणि आश्वासक होते. गेलो. भाऊंच्या शेजारीच खुर्चीत बसलो. चहा मागविला. भाऊंनी पुन्हा प्रसंगाचे गांभीर्य सांगितले. सारे ऐकले. पाहतो म्हणाला. माझ्याकडे पाहून म्हणाला, 'छान, दमदार भाषण ठोकता. पोलिसही नाही सोडले?' राग होताच मनात उफाळून आला. पण, शेजारीच भाऊ होते. उत्तरलो, 'साहेब तसे फार काही नाही. आमच्या नेत्यांनी शिकवलंय कुठे काय

ते बोलायचे आणि हो आता परत आम्हाला इथं यायची गरज नाही. एस. पी. ऑफिस नाशिकलाच आहे.' भाऊपण गालातल्या गालात हसले. चांगली लगावली म्हणून. नाशिकला परतलो. भाऊंनी स्वतः निवेदन तयार केले. एस.पीं.ना पत्र दिले. त्याची पोहोच बातमी म्हणून पेपरला दिली. दैनिक लोकमतने मी भाषण करतानाचे छायाचित्र अन् बातमी पहिल्या पानावर छापली. तशी बातमी सगळ्याच वर्तमानपत्रांनी छान छापली होती. उचित परिणाम झाला. तीन दिवसांनी सकाळी उठताच पेपरला बातमी वाचली अन् भाऊंना फोन केला. बलात्कार करणाऱ्या दोन भावांना अटक करून पोलिस कोठडी मिळाली होती. हॉकर्स मार्केटला गेलो. सारी मंडळी खूश होती. पुढं आठ वर्षांनी बातमी वाचनात आली. या केसमध्ये या बाईला पंचवीस हजार रुपये भरपाई आणि दोन भावांना दहा वर्षांची शिक्षा झाली होती. त्या बाईचा अन् हॉकर्स युनियनचा काही एक संबंध नव्हता. पण, अन्यायाविरुद्धचा यल्गार हाच नेतृत्वाचा गुण असल्याने एका चौकसभेने कायद्याचं राज्य आहे, हे सिद्ध केलं होतं. ही संघर्ष करण्याची जणू सवयच जडली होती. त्याला कारणही होतं. ज्या वर्गासाठी लढत होतो तो संपूर्ण ताकदीनिशी प्रतिसाद देत होता. हॉकर्सच्याच कामात असताना वडाळा गावात एका बैठकीसाठी गेलो. शांतारामभाऊंनीच बहुतेक पाठविले होते. सावित्रीबाई फुलेनगर ही वसाहत शांतारामभाऊंच्याच पुढाकाराने इथे आली होती. पूर्वी आताच्या मुंबई-आग्रारोडवर वसलेली होती. १९७२ च्या दुष्काळात विस्थापित झालेले आणि अगोदर स्टेडियम कॉम्प्लेक्स व गोल्फ क्लब मैदानाच्या मोकळ्या जागेतील हे लोक आता हायवेवर एकत्रित राहत होते. इथे राष्ट्र सेवा दलाची शाखाही भरायची. मी कधी-कधी जायचो. नियमित नाही. पुढे कार्यकर्ता झाल्यावर केंद्रबिंदू झाली ही वस्ती आणि रोड वायडिंगच्या नावाने सध्याच्या ठिकाणी आली. तर इथे बैठकीला गेलो. माझ्या आणि कार्यकर्ते, नागरिकांच्या सोयीसाठी रात्री आठला बैठकीची वेळ होती. पण, सारे कष्टकरी येता-येता दहाला सुरू झाली. तेव्हा आम्ही राहुलवाडीत, पेठरोडला राहायला होतो. अनिताला माहीत होते वेळ लागणार म्हणून. अकरा-साडेअकराला बैठक संपली. नंतर एक-दोन ठिकाणी चहापान करून निघालो. पाहतो तर एम-८० पंक्चर. आता रात्री बाराला कोण पंक्चर काढणार? वेगवेगळे सल्ले. मी म्हटलो, 'गाडी इथेच ठेवतो. मोटारसायकलने वडाळा नाक्यावर सोडा. पुढे जाईन मी.' पण, ते इमानदार कष्टकरी बांधव होते. आपल्यासाठी एवढ्या रात्री हा माणूस आला आणि एकटा अर्ध्या रस्त्यात सोडायचे म्हणजे काय? हे त्यांचे आपसांतले म्हणणे. एकाने शक्कल लढविली. तो अँब्युलन्सचा ड्रायव्हर होता अन्

सकाळी अँब्युलन्स लवकर न्यायची होती म्हणून घरीच आणली होती. तो म्हणाला, 'मनोहरभाऊ, मी घरी सोडतो तुम्हाला. गाडीतून चला.' मला फार अवघडल्यासारखे झाले. पण, मला विचार करायला वेळ कोण देतो. त्या सात-आठ जणांनीच शक्कल लढविली. मला पुढे ड्रायव्हरशेजारीच बसायला सांगितले. अन् माझी पंक्चर स्कूटर मागे, दोन सीटस्च्या मध्ये उभी करून दोन्ही बाजूंनी तीन-चार जण बसले. काय नशीब माझ्या गाडीचं! रात्री साडेबारा वाजले असतील. अँब्लुलन्स चाळीजवळ येताच जागी असलेली बाया-बापडे गोळा झाली. अनिताही धावतच आली. ती वाटच पाहत असावी. पण हे काय, अँब्युलन्स? काय विचार तिच्या मनात आले असतील तीच जाणो. पण, पुढच्या सीटवरून मी खाली सहीसलामत उतरताच तिचा जीव भांड्यात पडला. मग मागे कोण? दुसरा प्रश्न पडला. तोपर्यंत भले बहाद्दूर भंगारवाले सहकारी खालीही उतरले होते अन् गाडीही उतरविली होती. सारे हसत होते. मग अनिताने आग्रहाने घरात बोलावून चहा पाजला आणि आपली काळजी घेणाऱ्याला काळजीपूर्वक घरी पोहोचवून रात्रीच्या अंधारात अँब्युलन्स परतली!

## टर्निंग पॉईंट...

सार्वजनिक आयुष्य आणि खासगी आयुष्य जगताना कार्यकर्ता या कॅटॅगिरीच्या माणूस नावाच्या प्राण्याला इतर नॉर्मल लाईफ जगणाऱ्यांपेक्षा वेगळ्या अनेक अडचणी किंवा समस्या येतात. अर्थात् त्या वेळी त्या समस्या वाटत नाहीत तर हे आपलं रुटीन आहे, असाच समज असतो. अनिता आणि मी या प्रवाहातून वेगळे कसे राहणार होतो? त्र्यंबकरोडवरील मिस्त्री चाळीचा प्रवास हा सर्वांत रोमँटिक राहिला. सर्वच अर्थाने! मला साडेचारशे रुपये पगाराची नोकरी होती, पार्टटाईम अन् आमचे लग्न झाले. अनिता नर्मदेहून परत आली होती. आता नोकरी शोधायला पाहिजे. मित्रपरिवारांपैकी कुणीतरी अंबड एम.आय.डी.सी.त एका कंपनीत एक पी.आर.ओ.ची जागा आहे, असे सांगितले. ती बहुतेक खासगी क्षेत्रात एच.आर. डिपार्टमेंट लागू करण्याची सुरूवात असावी. ओळख दांडगी होती. अनिता भेटली. नोकरी जवळपास नक्की झाली होती. तेव्हा सुरूवात साडेचार हजार रुपये दरमहा अधिक इतर अलाऊन्सेस असा गडगंज पगार. आम्ही फार सुखावलो होतो. साऱ्या विवंचना मिटणार होत्या. अनिताचे वडीलही

(माझे सासरे) खूश झाले. चला कुणी एक तर ध्यानावर आहे म्हणून! पण, ही खासगी नोकरी होती. आठ तासांचे कॅबिनबंद काम. बाहेरच्या जगाशी काही एक संबंध नाही. म्हणजे आतापर्यंत ज्या ॲक्टिव्हिटी सुरू आहेत, त्यातून सपशेल माघार? ते १९९३ चे वर्ष होते. मनाची सारखी घालमेल सुरू होती. अनिता दाखवित नव्हती; पण तिने बहुतेक आयुष्यातल्या या सर्वांत मोठ्या तडजोडीला स्वीकारण्याचा निर्णय घेतला होता. मुलाखतीच्या दोन-तीन दिवस अगोदर रात्री जेवणानंतर मायको सर्कलपर्यंत चालत जाण्याचा नेहमीचा कार्यक्रम असायचा. तिथं हिरवळीवर बसून एकूणच चर्चा, गप्पा मारल्या. प्रस्ताव ठेवला, की आपलं आताही साडेचारशे रुपयांमध्ये भागतंय, आणखी हजार एक रुपये मिळाले तर काहीच अडचण नाही. जर अनिताने ही नोकरी स्वीकारली तर आर्थिक विवंचना मिटतीलच; पण पोटापेक्षा, गरजेपेक्षा अधिक पैसे मिळतील. एकदा कुसुमताईंना (पटवर्धन) विचारून बघ म्हटलो. कारण, नर्मदेत जाण्याअगोदर अनिता महिला हक्कमध्ये काम करीत होतीच. दुसऱ्या दिवशी अनिता भेटली. सायंकाळी घरी आल्यावर आनंदाची बातमी दिली. कुसुमताई होऽऽ म्हणाल्या होत्या अन् एक हजार रुपयांची आणखी व्यवस्था झाली होती. आता कुटुंबाचे उत्पन्नच साडेचौदाशे रुपये झाले होते. सर्वांत महत्त्वाचे म्हणजे अनिताला सामाजिक क्षेत्र सोडावे लागणार नव्हते. प्रश्न होता दादांचा, माझ्या सासऱ्यांचा, अनिताच्या बापाचा! त्यांना काय सांगणार? एक बाप, पालक म्हणून त्यांची भूमिका रास्तच होती. अनेक आयुष्ये उद्ध्वस्त होताना पाहिली होती त्यांनी सामाजिक कार्यकर्त्यांची. पण, वेळ निभावून नेली. साडेचार हजार रुपयांची नोकरी मिळवून देणाऱ्या जोडप्याला अनिताचा हा निर्णय आणखी आवडला, डिव्होशन म्हणून!

कुसुमताईंना अनिता तशीही फार आवडायची. मेहनती, कष्टाळू म्हणून. यामध्ये नुरी, सुरैय्या, शोभा, रतन जाधव अशी एक फळी महिला हक्कमध्येच होतीच ताईंची हक्काची. काम सुरू झाले. ऑफिसला गेल्यावर समजले अनितासाठी कामच नाही; परंतु केवळ एका कार्यकर्तीला पोसायचे होते आणि इच्छा नसलेल्या ठिकाणी तिने काम करू नये (नाईलाजाने) म्हणून तात्काळ हो म्हटले होते त्यांनी! पण आठवड्यातच मार्ग निघाला. खूप दिवस महिला हक्कच्या अजेंड्यावर असलेला दारूबंदीचा कार्यक्रम राबवायचा. सारे काम फिल्डवरचे होते. मग काय? नोंद झालेल्या केसेसमध्ये सर्वाधिक दारूड्या नवऱ्यांच्याच असायच्या. कृती कार्यक्रमात दोन गावे निवडली. गंगापूर-गोवर्धन आणि पिंपळगाव बहुला. या ठिकाणी दोन स्वतंत्र महिलांचे गट तयार झाले. पिंपळगाव बहुलात संपूर्ण आदिवासी-कोळी; तर गंगापूर-गोवर्धनमध्ये संपूर्ण नवबौद्ध महिला संघटित झाल्या होत्या. कामाला मस्त उभारी येत होती. पोलिस ठाण्यांचा ताण (नको

असलेला) आता वाढला होता; पण संस्थेचे काम दबदबा निर्माण करणारे होते आणि वरिष्ठांची मर्जी संपादित केलेले होते. म्हणून स्थानिक, संबंधित पोलिस ठाण्याला कारवाई करावी लागत होती. समजले, माहिती दिली की रेड करावी लागत होती. अनिता केवळ दारूबंदीचच काम करीत नव्हती, तर दैनंदिन संपर्क राहण्याकरिता बचत गट, खडू, फिनेल, झाडूचे ट्रेनिंग आदी उपक्रम सुरू केले. त्यामुळे कुणाला थांबविताही येत नव्हते. आता कार्यक्रम समितीच्या (महिला हक्क संरक्षण समिती) मुख्य अजेंड्यावर आला होता. इतर मेंबर्सही स्वतःहून सहभागी होऊन सक्रिय झाले होते. तोपर्यंत आम्ही खोली बदलून पेठरोडवरील दल्लूभाई पटेल कॉलनीतील एका दोन रूमच्या खोलीत भाड्याने राहायला शिफ्ट झालो होतो. आईने (माझ्या) आग्रह धरला होता, की दोन रूमची खोली घे, मी येते तुझ्यासोबत राहायला. म्हणून घेतली. नाहीतर मिस्त्री चाळीत काहीच अडचण नव्हती. आईने रिटायर्ड व्हावं अन् मी लगीन करावं, असा करारच झाला होता आणि नागसेननगरची जागाही अपुरी पडत होती. अनेक गोष्टींवरचा हा पर्याय होता. भाडे दुप्पट होते; पण चिंता नव्हती. आता मी अग्रवाल सभेत फुलटाईम काम करीत होतो. नऊशे रुपये महिना. इथे सोमबाबू अग्रवाल, शरद बुरकुले, डॉ. प्रताप वाघ, हरिभाऊ अभंग, विश्वास मदाने आदी ज्येष्ठांचा मोठा सहवास लाभला. इथंही नागरी सेवा समितीची स्थापना करून सामाजिक उपक्रम, बैठका सुरू झाल्या. बाबूजी (सोमबाबू अग्रवाल) पीपल्स बँकेचे संचालकही होते. त्यांच्यासोबत मस्त ट्युनिंग जमले होते. अग्रवाल सभा आणि नागरी सेवा समितीच्या कामाने जोर धरला होता. बुरकुलेसरही रोज वेळ देत होते. त्यांनी समिती धर्मदाय आयुक्तांकडे आग्रहाने नोंदवून घेतली. बुरकुलेसर म्हणजे नाशिकच्या सामाजिक, राजकीय परिस्थितीचे सकारात्मक आणि प्रेरणात्मक वर्णन शब्दबद्ध करणारी डिक्शनरीच! मी अनेकदा अनिताला म्हणायचो, की सरांना एक विषय द्यायचा अन् ते बोलतात ते टेप करून घ्यायचे. अशा एका तासाच्या शंभरेक कॅसेट तयार होतील अन् नाशिकचा इतिहास हा कायमस्वरूपी दस्ताऐवज म्हणून अबाधित राहील. नेमकेपणाने लिहिण्याचा पाठ बुरकुले नावाच्या शिक्षकांकडून (ते पेठे विद्यालयाचे रिटायर्ड शिक्षक होते अन् म.टा.चे जवळपास २० वर्षे जिल्हा प्रतिनिधी होते, हे नंतर कळाले.) मला नकळत मिळाला.

सोमबाबू अग्रवाल! काय नातं सांगावं या माणसाशी? मी नोकरीला होतो त्यांच्या संस्थेत. ते अध्यक्ष होते म्हणून त्यांच्या संस्थेत. अग्रवाल सभेत रोज कमीत कमी चार ते पाच तास वेळ द्यायचे. थोडा अधिकच पण कमी नाही. पीपल्स बँकेवर सातत्याने तीन वेळा निवडून गेले. अखेरच्या निवडणुकीत आम्ही कार्यकर्त्यांनी म्हणजे मी, बाळासाहेब सानप (माजी महापौर), विजय राऊत, शंकर अभंग, अशोक अग्रवाल (त्यांचा

पुतण्या), अनंत मगर, अगदी बुरकुलेसर, विश्वास मदानेंसह साऱ्यांनी सांगितले, या टर्ममध्ये चेअरमन होणार असाल तरच निवडणूक लढा, नाहीतर द्या सोडून. मला अगोदर कळाले नाही. साऱ्यांचा का आग्रह आहे; पण संघटनेत काम करताना जातीय उतरंडीचा राजकारणात-समाजकारणात काय परिणाम होतो, ते अभ्यासले, पाहिले होते. अग्रवाल समाज त्या वेळी किती? साडेतीनशे ते चारशे घरं अन् मतदार (बँकेचे) किती? जवळपास चाळीस हजार. कसं शक्य आहे? संचालक होतात तेच फार झाले. निवडणूक झाली. पॅनलचे कार्यालय (पंचवटीतले, सोमबाबूंचे) मी व्यवस्थापक म्हणून सांभाळत होतो. पुढं तेच मुख्य कार्यालय झालं तो भाग वेगळा. पण, समाजबांधवांना (अग्रवाल) भेटलो नाही, असं व्हायला नको म्हणून सभासद समाजबांधवांची यादी, चिठ्ठ्या मतदानासाठी केल्या. मी आणि दीपक (बाबूजींचा शेवटचा मुलगा) समक्ष जाऊन भेटलो. किती सभासद होते? १४५. मतदान झाले. बाबूजींना, सोमबाबू अग्रवाल यांना या निवडणुकीत तिसऱ्या क्रमांकाची मते मिळाली होती. काय झालं जातीय उतरंडीचं? एका मारवाडी माणसाला मराठी समाजाने एवढे भरघोस मतदान का करावं? ते सोमबाबू होते, हाडाचे कार्यकर्ते, एक सहृदयी माणूस अन् कोणत्याही क्षणाला फिकीर न करता मदतीसाठी स्वतः धावणारी एक व्यक्ती होती. अगदी आजही, हृदयाची बायपास झाल्यावरही! अशा माणसाला मिळालेली ती मतं होती. हेच बाबूजी दिवंगत शांतारामबापू वावरे यांचे निकटचे सहकारी होते. बापू त्यांना सोमशेठ म्हणत.

महापालिकेच्या एका निवडणुकीत काँग्रेस पक्षाने बाबूजींचे तिकीट कापले. बापूंनी आग्रह धरला. बंडखोरी करा, अपक्ष उभे राहा. पक्षाची गरज आहे; परंतु बाबूजींनी स्पष्ट नकार दिला अन् पक्षनिष्ठा कायम ठेवली. बापूंनाही हे आवडले होते. त्यांची मैत्री शेवटपर्यंत कायम राहिली. पुढे पक्षाची वाताहत पाहून बाळासाहेब सानप काँग्रेस सोडून भाजपत गेले, ते बाबूजींच्या पाया पडूनच! बाबूजींनी नाही अडविले. पुढे बाळासाहेब सानप नगरसेवक, उपमहापौर, महापौर झाले. भलं झालं त्यांचंही. आजही महत्त्वाचा सल्ला घेताना त्यांना बाबूजी लागतातच मार्गदर्शनासाठी!

याच काळात नागरी सेवा समितीने पंचवटीतील कचरा डेपो हटाव आंदोलन यशस्वी केले अन् कित्येक वर्षांचा भिजत राहिलेला प्रश्न एक मोठे रास्ता रोको आंदोलन करून सोडविला गेला. अर्थात, यामध्ये बॅनर नागरी सेवा समितीचं होतं, तरी सर्वपक्षीय पदाधिकारी सामील झाले होते. जनतेच्या हितासाठी सामूहिक नेतृत्वाचा तो यशस्वी आग्रह मी सक्रिय राहून पाहिला. या संस्कारांनी मला शहाणपण शिकविले. अर्थात, शरद बुरकुले, सोमबाबू अग्रवाल ही माणसे म्हणजे स्वतंत्रपणे अखंड लिहावेत, असे विषय आहेत. मी इथं केवळ संदर्भासाठी, मला त्यांचा स्पर्श झाल्याची नोंद म्हणून उल्लेख केला

आहे. फार मोठी माणसं आहेत ही, त्यांच्या नावांपेक्षा!

पेठरोडला दिल्लीवाला गोठा चाळीत राहायला आलो. आता गुड्डू (कीर्ती) आमची मुलगीही मोठी होऊ लागली होती. बालवाडीत जात होती, नजीकच्याच! अनिताचं दारूबंदी वेगात, जोशात आलं होतं. पिंपळगाव बहुलातील कोळीवाडा तर चांगलाच तापला होता. महिला तर रणरागिणीच झाल्या होत्या. जानकाबाई त्यात पुढाकाराने काम करीत होती. घडाघडा स्थानिक राजकारण सांगायची; पण दारूबंदीच्या मुद्यावरून मात्र हलायची नाही. १५-२० महिलांनी आता स्वतःच गुत्ते फोडायला सुरवात केली. कारण, पोलिस यायच्या आतच गुत्तेवाला दारू गायब करायचा. महिलाही तोंडावर पडू लागल्या होत्या. एकदा नेटाने माहिती न देताच घुसल्या अन् ठोकला धरून गुत्तेवाल्याला. एवढा पुरावा कमी की काय म्हणून बाहेरच्या झाडाला बांधला. मग अनिता अन् पोलिसांना बोलाविले. आता काय करणार? टाकला मध्ये. महिला हुशार होत्या. दारू पोलिसांच्याही हाती लागू दिली नाही. बादल्या (दारूच्या) अगोदरच पालथ्या केल्या होत्या. पोलिस अन् गुत्तेवालाचा तू चोर मी शिपाईचा खेळ आता थांबला नाही, तर थांबविला होता या महिलांनी! पत्रकं काढा, आवाहन करा, दुष्परिणाम सांगा, भोंग्याची रिक्षा फिरवा, काहीतरी आमिषं दाखवा, दारूबंदीसाठी राबविल्या जाणाऱ्या फुटकळ यंत्रणेपेक्षा आमच्या पिंपळगाव बहुलाच्या महिलांचा हा प्रयोग मला तर आजही मनापासून भावतो. दिसला दारूवाला, धरला, फोडला, बांधला, दिला पोलिसांच्या ताब्यात! जोपर्यंत अनिता होती तोपर्यंत या महिलांचे चेहरे आठवतात. आता कधी त्या रस्त्यानेही गेलो तर परमिट रूमच दिसतात!

गंगापुरात तर महार महिला अन् एवढी शिरजोरी, असा थोडा वास येत होता. येथील वतनदारांना काही संबंध नसतानाही ईगो हर्ट झाल्याची भावना कानावर येत होती. आम्ही स्पष्ट होतो. घाबरायचं काहीच कारण नव्हतं. इथंही गंगूबाई कटारे पुढाकाराने काम करीत होती. तिनेही वीस-पंचवीस महिला तयार केल्या होत्या, नव्हे झाल्या होत्या. दुखणं एकसारखं असल्याने फार वेळ लागला नाही. इथे नवऱ्यांपेक्षा मुलांची दारू अन् त्यांच्या संसाराची परवड असा विषय होता. या म्हाताऱ्या, लढवय्या महिला इकडे बैठकीला यायच्या अन् घरी त्याच पोरांच्या शिव्या खायच्या.

तेव्हा एम-८० गाडीवर मी अन् अनिता जात होतो गंगापूर-गोवर्धनला. इथेही पोलिसांचा रोल सेम. हा तर शहरी हद्दीत येणारा भाग होता. इथं आम्हाला विश्वासार्हता पटकन मिळाली. अपेक्षेपेक्षा लवकर. आम्ही दोघंही जयभीम असल्याने!

एका आंबेडकर जयंतीला महिलांनी अनिताला प्रमुख पाहुणी म्हणून बोलाविले. सभा १४ एप्रिलला रात्री आठला गंगापुरात होती. मला स्वतंत्र निमंत्रणाची गरज नव्हती. मी

कार्यकर्ताच होतो. ठरले जायचे. कार्यक्रमाच्या दोन दिवस अगोदर गंगूबाई आणि आणखी एक म्हातारी अनिताच्या ऑफिसमध्ये, गोळे कॉलनीत आल्या. आज काहीच काम नाही सांगितलं. अनिताला आश्चर्य वाटलं; पण कुठंतरी पाणी मुरतंय असंही पाहत होती. ऑफिसच्या मागे मोकळ्या जागेवर गेलो चौघंही. अनिताने थेट विचारलं, 'कार्यक्रम रद्द नाही झाला ना! काही अडचण असेल तर नंतर घेऊ.' म्हणाल्या, 'नाही ताई, जयंती होणारच आहे. भाषणही व्हईल तुमचं; पण एक सांगायला आलो होतो. तुम्ही दोघंच नका येऊ. आणखी दोन-चार लोक या.' अनिता समजली काय ते. धमक्या मिळाल्या असतील. त्यांनीही कबूल केलं. कुणीतरी एक जण (टपोरी) दारू पिऊन म्हणाला होता, की ते दोघं (म्हणजे अनिता आणि मी) कसे येतात पाहू. तंगड्याच तोडतो त्यांच्या. अनिता फक्त हसली. म्हणाली, ठिकाय. येतो. चहा पाजला अन् दोघी म्हाताऱ्या आता निवांत चेहऱ्यानं परतल्या होत्या. आम्ही अगोदर ठरविले होते. अशोक स्तंभापासून रिक्षाने जायचे-यायचे. ऑफिसमधून गाडी घ्यायची अन् घरी परतायचे. कार्यक्रमाच्या रात्री.

आठपर्यंत आम्ही शहरातल्या मिरवणुकीत संत गाडगे महाराज पुतळ्याजवळच होतो. अनिताने गाडी (स्कूटर) थेट गंगापूरला घ्यायला सांगितली. कार्यक्रमाच्या ठिकाणी गेलो. नऊ वाजले होते. जय्यत तयारी केली होती महिलांनी. अगदी स्टेज लावून. अर्थात ती डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची जयंती होती. त्यामुळे उत्साह स्वाभाविक होता. सभा सुरू झाली. अनिताने जमावाकडे (श्रोते) पाहिले. भाषण सुरू केले. दारूबंदी आंदोलन, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांविषयी माहिती सांगत अखेर थेट आव्हानच दिले, धमकी देणाऱ्याला, 'आता आम्ही दोघंही रात्री अकराला आमच्या स्कूटरवरून फुलेनगरला (पंचवटी) जाणार आहोत. हिंमत असेल तर तंगड्या सोडाच पायाच्या नखालाही हात लावून दाखवा!' अतिशय करारा जवाब होता हा. अर्थात, मी जरा घाबरलोच होतो. कारण, व्यसनाधीन माणसाला मेंदू असतो का? असो. महिलांनी चहा-बिस्किटे आटोपून काळजी करीत रवाना केले. म्हणाल्या, 'मागे एखादी रिक्षा घेऊन येतो आम्ही पाच-सहा जणी.' पण, अनिताने समजावले. विनादिक्कत घरी आलो. दुसऱ्या दिवशी सकाळीच गंगाबाई अन् दुसरी म्हातारी हसत येऊन, नंतरच्या गमती सांगून गेल्या. जिंकल्या होत्या त्या. चार-पाच दिवसांनी धमकी देणारा स्वतःच येऊन अनिताला भेटून सॉरी म्हणून गेला. आता काही तरुण मंडळीही हाती लागली होती. येथील वतनदारांना हा घाव वर्मी लागला असावा. त्यांनी वेगळ्या कुरापती काढायला सुरूवात केली. एकदा रात्री साडेदहा-अकराला गंगूबाई अन् सहा-सात महिला घाबरत घरीच आल्या, पेठरोडला. आम्हीही दचकलो. घामाघूम महिलांना पाणी पाजून शांत केले. महिलांनी सांगितले

त्याप्रमाणे त्या दिवशी सायंकाळी गावात हाणामारी झाली होती. एकाच्या दंडावर चाकूचा वार झाला होता. आणखी एका-दोघांची डोकी फुटली होती. दोन्ही गटांचे दहा ते बारा युवक सरकारवाडा पोलिस ठाण्यात (जुन्या सराफ बाजारातील) जमा केले होते. गावात वातावरण थोडे तंग होते. अनिताने तयारी केली. अर्धवट झोपलेल्या गुड्डूला (मुलीला) शेजारी औटेबाईंच्या मुलीकडे (तिचं नाव अनिताच होते) दिले. महिलांसोबत रिक्षात बसली अन् मी एम-८० गाडी घेऊन निघालो. तोपर्यंत रात्रीचे बारा वाजले असतील. पोरांना लॉक-अपमध्ये पाहिले. इन्स्पेक्टरला भेटलो. अनिताच सारे करीत होती. तेव्हा बारावी बोर्डाचे पेपर सुरू होते आणि दोन्ही गटांत विद्यार्थी होते. इन्स्पेक्टरला विनंती केली. कायदेशीर कारवाई करा; पण जे विद्यार्थी आहेत त्यांना आता सोडा. पण, साहेब ऐकेना. कदाचित ते त्यांच्या हातात नसावेही. तेव्हा एसीपी (सहा. पोलिस आयुक्त) मकरंद रानडेसाहेब होते. तेच दंडाधिकारीही होते. त्यांच्यासमोरच सकाळी हजर करायचे होते. इन्स्पेक्टरला विनंती करून, रानडेसाहेबांना ठाण्यातूनच फोन लावला. तेव्हा मोबाईल, एस.टी.डी. बूथ काही नव्हते. साहेब समितीच्या कामाबद्दल माहिती ठेवून होते अन् अनिताला चांगले ओळखत होते. इन्स्पेक्टरकडून माहिती घेत पुन्हा अनिताला सांगितले, 'सकाळी सोडायला सांगितले आहे. चिंता करू नका. पोरं परीक्षांना जातील. आता सोडलं तर रात्रभर टेन्शन राहील. आम्हालाही अन् महिलांनाही.' सरकारवाड्याचं लॉक-अप पोरांच्या सुरक्षेसाठी अधिक सुरक्षित वाटलं, स्वतःच्या घरांपेक्षा! एव्हाना, समोरच्या गटातील एक बाप त्याच्या पोरासाठी स्थानिक वतनदाराला घेऊन आला होता. तो बापही जयभीमवालाच होता; पण त्याचा पुढारी? वतनदार. म्हणून आमचा, महिलांचा (आंदोलन करणाऱ्या) आणि आंदोलकांचा विरोधक होता. तोच काड्या करीत होता. त्याचीच झळ आता त्याच्या पोराला बसली होती. जो बारावीच्या परीक्षेला होता. आमची मागणी आणि विनंती एका गटासाठी नव्हतीच. ती शिकणाऱ्या विद्यार्थ्यांचे आयुष्य वाचविण्यासाठी होती.

रात्री पाऊण-एकच्या सुमारास पोलिस ठाणे सोडले. दहा-बारा महिला आता जाणार कशा गंगापुरात? असा प्रश्न पडला. एवढ्यात म्होरक्या त्याच्या झिलकरी कार्यकर्त्यांसह आला. पोलिस ठाण्यात रूबाबात शिरला. पाच-दहा मिनिटांत रिकाम्या हातानेच बाहेर पडला. गेटजवळ उभ्या असलेल्या महिलांना म्हणाला, साहेबांशी बोललोय. सकाळी सोडतो म्हणाला पोरांना. बायकांना यात नावीन्य ते काय? महिलांचा विश्वास संपादन करण्यासाठी ही खेळी फार महत्त्वाची होती. परीक्षा होती आमची दोघांची असेच म्हणावे लागेल. सारा प्रकार महिलांनी पाहिला होता. नंतर लापट म्होरक्या म्हणाला, 'चला आपली गाडी आहे, सोडतो गावात.' महिला एका सुरात म्हणाल्या, 'अगोदर आगी

लाव, मग ये पोरांना सोडवायला. जाय तुझी गाडी घेऊन. आमच्या ताई अन् भाऊ काय व्यवस्था करायची ती करतील.' शाब्बास! मोठा टप्पा सर झाला होता. यापुढं म्होरक्या क्षणभरही थांबला नाही. तरातरा फियाट गाडीकडे गेला. झिलकरी कार्यकर्त्याला ये म्हणायची गरज नव्हती. न सांगताच गाडीत जाऊन बसला; पण आता महिलांचा काय बंदोबस्त करायचा? थंडीचे दिवस होते ते. अनिताने सांगितले, की पायीच आपल्या घरी जाऊ. दहा-पंधरा मिनिटं लागतील. सकाळी चहापाणी करून पुन्हा ठाण्यात येऊ. काही महिलांना बरे वाटले. सोय आणि सुरक्षा म्हणूनही. पण, गंगूबाई अन् तिची जोडीदारीण म्हातारी कसलेल्या होत्या. हा त्यांच्यावरचा पहिला वार नव्हता. अनेक वार असे त्यांनी परताविले होते. म्हणाल्या, 'नाही ताईला तरास द्यायचा नाही. दोन तास लागतील; पण गावातच जाऊ. नाही तर हे गावात सांगतील, महिलाही जमा केल्या. नको ताई, तुम्ही जा घरी. पोरगी एकटी टाकून आल्या. आम्ही पाहतो काय करायचे ते!' फार छाती मोठी झाली आमची. रात्री दीडला या महिला एवढी ऊर्जा दाखवितात, ती आली कुठून? मी दबक्या आवाजात म्हणालो, तुम्ही साऱ्या जणी अशोकस्तंभापर्यंत या अनितासोबत, आम्ही जाऊ घरी. प्रस्ताव मान्य झाला. ही टोळी निघाली अशोकस्तंभाकडे. मी स्कूटरला किक मारली अन् स्तंभावर आलो. लांबूनच एक टॅक्सी (काळी-पिवळी) दिसली होती. जोरात गाडी आणली. तो गोवर्धनचाच होता बहुतेक, थांबविले. महिला येईपर्यंत किस्सा सांगितला. त्यालाही माहिती झाले होते. आवर्जून थांबला. महिलांनीही ओळखले. भराभरा त्यांनी स्वतःला टॅक्सीत कोंबले. टॅक्सीवाल्यानेही इतरवेळी लावतात तसे मीटर लावले नाही. जे देईल तेवढ्या पैशांत सोडतो म्हणाला. त्याचा ऐन धंद्याच्या, पैसे कमविण्याच्यावेळी भाव न ठरविणे हा गावातील महिलांच्या आंदोलनाला एक प्रकारचा पाठिंबा का म्हणू नये?

खरं तर दरवर्षी १४ एप्रिलचा कार्यक्रम व्हायचा इथे. पण, या वेळी आग्रहाने महिलांनी घेतलेला पुढाकार हा अधिक महत्त्वाचा होता. डॉ. बाबासाहेबांच्या नावाने, निमित्ताने गावाचे गावपण बरबाद करू पाहणाऱ्यांना चावडीवर आणून त्यांनी एक प्रकारची मुस्कटात लगावली होती. आजची हाणामारी त्याची एक प्रतिक्रिया होती, म्होरक्या अन् त्याचे समर्थन करणाऱ्या मानसिकतेची! दारूबंदी हा काही फार मोठा विषय नव्हता; पण गंगापूर-गोवर्धनच्या महिलांनी यानिमित्त राबत असलेल्या सरंजामी यंत्रणेला एक मोठा हादरा मात्र नक्की दिला होता.

# मारुतीचं शेपूट...

आम्ही पुढे राहुलवाडीत, पेठरोडला राहायला आलो. अनिताच्या वडिलांचेच घर (दोनमजली) आम्ही विकत घेतले होते. राहुलवाडीतही अनिताचे काम सुरू होतेच. इथेही महिलांच्या बैठका, बचतगट, महिला मंडळ, वाचनालय सुरू केले. एक महिला सहकारी संस्थाही वाचनालयासोबत नोंदणीकृत केली. मातोश्री सावित्रीबाई फुले सार्वजनिक वाचनालयाचा फार मोठा फायदा त्या वेळी झाला. पोरांचा अभ्यास, वाचन आदींमार्फत त्यांच्या आयांची बैठक, प्रश्न मांडणी आदी कामे एका साखळीत होऊ लागली. राहुलवाडीत आणखी काही प्रश्न सोडविण्यात वेगळे अनुभव आले. इथं असलेले सार्वजनिक संडास तोडण्यात आले अन् सुलभ शौचालये बांधून देण्यात आली. संडास कंत्राटदाराने वेळेत बांधून दिले होते. पण, सुरू करण्यात आले नव्हते. मोठी अडचण निर्माण झाली होती. एका बाजूला दोन-तीन संडास तोडलेले. दहा-बारा भांड्यांचे एकमेव संडास तुडुंब भरलेले कसे वापरणार? सुलभ बांधेपर्यंत बायाबापड्यांनी बऱ्यापैकी धीर धरला होता. आता मात्र सुसज्ज व्यवस्था असूनही प्रॉब्लेम झाला होता.

व्यवस्थापक म्हणून काम करणाऱ्या स्थानिक माणसालाच विचारले. मजेशीर कारण सांगितले त्याने, 'ते काय आहे, आचारसंहिता आहे ना सुरू विलेक्शनची. नगरसेवकानं सांगितलं आहिरेसर, उद्घाटन झाल्याशिवाय सुरू करता येणार नाही म्हणून.' काँग्रेस पक्षाच्या असलेल्या नगरसेवकावर तसाही माझा राग होताच. जुनी संडासं ओव्हर फ्लो झाल्याने मैला रस्त्यावरून वाहत होता. तेव्हा वस्तीतल्या महिला सांगायला गेल्या तर या नगरसेवकबहाद्दराने उत्तर दिले होते, की तुम्ही कुठं मला मतदान केलंय! तेव्हाच खटकी पडली होती; पण प्रसंग नव्हता आला अन् आहिरेसर काही ढगातून पडला नव्हता. येत होत्या तेवढ्या शिव्या घालत व्यवस्थापकाला सुनावले, उद्या सकाळी मी पहिल्यांदा संडासला येईन. जर कुलूप, शटर उघडं दिसलं नाही तर तोडून मीच उद्घाटन करीन. अर्थात ही धमकी देताना वीस-पंचवीस महिला अन् वस्तीतले ज्येष्ठ कार्यकर्ते साथीला होतेच. त्यांचा भक्कम पाठिंबा होता. अनेक झोपडपट्ट्या मी संघटनेच्या कामानिमित्त पाहिल्या होत्या. पण, राहुलवाडी एकमेव नोंदणीकृत झोपडपट्टी होती. १९६६ मध्ये एकनाथ शिंदे (अनिताचे मामा) यांनी ही वस्ती रजिस्टर्ड केली होती. एकमेव झोपडपट्टी होती, की येथील भव्य समाजमंदिर येथील नागरिकांनी श्रमदान आणि स्वतःच्या पैशाने उभे केले होते. नावही छान होते नवसमाज भवन! अनेक गोरगरीब परिवारांच्या मुला-मुलींची लग्ने या हॉलमध्ये दिमाखात पार पडली होती. स्वयंपाकाची लहान-मोठी सगळी भांडी येथे उपलब्ध होती. त्याच मंडळींनी पुढाकार घेऊन मलाही त्यांच्यात सामील करून घेतले होते.

सारी ज्येष्ठ आणि अनुभवी मंडळी होती. बरीचशी शासकीय सेवेत होती; पण मला खूप मान-सन्मान देत होती. माझा शब्द परवलीचा, अखेरचा मानला जायचा. आपसूकच सारा हिशेब, पावतीपुस्तकं बाकी कामं सोपविली गेली. एक प्रकारचे पुढारपण दिले असेच म्हणा हवे तर! त्यामुळे आपण घेतलेली भूमिका ही समूहाची असेल याचे भान पावलोपावली असायचे. ज्येष्ठांनी कधीही कानामागून आला, अन् तिखट झाला या उक्तीला वाव दिला नाही. खूप कार्यक्रम राबविले गेले. नगरसेवकाविनाही वस्तीत कामे केली. यापैकीच सुलभ शौचालय सुरू करणे हे एक म्हणावे लागेल. सकाळी पाहतो तर काय, मलाच दहा मिनिटे वेटिंग करावे लागले. संडासचा डबा घेऊन गेलो तर व्यवस्थापक (जो माझा दुरून जावई लागत होता.) हसत म्हणाला, 'नगरसेवक गेला... इथं गल्लीत राहायचंय. उघडलं कुलूप सकाळी-सकाळी!' मी गेल्यावर एक-दोघांनी माघारी घेत मला संडासला जायची ऑफर दिली. लग्नात पंगतीत जेवतानाचा आग्रह अनेकदा पाहिला होता; पण संडासला जाण्याचा

आग्रह पहिल्यांदाच अनुभवत होतो. वेटिंगमध्ये असलेल्या दहा-बारा जणांशी बोलतच व्यवस्थापकाला गंमत करायची म्हणून विचारले, 'का हो! क्रिकेटच्या स्पर्धेचं उद्‌घाटन कसं करतात?' तो पटकन् उत्तरला, 'एक-दोन बॉल बॅटिंग करून!' मी पुन्हा विचारले, 'मग संडासाचे उद्‌घाटन कसे करायचे? नगरसेवकाला विचाराल का?' सारे खळाखळा हसले, व्यवस्थापकही सामील होता. परतत म्हणाला, 'काय आहिरेसर तुम्हीपण!'

या शौचालयाची आणखी एक अडचण होती. हे रात्री दहाला बंद व्हायचे. शटर-कुलूप लावून. व्यवस्थापक त्याच्या एका तर्राट, बेसहारा जोडीदाराला आतमध्ये काऊंटरवर झोपायला सांगायचा. तो आतून कुलूप लावून झोपायचा. एकदा-दोनदा मी बाहेरगावाहून रात्री उशिरा परतलो. पोट रिकामं होणं गरजेचं होतं. डबडं घेऊन सुलभच्या दाराजवळ आलो. हाक मारली. अगोदर ऐकलं नाही; पण आहिरे आहे म्हटल्यावर पटकन् आतून आवाज आला, 'थांबा, साहेब आलोच.' दोन मिनिटांच्या अंतराने शटर वर... मी आत... तोपर्यंत माझ्या ध्यानात एक गोष्ट आली नव्हती, की बऱ्याचदा रात्री अकरा-साडेअकराला महिलांची मचमच ऐकू यायची अन् दुसरी बाब म्हणजे अजूनही काही अंशी शाळेच्या भिंतीला लागून घाण दिसायची. अगोदर मला वाटले, की लोकांना सवय झाली नसावी एवढ्या स्वच्छ संडासात जायची. पण, आज त्याचे उत्तर सापडले होते. समस्या गंभीर होती. अनिताशी बोललो. तिनेही होकार भरला. बैठकीत विषय घ्यायचा ठरले. अनिताने दुसऱ्या दिवशीच दुसऱ्या एका कामासाठी महिलांची बैठक घेतली होती. त्यात सगळे विषय झाल्यावर संडासचा विषय छेडला. मग काय? महिलाच अधिक बोलू लागल्या.

बऱ्याचशा महिला या नजीकच्या मार्केट यार्डमध्ये कामाला जात होत्या. रात्री नऊ-साडेनऊ व्हायचे परतायला. त्यानंतर स्वयंपाक आणि इतर गोष्टी. अकरा-साडेअकरा व्हायचे, तोपर्यंत संडास बंद झालेले असायचे. मग तसाच वेळ मारीत रात्री उशिरा कधीतरी या महिला आपला नैसर्गिक विधीचा कार्यभाग उरकायच्या. तोही रस्त्यावर कडेला. सांगा बरं किती स्वच्छता राखली जात असेल? आरोग्याच्या दृष्टीनेही घातकच होते की सारे. निर्णय केला बैठकीत. उद्या मुद्दामहून दहा-बारा जणींनी उशिरा जायचे अन् दार उघडायला सांगायचे. आंदोलनाची रणनीती म्हणा हवेतर! ठरल्याप्रमाणे रात्री अकराला दहा-बारापैकी सात-आठ आल्या. अनिताही सामील त्यांच्यात. गेल्या. आत झोपलेल्याने शटर उघडायला नकार दिला. महिलांनी पत्र्याचे शटर जोरजोरात वाजवायला सुरवात केली. राहुलवाडी जागी झाली. आरडाओरडा सुरू झाला. महिलांच्या

पोटातला मैल शब्दांनी बाहेर पडू लागला होता. कार्यकर्तेही बाहेर आले होते. मला आता पुढारपण करायचे होते. गेलो. आवाज दिला. आलो साहेब म्हणत शटर उघडले गेले. महिला अंगावर धावून गेल्या; पण तो बिचारा हुकमाचा ताबेदार! एका बाईला पाठवून व्यवस्थापकाला बोलाविले. त्याने ठेकेदाराने दहाची वेळ सांगितली आहे बंद करायची म्हणून सांगितले. मग नरम गरम भाषेत त्याला हकिकत सांगितली; पण तोही नियम पाळणारा होता. जमावासमोर सांगितले, 'अहो सर... एक दोनदा हीपण (त्याची बायको) अशीच बाहेर बसली व्हती!' आता बोला. कारण तीपण मार्केट यार्डात जात होती. मग शांतपणे सांगितले की, 'रात्री अकरा-साडेअकराला मी संडासला येईन. त्यानंतर बंद करायचे. मग कुणी ओरडले तर मला सांगायचे.' नवीन काम लागले होते. न चुकता संडासला लागो न लागो घड्याळाकडे पाहायचे. साडेअकराच्या काट्याला प्लास्टिकची बादली उचलायची अन् पळायचे सुलभकडे. पाच-सात मिनिटे एका संडासात कोंबून घ्यायचे. आवाज होईल एवढ्या उंचीवरून पाणी भांड्यात ओतायचे अन् मग बाहेर यायचे. आता व्यवस्थापकही थांबू लागला होता सुलभमध्ये. नंतर नंतर तो कार्यक्रमच झाला. गुड्डू माझी पोरगी कधी विनोदाने, तर कधी वैतागून साडेअकराला बादली आदळीत म्हणायची, 'ये बाबा, ये रे पटकन् जाऊन. झोप येऊन राहिली!' नकळतपणे माझं कुटुंब या आंदोलनात ओढलं गेलं होतं.

पुढं-पुढं तर लोकंही नियम पाळू लागले होते अन् व्यवस्थापकालाही उमजले होते, की मी स्वतःवरच अत्याचार करवून घेत होतो. आता तोही बारापर्यंत संडास उघडे ठेवत होता. साऱ्यांची सोय झाली होती. आता रात्री अकरा-साडेअकराला व्यवस्थापक हाकारा द्यायचा, 'ओ आहिरेसर... येता, की करू शटर बंद!' मग मी दारातूनच डोकावून सांगायचो, 'चालंल, चालंल!' एकदा रात्री उशिरा म्हणजे दीड-दोनला मी गेलो. मला फार अडचण नव्हती. मी सकाळी व्यवस्थापकालाच विचारले, रात्रभर उघडं ठेवायला काय हरकत आहे? त्याने मी निवांत आहे पाहून म्हणाला, 'बरं झालं तुम्हीच इचारलं.' अगोदर मुतारीची मोडलेली भांडी, संडासच्या चांगल्या दारांवर थुंकल्याची घाण अन् भिंतीवरचे शब्द अन् रेखाचित्रांचे संडास साहित्य बारकाईने दाखविले. नंतर सांगितले, 'साहेब, तुम्ही सांगितले म्हणून उघडे ठेवतो उशिरापर्यंत. आपल्याच आया-बहिणींची सोय व्हती. चांगलंय. पण, दोन-तीन वेळेला मागच्या गल्लीतल्या रंडीने गिऱ्हाईक आणले होते. आता सांगा. एखाद्या टायमाला आपली आई-बहीण असेल तर!' त्याने खूप कमी शब्दांत वस्तीचा सारीपाट समोर ठेवला होता. मी एक सामान्य कार्यकर्ता होतो.

काय उत्तर शोधणार त्याच्या प्रश्नाचे? शांतपणे सांगितले, 'बघा, जेवढं जमेल तेवढं!' वस्तीचं असंच असतं. एक समस्या संपली, की दुसरीची सुरवात. मारुतीच्या जळणाऱ्या शेपटासारखी. मारुतीची शेपूट कधी पाहिली नाही. पण, वस्तीच्या समस्यांची दाहकता त्या जळणाऱ्या शेपटापेक्षा दहा पटीने नक्कीच अधिक होती.

अनिता अन् तिची तरुण पोरींची टीम संगिनी महिला जागृती मंडळ महिलांचे, विद्यार्थ्यांचे कार्यक्रम नित्यनेमाने राबवत होते. वाचनालयाची ओढ पोरांमध्ये रुजत होती. एका सुटीच्या काळात एक स्पर्धा घेतली. रोज सायंकाळी वाचनालयात येऊन पुस्तकं वाचायची. जो सर्वांत अधिक पुस्तकं वाचेल त्यांना बक्षिसं देण्यात येतील. त्याचे रेकॉर्ड किपिंग ठरवून दिलेली कार्यकर्ती करायची. मला आठवते त्याप्रमाणे पहिल्या आलेल्या पोराने ३४ पुस्तकं वाचली होती. अनिताने म्हटले, की नुसती नावं जरी वाचली असेल तरी खूप झाले. या कार्यक्रमाचा पारितोषिक वितरण समारंभ मा. उत्तम कांबळेसाहेबांच्या हस्ते नवसमाज भवनात दिमाखात पार पडला. याच पोरांनी एका होळीला एक गोणी भरून गुटख्याच्या रिकाम्या पुड्या अनितासमोर आणल्या. मलाही वाटले, की बहुतेक एकमेकांच्या पुड्यांची रिकामी वेस्टणं असावीत. पण, पोरांनीच ठरविलेला कार्यक्रम होता तो. त्यांनी तीन-चार दिवसांत वस्तीतल्या पुड्या गोळ्या करून आणल्या होत्या अन् त्याची होळी करणार होते. ती होळी पेटविण्यासाठी अनिताला निमंत्रण द्यायला पोरं आली होती. ही सारी पोरं वाचनालयात येणारी होती. पुढं थोडे अधिक पैसे आल्यावर दत्तनगरमध्ये कर्ज घेऊन फ्लॅट घेतला. समोरच वस्ती आहे. सारं काही जमेल असं वाटलं; पण वस्ती अन् फ्लॅटमध्ये फार अंतर असते, हे नंतर कळाले. समोरच राहूनही लोक बोलवायला, सांगायला संकोचू लागले. आता केवळ जयभीम घालणारे नाते शिल्लक राहिले होते. एकदा मी अनिताला म्हटले, 'माझे राहू दे; पण वाचनालय, बचतगट तर सुरू आहे. महिलांना एकदा चहाला तरी बोलाव.' आल्या. बहुतेक वाटच पाहत असाव्यात. छान मीटिंग झाली त्यांची. चहा-पाणी झाले. विनोद, थट्टा, मस्करी झाली. निरोपाच्या वेळी एका ज्येष्ठ बाईने आजही मनाला हेलावणारे उच्चारलेले वाक्य आठवते, 'आहिरेभाऊ, तुम्ही वस्तीत आमच्या मागून आले, मोठे झाले. हा बंगला घेतला. फार आनंद झाला. पण, आमचं एक नुकसान झालं मोठं.' मी आश्चर्याने म्हणालो, 'नुकसान अन् ते कसं?' ती बाई अनिताकडे पाहत म्हणाली, 'आमच्या पोरांवर वराडणारा आता कोणी नाही राहिला.' तिच्या या वाक्याचा अर्थ अन् उत्तर अलीकडे चार-पाच वर्षांपूर्वी सापडलं. ज्या पोराने कांबळेसाहेबांकडून सर्वांत जास्त पुस्तकं वाचण्याचं बक्षीस घेतलं होतं, त्याच्या हातून एकाचा मर्डर झाला होता. मारुतीचं लांबत जाणारं शेपूट...

# घंटागाडी...

खरं तर हे प्रकरण लिहावं की नाही? अशा केवळ द्विधा नव्हे तर अनेक कंगोरे असलेल्या मानसिकतेमध्ये तीन महिने अडखळत राहिलो. पुन्हा एकदा घरगुती गप्पा मारताना अनिता ठामपणे म्हणाली, 'तू लिख रे...' तिच्या या वाक्याने पुन्हा रिचार्ज झालो अन् आज कागद-पेन हाती घेतले.

अनपेक्षितपणे आयुष्याला एका धाडसाला सामोरे जावे लागले. एका साचेबद्ध लाइफस्टाईलमध्ये चांगलाच रमलो होतो. दै. 'पुण्यनगरी'त संपादकीय विभागात काम करीत होतो. कमर्शियल बेस होताच. ॲडव्हर्टायझिंगचं कमिशन आणि पगार असे भरपूर पैसे मिळत होते. अनिताही स्पेशल सेलच्या नोकरीत स्थिरावली होती. ती आपली नोकरी सांभाळून राहुलवाडीत (वस्तीपातळीवर) काम करीत होती. एकदा मुंबईहून दत्ता बाळ सराफचा फोन आला. नाशिकमध्ये कंत्राटी सफाई कामगारांची बैठक आहे. मुंबईचे कार्यकर्ते कदाचित फोन करतील. त्याने म्हटल्याप्रमाणे मिलिंद रानडेचा फोन आला. सायं. पाचला ऑन ड्युटी एका बातमीच्या शोधात बैठकीला गेलो.

(कारण कामगार कंत्राटी जरी होते तरी महापालिकेचे होते आणि महापालिकेचे बीट माझ्याकडेच होते.) औपचारिक ओळख-परिचय झाला. बरेचसे कामगार ओळखीचे होते. कार्यकर्ता असल्याने दैनिकाच्या माध्यमातून योग्य ते सहकार्य करण्याचे आश्वासित केले.

खासगी आयुष्यात अनिता आणि मी गप्पा मारायचो त्याच मुळी केलेल्या कामाच्या. मग चर्चा, वादविवाद, मतभेद, विचारविमर्श आदी. तसेच या बैठकीचेही रिपोर्टिंग केले. फोनवर दत्तालाही सांगितलं. अनिताने गांभीर्याने पाहायला सांगितलं. नंतरच्या बैठकांना नकळतपणे अविरत हजेरी लागत गेली. रमत गेलो. असलेल्या नोकरीपेक्षा कामगारांचे प्रश्न अधिक जिव्हाळ्याचे वाटू लागले. अनिताशी दैनंदिन संवाद सुरूच होता. संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी दत्ताच्या मध्यस्थीने एका फुलटायमरची अपेक्षा व्यक्त केली. समांतरवेळी कार्यालयात खटके उडाले अन् फटकळ स्वभावाने तातडीने नोकरी सोडली. दुसऱ्या बाजूला बैठकांमधील सहभाग वाढतच होता. एक दिवस परिवाराच्या संमतीने फुलटायमरची ऑफर स्वीकारली. अनिताचा नेहमीप्रमाणे पाठिंबा होताच. जोमाने अन् आता जबाबदारीने काम सुरू झाले.

पूर्वी मोटारसायकल होती, आता मारुती कार आहे. बरेचशे ओळखणारे नंतर सांगतात, त्या दिवशी हात केला; पण तुम्ही फार जोरात (स्पीडमध्ये) होता. कदाचित हा माझा मूळ स्वभाव असावा. कामातही तसेच झाले. कामगारांची सकारात्मक, संघर्षात्मक साथ मिळाली. दिवसाचे चोवीस तासही आता कमी पडू लागले. नाशिकच्या घंटागाडी कामगारांचा लढा मी येण्याअगोदरपासूनच सुरू होता. मात्र चित्र स्पष्ट नव्हते. माहीत नाही; पण वेगळ्या पद्धतीने कामकाज घडत असावे. कामगारांच्या प्रतिसादामध्येच पूर्वीच्या नेतृत्वाची कार्यपद्धती समजत होती. मला त्यामध्ये अजिबात इंटरेस्ट नव्हता. कारण, काळानुरूप व्यक्ती बदलत असतात. निर्णय घेत असतात. त्यामुळे स्वर्गीय कॉ. गायकवाड यांच्या कॉंट्रीब्यूशनला सलाम ठोकूनच कामाला सुरवात केली. फुलटायमर झाल्यावर तिसऱ्याच बैठकीत कामगारांना आवाहन केले, की साहेब म्हणायचं नाही. भाऊ म्हटले तर अधिक आवडेल. दुसरी दुरुस्ती केली. काही कामगार जाणीवपूर्वक 'जयभीम' म्हणतात. निर्णय घेतला, मग जय महाराष्ट्र का नको? त्यापेक्षा कामगार चळवळीचा आदर करणारा लाल सलाम म्हणूयात! माझ्यासकट सारेजण खूश झाले. प्रथा पडली. जबरदस्तीपेक्षा सार्वमताने घेतलेला हा पहिला निर्णय होता. सर्वांनी स्वागत केलं आणि मनस्वी स्वीकारलं.

नाशिक महापालिकेने संपूर्ण राज्यात आपली पाठ थोपटून घेतली ती एका प्रकल्पाने आणि तो होता घंटागाडी प्रकल्प. नाशिककरांना माहीत आहे; परंतु तमाम वाचकांसाठी माहिती द्यायची झाल्यास नागरिकांच्या दारात, चौकात घंटागाडी उभी करायची, वाहनचालकाने घंटा वाजवायची अन् नागरिकांनी घरात साचविलेला केरकचरा स्वतः नेऊन द्यायचा. एक वाहनचालक आणि दोन कर्मचारी अशी रचना होती. हे दोन कामगार पुढचा चौक येईपर्यंत गाडीतच ओला आणि सुका कचऱ्याचे संकलन करीत. आज नाशिककरांना टी. व्ही. मालिकांप्रमाणे घंटागाडीची सवय झाली आहे. गृहिणींचा एक कान घंटागाडीच्या घंटीच्या आवाजाकडे असतो. घंटागाडी कामगार हा प्रत्येक घराचा एक भाग झाला आहे. परिणाम अतिशय चांगला झालाय. नव्वद टक्के शहर स्वच्छ राहण्यास मदत झाली.

या घंटागाडी कामगारांची कैफियत मांडायची झाल्यास वेगळा संदर्भग्रंथ तयार होईल. बऱ्याचदा घरातील महिलाच कचरा घेऊन येतात. परंतु एक-दोन दिवस कचरा साचला तरी दुर्गंधी तयार होते. अशा परिस्थितीत एका हातात कचऱ्याची बकेट किंवा पिशवी अन् दुसऱ्या हाताने पदर किंवा रुमालाने नाक दाबलेले. घंटागाडी कामगार मात्र यांत्रिक पद्धतीने तोच कचरा शांतपणे रिता करून घेतो. घरातून बाहेर पडून गाडीत कचरा टाकण्याची प्रक्रिया पाच ते सात मिनिटांत पूर्ण होते; परंतु एवढ्याशा वेळेसाठीही घंटागाडीचा सहवास नकोसा वाटतो. कामगार मात्र सकाळी सहा ते दुपारी चारपर्यंत याच कचऱ्यात उभा असतो. काय अवस्था होत असेल त्याची?

थोरामोठ्यांच्या बोलण्यात, लिखाणात अस्पृश्यपणाबद्दल ऐकले, वाचले आहे. घंटागाडी कामगार मात्र त्याचा प्रत्यक्ष अनुभव घेतोय. वर वर्णन केलेल्या वातावरणात कामगारांच्या कपड्यांचा, अंगाचा नकोसा घाणेरडा वास येतो. गलिच्छ शरीराला माश्यांनी अगोदरच विळखा घातलेला असतो. कारण, त्यांचे छान उदरभरण होत असते. घंटागाडी कामगार तहान, भूक लागते तेव्हा एखाद्या चहाच्या टपरीवर वडापाव घेण्यासाठी थांबतो. हॉटेलवर थांबतो. तेव्हा हॉटेलचा मालक त्याला बाहेरच थांबवितो. पूर्ण पैसे मोजूनही चहा-नाश्ता दिला जातो तो टपरी, हॉटेलपासून काही फुटांवर उभे राहूनच! कारण स्पष्ट आहे, दुर्गंधीयुक्त शरीर, अंगावर घोंघावणाऱ्या माश्या घेऊन येणारं गिऱ्हाईक बाकीच्या गिऱ्हाईकांना उठवून लावू नये, याची खबरदारी मालकाने घेतलेली असते. उठून जाणारा हेही विसरतो, की याच कामगाराने थोड्या वेळापूर्वी आपल्या घरची घाण उचललेली आहे. तो काही हॉटेलात कायमचा मुक्कामाला आलेला नाही, तरीही ही वागणूक!

असो, पण आमच्या या कामगारांनी हे व्रत वर्षानुवर्षे आनंदाने स्वीकारले आहे. त्यांना मात्र कुणीही अस्पृश्य नाही. अशा कामगारांनी कंत्राटी पद्धतीने काम करताना कायद्यात बसणारे वेतन मागितले म्हणून कामावरून कमी करणे, पगार न देणे, कायद्यात लागू तरतुदींची अंमलबजावणी न करणे, अदा करीत असलेल्या वेतनातही अनियमितपणा दाखविणे आदी मागण्यांची माळ गळ्यात मिरविणाऱ्या कामगारांचा मी नकळत हिस्सा-सहकारी झालो. माझी आई नगरपालिकेत सफाई कामगारच होती. तिचेही हाल पाहिले होते. कदाचित त्यामुळेही माझी नाळ पक्की होण्यास मदत झाली असावी. कामगारांमध्ये लढ्याची ताकद पूर्वीच होती, मी केवळ निमित्त झालो. तिला एका ऐतिहासिक भरारीत परावर्तित करण्यासाठी यानिमित्ताने एका विशाल, अथक लढाईची कथा काही अंशी अधोरेखित करण्याचा मी प्रयत्न करीत आहे.

तमाम नाशिककरांची साफसफाई पद्धतशीरपणे सुरक्षित ठिकाणी नेणाऱ्या या कष्टकरी कामगारांची संघटना लाल निशाण पक्षाशी संलग्न असलेल्या सर्व श्रमिक संघ या कामगार आघाडीची. मी या लढ्यात सामील होण्याअगोदरपासून संघटना बांधलेली होती. (कै.) सुकदेव गायकवाड हे नाशिकचे सर्वेसर्वा होते. अंबड-सातपूरच्या काही कारखान्यांमध्येही संघटना कार्यरत होती, अशी माहितीही मला मिळाली. मात्र, आजारपणामुळे गायकवाड यांचे अकाली निधन झाले आणि दीपक भालेराव (डोंबिवली, जि. ठाणे) हे मुंबईचे पदाधिकारी काम पाहू लागले. भालेराव नेटाने औद्योगिक न्यायालयात कामगारांची बाजू मांडत होते. साधी अन् सरळ मागणी होती 'कायमचे काम, कायमचे कामगार.' या निमित्ताने भालेरावांशी झालेल्या भेटी-बैठकांतून यातील अडथळे आणि महापालिका प्रशासन व लोकप्रतिनिधींचे इंटरेस्ट समजले. अगोदर म्हटल्याप्रमाणे स्पीड कामी आला. कामगारांशी संवाद वाढला, बैठका वाढल्या, पत्रव्यवहार वाढला. महापालिकेचे राजीव गांधी भवन आणि कामगार उपायुक्त कार्यालयाच्या पायऱ्या झिजू लागल्या. एका निर्णायक भूमिकेकडे वाटचाल सुरू झाली.

रा. तु. पाटील नावाचा ठेकेदार मुजोरपणाने काम करवून घेत होता. महापालिकेचे प्रशासन अन् लोकप्रतिनिधी आपल्या लाडक्या ठेकेदाराचे ठेका देण्याचे लाड निर्व्याजपणे पुरवत होते. पण, ठेका फक्त नाशिकचा कचरा वेचण्याचाच नाही तर नाशिकचेच भूमिपुत्र असलेल्या कष्टकरी श्रमिक कामगारांच्या अविरत शोषणाचाही!

काम अविरत सुरू होते. सर्व नियम, कायदे पायदळी तुडवून सुरू होते; परंतु पगाराचा अनियमितपणा हा बहुतेक पाचवीलाच पुजलेला असावा. एक-दीड महिन्यांत

फर्मान निघायचे, आज सायंकाळी पगार आहे, शोरूमला या! अनेक दिवसांपासून उपाशी असलेले कामगार अधाश्यासारखे शोरूमला (ठेकेदाराचे कार्यालय) ड्यूटी बजावून पोहोचायचे. बेसमेंटला दाटीवाटी करून वाट पाहत बसायचे. ठेकेदाराचे मॅनेजर, पगारवाटप करणारे सुपरवायझर्स रांगेत खुर्च्या मांडून बसायचे. टेबलावर पगाराचे मस्टर्स, रजिस्टर्स, पावत्यांसह एका कोपऱ्याला फावड्याचा दांडा अशी रचना असायची. तीनशे-साडेतीनशे कामगार टक लावून बसलेले. लॉटरीप्रमाणे कधी कुणाचे नाव पुकारले जाईल, याचा पत्ता नसायचा. नाव पुकारताच घामाचे दाम घेणारा कामगार चड्डीला हात पुसत टेबलावजळ जायचा, पगार घ्यायचा. टेबलावरच्या रजिस्टरवर न पाहता कॅशिअरने बोट ठेवलेल्या ठिकाणी सही किंवा अंगठा टेकवायचा. नंतर पैसे मोजायचा. काही शंका विचारली तर उद्या कामावर यायचे आहे ना! असा दम भरला जायचा. हजार-बाराशेच रुपये असायचे. दीड-दोन तासांनी पगारवाटप करणारे ब्रेक घ्यायचे. अर्धा-पाऊण तासाने पुन्हा वाटप सुरू. कधी-कधी ठेकेदारही जातीने हजर असायचा. नावात असला तरी आचार-विचारांत, व्यवहारांत मात्र कुठेही 'राम' नव्हता. झिंगत आलेला ठेकेदार खुर्चीत बसायचाच मुळी कामगारांच्या आई-बहिणींचा उद्धार करीत. कदाचित तेव्हाच्या कंत्राटातील ती एक कंडिशन असावी. आणखी दीड-दोन तास पगारवाटप झाल्यावर मात्र वाटप करणाऱ्यांना थकवा आलेला असायचा किंवा पैसेच संपलेले असायचे. उरलेल्यांनी 'उद्या, परवा या' असा आदेश निघायचा. दुकान आटोपले. संपूर्ण वाटपात ८० ते १०० कामगारांचा पगार झालेला असायचा. उर्वरित जनता अकरा-साडेअकराला (रात्री) पायीच घरचा रस्ता धरायची, दुसऱ्या दिवशीच्या नरक सफाईची मानसिक तयारी करीत.

ही सर्व चित्तरकथा आपल्या शहरात, आपल्या आसपास घडतेय अन् आपण मात्र फुले-शाहू-आंबेडकरांच्या नावाने बोंबा मारतोय, याची फारच शरम वाटली. चीड आली. आता हीच चीड कागद-पेनाने अर्जफाटे करताना, भाषणांत, बैठकांमध्ये संघटना मजबूत करताना गरळ ओकत होती. माझ्यापेक्षा कामगारांच्या आगीची धग कितीतरी पट मोठी होती. परिणामतः आंदोलने तीव्रपणे होत होती. अखंडपणे चोवीस तास तब्बल ४१ दिवसांचे धरणे आंदोलन करून नाशिकच्या राजीव गांधी भवनाचे मुख्य प्रवेशद्वार बंद ठेवणारा घंटागाडी कामगार पुन्हा पैदा होणे नाही. त्याची भूक त्याच्या लढाईत मुरली होती. त्याची अस्मिता आणि स्वाभिमान त्याच्या घोषणा देणाऱ्या मुठीत एकवटला होता. दोन वेळा मुंबईच्या आझाद मैदानावर तेरा चौदा दिवसांचे सलग आमरण उपोषण

करणारा घंटागाडी कामगार कुठेतरी मंत्रालयाच्या दारावर धडका देण्यात यशस्वी झाला होता. ४१ दिवसांच्या नाशिकच्या धरणे आंदोलनात अनेक प्रयोग झाले. कामगार एकजुटीचा विजय असो! या घोषणा फक्त फलकावरच राहिल्याचे तीव्रतेने जाणवले. समविचारी आणि झेंडाही लालच फडकाविणारेही कधी फडकले नाहीत. कधीकाळी याच कामगार नेत्याला 'टाडा'खाली अटक झाली होती, तेव्हा निषेधासाठी रस्त्यावर उतरणाऱ्या पहिल्या फळीतील कार्यकर्त्यांपैकी मी एक होतो, याचा विसरही त्यांना पडला होता. असो!

धरणे आंदोलन सुरू झाले. दिवसभर घोषणाबाजी करून कामगार महापालिकेची झापडं उघडण्याचा प्रयत्न करीत होते. पोलिस बंदोबस्त होताच. प्रसारमाध्यमांना विशेष धन्यवाद दिले पाहिजेत. एवढ्या कमर्शियल काळातही नाशिकच्या कष्टकरी, श्रमिकांच्या आंदोलनाची योग्य ती दखल जाणीवपूर्वक घेतली जात होती. यानिमित्त कामगार सामूहिकपणे पेपरातल्या बातम्यांचे वाचन करू लागले. त्यामुळे आंदोलनाची धग कायम राहण्यास मोठी मदत झाली. दिवसभर कामगारांच्या पोटात काय जात होते, नव्हते याची मुद्दाम नोंद घेत नव्हतो. कारण, पोटं रिकामी आहेत हे माहीत होतेच. प्रश्न होता भरणार कधी अन् कशी याचा. सायंकाळी मात्र ठराविक कामगार आळीपाळीने थांबून घरी जाऊन जेवून या, असा नियम केला. कामगार घरी जाऊन येऊ लागले. आजही प्रश्न आहे, की घरी जाऊन बेरोजगार कामगार काय खात असतील? पाचव्या-सहाव्या दिवशी काही कामगार म्हणाले, 'भाऊ! आम्ही थांबतो. बाकीच्यांना जाऊन येऊ द्या.' मला वाटले काहीतरी नियोजन, सहकार्याची भावना असेल. म्हटलो, ठीक आहे. माझ्यासोबत माझा पुतण्या लाला (प्रकाश) सावलीसारखा असायचा. त्याचीही कामगारांशी दोस्ती झाली होती; परंतु पाच-सहा दिवसांनी कामगार आपणहून थांबण्याचा आग्रह धरताहेत, याची उकल मनाला चाटून गेली होती. लालाला याबाबत सांगितले. रिपोर्टिंग झालं तेव्हा पोटाला पीळच पडला. या कामगारांच्या डब्यात पिठाचा कणही नव्हता, तेव्हा घरी जाऊन करणार तरी काय? दुसऱ्या दिवशी कमिटी मेंबर्सची बैठक घेऊन त्यांना विश्वासात घेतले, योजना मांडली. रोज दहा किलो धान्य आणायचे (युनियनच्या खर्चाने), पाच हिस्से करायचे. एकाची जबाबदारी मी स्वतः घेतली. उर्वरित चार जणांनी ऐच्छिक स्वरूपात फिरत्या क्रमाने निश्चित केली. प्रत्येकी दोन किलो दळणाच्या पोळ्या आणायचे ठरले. पाच किलो लोणच्याचा होलसेलमध्ये डबा आणला. उपाशी कामगारांमध्ये अपराधीपणाची भावना निर्माण होऊ नये म्हणून घरी जाणाऱ्या

कामगारांनी जमेल तर डबे किंवा थोडी भाजी सोबत आणावी असे ठरले. निर्णय सर्वांना पटला होता. पहिल्या दिवशीच सर्व पोळ्या गोळा झाल्यावर राजीव गांधी भवनच्या दारात आणि दिव्यात एक चपाती हातात घेतली अन् लोणचं घेतलं. रात्री आठला संघर्षाच्या पहिल्या स्नेह आणि सहभोजनाचं औपचारिक उद्‌घाटन झालं. नंतर इतकी सरमिसळ झाली, की कुणी डबे आणले अन् कुणी नाही, याचा थांगपत्ताही लागेनासा झाला. केवळ दहा किलो दळणात ३५० तोंडं आनंदात जेवू लागली, दररोज!

मुंबईच्या आझाद मैदानावरचे धरणे व उपोषण आंदोलन आणखी विस्मरणीय ठरावे. दोन वेळा तेरा चौदा दिवसांचे आमरण साखळी उपोषण संपन्न झाले. एकवीस कामगारांची संख्या स्थिर ठेवली. दर तीन-चार दिवसांनी पाच-सहा कष्टकरी हॉस्पिटलमध्ये दाखल करावे लागत होते. त्यांच्या जागी दुसरे बसून संख्या कायम ठेवली गेली. पहिल्यावेळी तब्बल ६५ कामगार ॲडमिट झाले होते. उर्वरित कामगारांच्या जेवणाचा प्रश्न होताच. कामगारांनीच स्वयंपाकाची भांडी, सामान आणले. खिचडीचा कार्यक्रम सुरू झाला. मंडप उभारलेला होता. रात्री माझा मुक्काम दादर श्रमिकला असायचा. कितीही नाही म्हटले तरी एक-दोन कामगार आळीपाळीने सोबत असायचे. संघर्षाने त्यांना घातपाताच्या संशयाची सवय कदाचित लागलेली असावी. सकाळी आठ-साडेआठला मैदानावर पोहोचायचे. कामगारांनी तयार केलेला काळा चहा प्यायचा. एखादं गाणं म्हणून सभा सुरू करायचो. शाळकरी पोरांसारखे रांगेत बसायचे. अगोदरच कमिटी मेंबर्सनी आढावा दिलेला असायचा. अगोदरच्या दिवशी थोडा ॲडव्हान्सपणा केलेल्या कामगारांना प्रथम जाहीरपणे दटावणी करून 'लेकी बोले, सुने लागे'चा फॉर्म्युला अवलंबिला जायचा. खरे तर ही कृती दोनशे टक्के मनाच्याविरुद्ध केलेली असायची. दोन कामगारांसह मंत्रालयाच्या दिशेने वाटचाल सुरू. सहावा मजला नकळतपणे गाठला जायचा. कारण नगरविकास मंत्रालय मुख्यमंत्र्यांकडेच होते. अधूनमधून कामगारमंत्री, प्रधान सचिवांच्या कॅबिनची दारं ठोठावायचो. रोज एका डोळ्यांत हसू अन् दुसऱ्या डोळ्यांत आँसू अशी परिस्थिती अनुभवत होतो.

सायंकाळी मैदानावर परतताना मात्र आशादायक चित्र रंगविण्याची प्रॅक्टिस करूनच पोहोचायचो. पॉझिटिव्ह रिपोर्टिंग व्हायचे. कामगार आज नही तो कल जमाना बदलेगा या वामनदादांच्या काव्यपंक्तीला सलाम ठोकून खिचडीला बिलगायचे! मला मात्र दोन दिवस मागणी करूनही खिचडी मिळाली नाही. थोडी शंकाही आली. कारण, तक्रारीही कुणी करीत नव्हते. एकदा सायंकाळी म्हटलो, 'मला भूक लागलीय. वडा-भजी खाऊन पोट

बिघडलंय, थोडी खिचडी आण.' कमिटी मेंबर्समध्ये चुळबूळ सुरू झाली. एक-दुसरा म्हणाला, 'भाऊ! शेजारी हॉटेलमध्ये चांगला मसाला डोसा मिळतो, आणू का?' मी सूर लावून विचारलं, 'मराठी समजत नाही का रे!' दिवसभर टेन्शनमध्ये होते, आणखी राग नको म्हणून होती त्यात चांगली खिचडी एका ताटात आली. पहिलाच घास घेतला अन् चुळबुळीची उकल झाली. मीठ-मिरचीचा थांगपत्ता नसलेल्या खिचडीच्या भाताला डाळीने शिवलेही नव्हते. अर्ध्या कच्च्या भाताची खिचडी कामगार तीन दिवसांपासून खात होते. मनातून अतिशय खट्टू झालो. धाय मोकलून रडावेसे वाटले; पण आझाद मैदानाच्या अंधाराने चेहरा झाकून साथ दिली. अर्धवट ताट सोडले असते तर कामगारांचाही धीर सुटला असता म्हणून संपविले. उगीचच कौतुक केलं स्वयंपाकाचं! अन् दादरला निघालो. आज मात्र ठरवून पाच-सहा कमिटी मेंबर्ससोबत घेतले होते. फाईल्स तयार करायच्या आहेत, असे कारण सांगितल्याने फारसे प्रश्नांकित चेहरे दिसले नाहीत. रात्री उशिरापर्यंत खरी परिस्थिती ऐकली. दुसऱ्या दिवशी लवकरच मैदानावर गेलो. उत्तम काळा चहा प्यालो. बैठक सुरू केली. समित्या तयार केल्या. आवडीप्रमाणे पाच-सहा जणांची एक समिती याप्रमाणे भोजन समिती, हॉस्पिटल समिती, साफसफाई समिती, अगदी झेरॉक्स समितीही गठीत केली. भोजन समिती मेंबर्सना घेऊन नजीकच्या हॉटेलवाल्यांकडे गेलो. घंटागाडीची कथा सांगितली. दुपारी एक हजार अन् सायंकाळी एक हजार याप्रमाणे तंदूर रोट्यांची (रोजची) ऑर्डर फायनल केली. हॉटेलवाल्यानेही दीड रुपयाची रोटी एक रुपयाला देऊन लढाईला पाठिंबा दिला. प्रत्येक कामगाराला दोन ते तीन रोट्यांची व्यवस्था झाली. भाजी मात्र कामगारच करू लागले. खिचडीची चव सांगितल्यावर कामगारही खूश झाले. चेहऱ्यावर तरारी अन् भाकरीवर तर्री आली. माझाही भार आता कमी झाला.

पहिल्या उपोषणाच्यावेळी दिवाळीचा सण डोळ्यांसमोर होता. मंत्रालयाची दारं नेहमीप्रमाणे उघडझाप करीतच होती. दहा-बारा दिवस झाले होते. कामगार आंदोलन सुरूच ठेवण्यास सांगत होते; मन आणि डोळे मात्र घराकडे लागून राहिले होते, हे वेगळं सांगावयास नको. पण घरी जाऊन दहा-बारा दिवस काय केलं, पदरात काय पडलं? काय सांगणार घरच्यांना? याचवेळी रानडेकडून समजले, की काँग्रेसचे ज्येष्ठ नेते बुटासिंग मुंबईला येताहेत. ते सफाई कामगार आयोगाचे राष्ट्रीय अध्यक्ष असल्याने आशेचा किरण चमकला. हॉटेल ओबेरॉय टॉवरच्या १९ व्या मजल्यावर भेट घेतली. एवढा मोठा नेता ओबेरॉय टॉवर हॉटेलच्या रूममध्ये स्वतःच्या हाताने चहा वाढून

सांगतो, की 'बेटा, चिंता नहीं करना, सुशीलकुमारजी (शिंदे) मेरे छोटे भाई जैसे है, जरुर काम करेंगे। आज शायद कॅबिनेट है, कल उनसे मुलाकात करेंगे।' मन सुपाएवढं मोठं झालं. मी नाशिक युवक काँग्रेसचा जिल्हा सरचिटणीस आहे, हे समजल्यानंतर तर बुटासिंगजी आणखी खूश झाले. ती सायंकाळ खूपच आनंदात अन् थट्टा-मस्करीत कामगारांसोबत गेली. दुसऱ्या दिवशी सकाळीच रानडेचा फोन आला. बुटासिंगजींसोबत मुख्यमंत्र्यांना भेटायचे आहे. मैदानावरचे कामगारही फ्रेश वाटले. मंत्रालयाकडे फायली घेऊन पळालो. भेट होता-होता सायंकाळ झाली. प्रत्यक्ष भेटीत काहीशी सकारात्मक आणि आश्वासक चर्चा झाली. मीही मौका साधला. रानडेला म्हणालो, 'बुटासिंगना मैदानावर घेऊन जाऊ. उपोषण अन् धरणे आंदोलन मागे घेऊ.' १३ दिवस झाले होते, तोही तयार झाला. बुटासिंगजीही राजी झाले अन् मैदानावर आले. अंधार पडलेला होता. लाल दिव्याची गाडी आणि संघटनेचे पदाधिकारी मैदानावर येताच कामगारांनी घोषणा देत आझाद मैदानाचा अंधार फाडला. तीन-चार गाड्यांच्या हेडलाईटच्या उजेडात मा. बुटासिंगजींनी कामगारांना धीर दिला, आंदोलकांचे अभिनंदन व कौतुक केले. लढा यशस्वी होण्याचे आश्वासित केले. उपोषण मागे घेण्यासाठी एवढे पुरेसे होते. कितीही दिवस लागो, यशस्वी झाल्याशिवाय परतणार नाही... म्हणणाऱ्या घंटागाडी कामगारांनी आपल्या लेकरांची आठवण काढून दहा मिनिटांत मैदान रिकामे केले. हॉस्पिटलमध्ये असलेल्या १०-१२ जणांकरिता मात्र दोघं-तिघं मागे थांबले. ते दुसऱ्या दिवशी सुखरूप परतले. कामगारांचा हा ताफा इतक्या वेळा मुंबईला गेला होता, की पंचवटी एक्स्प्रेसचे नियमितचे प्रवासीही मित्र झाले होते. ते आतुरतेने कामगारांना हालहवाल विचारत. अन् ठेकेदाराला एखादी शिवी हासडत कामगारांना नैतिक बळ देत होते.

नाशिकच्या कामगार आयुक्त कार्यालयाचे आणि विशेषतः सहा. कामगार आयुक्त अनिल लाकसवार यांचे तमाम कंत्राटी सफाई कामगार कायमस्वरूपी ऋणी राहतील. घंटागाडी कामगारांच्या लढ्यात ज्या पद्धतीने शासकीय यंत्रणा सक्रिय झाली, ती पाहता सर्वकाही आलबेल आहे किंवा संपले आहे, असा समज कायमचा दूर झाला. घंटागाडीशी मी जोडला गेलो अन् बहुतेक नव्यानेच कडक शिस्तीचे आयुक्त नाशिक महापालिकेला लाभले. नगरचे जिल्हाधिकारी म्हणून गाजलेले विमलेंद्र शरण होते ते. त्यांची नगरहून बदली होऊ नये म्हणून तत्कालीन पालकमंत्र्यांनीही शासनाकडे शब्द खर्चिला होता, असे बातमीत कुठेतरी वाचले होते. घंटागाडी कामगार कायदा पाळणाऱ्या अधिकाऱ्याचीच वाट पाहत होते. शरणसाहेब रुजू होताच पाच-सहा दिवसांत एक निवेदन तयार केले.

भेट घेतली. प्रवेश करताच समोरच्या खुर्चीत बसतांना शरणसाहेबांचे शब्द कानावर पडले, हे काय छोट्या-छोट्या कामांसाठी तुम्ही लोक युनियनबाजी करता? शिस्तीचा माणूस म्हणजे अशीच वाक्ये येणार, हे गृहित धरून नरमाईने घेत समजावून सांगण्याचा प्रयत्न करू लागलो. जाण्याअगोदरच शरण यांनी मत पक्के केले असावे. मग मात्र आता संयम सुटला. शांतपणे सांगितले, 'शरणसाहेब, ही संघटना तुमची येथे बदली झाल्यावर स्थापन झालेली नाही. तुमच्या अगोदर याच खुर्चीतल्या अधिकाऱ्याने दिलेल्या पत्राची नव्हे आदेशाची प्रत सोबत जोडली आहे. तिची अंमलबजावणीची ही विनंती आहे. आपण म्हणता या कामगारांचा आणि आमचा काही संबंध नाही. ही ठेकेदाराची माणसे आहेत; पण काम कुणाचे आहे? आणि मूळ मालक कोण आहे?' चर्चा तापत जातांना शरण म्हणाले, 'मी तुम्हाला उत्तर द्यायला बांधिल नाही.' उठलो आणि सांगितले, 'शरणसाहेब, या बैठकीत एकच समजले. तुमच्यासारख्या शिस्तीच्या अधिकाऱ्याशी बोलतांना यापुढे निवेदनासोबतच भारतीय राज्यघटनेची कॉपीही बगलेत आणावी लागेल.' अन् बाहेर पडलो.

निवेदनाचा साचाच ठरून गेला होता. प्रत्येक पत्राची प्रत पोलिस, कामगार उपायुक्त, पी. एफ. कार्यालय अन् नगरविकास मंत्रालय यांना पाठविली जात होती. कामगार उपायुक्त कार्यालयाने मात्र खरोखर न्यायाची भूमिका घेत प्रत्येक गोष्टीची जाणीवपूर्वक दखल घेत महापालिकेलाही पाठपुरावा सुरू केला. जॉइंट बैठका सुरू झाल्या. परिणामतः मंत्रालयाची दारेही उघडू लागली. काही का असेना, संवाद सुरू झाला होता. रानडे, भालेराव मुंबईत, तर मी नाशिक असा किल्ला लढविला जात होता. स्थानिक पोलिस खातेही योग्य साथ देत होते. त्यांनाही कायदा कोण मोडतंय, सपोर्ट कोण करतंय याची एव्हाना उकल झाली होती. एक मात्र खात्रीपूर्वक आणि निष्ठेने केले, कामगारांच्या हातात दगड दिला नाही.

दरम्यानच्या काळात एक घटना घडली. सातपूरच्या दोन गाड्यांवरील कामगारांना अचानक काढून टाकले. फोन वाजला, पाहतो म्हटले. तोपर्यंत प्रत्येक प्रभागातील कामगारांचे फोन येऊन गेले. संताप व्यक्त होत होता, पण सांगितले, जे कामगार गाडीवर आहेत, त्यांनी काम संपवूनच जमायचे आहे. या प्रकरणात ठेकेदाराने एक आगळीक आणखी केली होती. ज्या गाड्यांवरून कामगार कमी केले होते, त्या गाड्यांवर दुसरे कामगार नेमून खासगी बंदूकधारी सिक्युरिटी गार्डस् पाठविले. चित्र डोळ्यांसमोर आणा. घंटागाडी कचरा वेचण्यासाठी आणि सिक्युरिटी गार्डस्? कामगारांचा उद्रेक

आणखी वाढत होता. फोन्सची रिंग अधिक वाजत होती. अर्ध्या तासात सातपूर पोलिस ठाणे गाठले. आठ-दहा घंटागाड्या रांगेत उभ्या होत्या. पोलिस ठाण्याच्या बाहेर सुमारे दोनशे-अडीचशे महिला कामगारांसह उभ्या होत्या. शांतता कम चलबिचलता वाढली. सावलीत मोटारसायकल उभी केली अन् साऱ्यांना शांत बसायचे हातवाऱ्यानेच सांगून पोलिस निरीक्षकांच्या कॅबिनमध्ये घुसलो. कॅबिन भरलेली, ठेकेदाराची माणसे, स्थानिक नगरसेविका (जिने कधी राजीव गांधी भवनासमोर कामगारांना साध्या शुभेच्छाही दिल्या नाहीत.) कामगारांची बाजू मांडण्याचा प्रयत्न करीत होती. मी जाताच इन्स्पेक्टर मोहाडीकरांनी विचारले, आपण कोण? कामगारांनी सांगितले, आमचे भाऊ! ठेकेदाराच्या माणसाने हेच सगळे काम पाहतात युनियनचे, असे सांगितले. नगरसेविकेने अलविदा केला. पोलिस निरीक्षकाने सांगितले, 'तुमच्या मुंबईच्या पदाधिकाऱ्यांशी बोलणे झाले आहे. दोघांनाही आत टाकले आहे अन् त्यांच्या रायफलही जप्त केल्या आहेत.' मी म्हटले, 'धन्यवाद! आपण योग्य ती बाजू पाहालच, प्रश्नच नाही. मला फक्त त्या रायफल्सचे नंबर्स आणि वापरण्याच्या परवान्याच्या झेरॉक्स पाहिजेत. गृहमंत्र्यांना दुपारपर्यंत फॅक्स करायचा आहे.' पोलिस निरीक्षकाला अनपेक्षित होते. आता मी बाहेर आलो आणि आया-बहिणी तसेच कामगारांमध्ये बसलो. कम्युनिकेशन इतके स्ट्राँग होते, की कमिटी मेंबर्सनी तोपर्यंत शेजारच्या गाडीवर सगळ्यांसाठी चहा सांगितलाही होता. एकदम सिस्टीमॅटिक. आता मला उत्सुकता होती कामगारांच्या, महिलांच्या तोंडून सविस्तर माहिती घेण्याची. कारण माझी वकिली पुढे त्याच आधारावर चालणार होती.

घंटागाड्या सातपूरच्या स्वारबाबानगरात घुसल्या आणि कामगार व महिलांनी अडविल्या. शांतपणे सांगितले, की आमची पोरं कामगार आहेत. या गाड्यांवरून तुम्ही उतरा खाली. सिक्युरिटी गार्डस्ला दणका माहीत नसावा आणि ठेकेदारालाही. सिक्युरिटीने खाली उतरून बंदुका रोखल्या अन् दटाविण्यास सुरवात केली. वाद चिघळला. सिक्युरिटीने जमावाला म्हणजेच महिलांना रायफलच्या दांड्याने मागे ढकलण्यास सुरवात केली. हमारी गली और हमारे उपरही म्याँव? व्हायचा तोच परिणाम झाला. दोघांनाही बदडले. एक रायफल तोडली. सारा तमाशा रस्त्यावरच सुरू होता. सकाळची सात-साडेसातची वेळ होती अन् सातपूर एम.आय.डी.सी.त कामावर जाणाऱ्या कामगारांचीही वर्दळ मोठ्या प्रमाणात सुरू होती. काय चालले म्हणून विचारणा केली तर आमचा सातपूरचा पावणेपाच फूट उंचीचा चिंत्या, घंटागाडी कामगार मोडकी रायफल दाखवित म्हणाला, अतिरेकी आहेत. झाले! कामावर जाणाराही थांबला आणि

सायकल, मोटारसायकल साईड स्टँडवर उभी करून सिक्युरिटीच्या कानफटात देऊ लागला. विचार करा अर्धा-पाऊण तासात किती बसल्या असतील? नंतर पोलिस आले अन् प्रकरण आहे तिथपर्यंत आले. मला खोटं आवडत नाही म्हणून कुणीही हातचं राखलं नाही. सारे काही खरे सांगितले. केस भरपूर स्ट्राँग होती. तोपर्यंत इतर कामगारही जमा झाले होते. सारी कहाणी दीड तास ऐकल्यावर पुन्हा पोलिस निरीक्षकाकडे गेलो. प्रकरणाचे गांभीर्य विशद केले. योग्य ती कारवाई होत होती. पोलिस केसमध्ये फारसा इंटरेस्ट नव्हता; पण एका मुजोर ठेकेदाराची दादागिरी नाशिकचे राजीव गांधी भवन असहायपणे पाहत होते, याची मनोमन चीड निर्माण होत होती. अंतिम पर्याय मंत्रालयच वाटत होता.

असलेल्या पदाचा टेकू म्हणून आधार घेत मुख्यमंत्री सुशीलकुमार शिंदे यांचा पाठपुरावा झाला अन् एकदाची सह्याद्री गेस्ट हाऊसवर बैठक ठरली. मुख्यमंत्री, कामगारमंत्री, दोन्ही विभागांचे सचिव, महापालिकेचे प्रतिनिधी आणि कामगार संघटना प्रतिनिधी अशी सुमारे पंचवीस जणांची व्यापक बैठक झाली. योग्य पक्षासोबत काम करतो, असेच वाटले. बैठकीअंती सगळ्यांची बाजू ऐकून घेत मुख्यमंत्र्यांनी संबंधितांना स्पष्ट सांगितले, ‘तातडीने कामाला लागा, मार्ग काढा. कामगारांवर अन्याय होता कामा नये. दीज आर अवर पीपल्स.‘

घंटागाडी कामगारांचे हक्क पदरात पडण्याचे हे सुचिन्ह वाटले. आता फार काळ वाट पाहावी लागणार नाही. सचिव, प्रशासन पातळीवर आता बैठका सुरू होत्या. पण, निर्णय काही हाती येत नव्हता. जो कुणी आशावादी वाटत होता, त्याच्याकडे मदत मागण्याचे काम सुरू होते. राज्य सरकारात काँग्रेस-राष्ट्रवादी-आर.पी.आय.; तर मनपात शिवसेना-भाजप अशी रचना असल्याने सगळेच आपले वाटत होते आणि परकेही! कारण नाशिकच्या एका विभागाचा ठेका रद्द करण्याची केस जिंकूनही याच ठेकेदाराला तीन वर्षे विनाअट ठेका कायम करण्याचा ठराव एकमताने महासभेत पारित करण्यात आला होता. आयुक्त विमलेंद्र शरण यांनाही तो पसंद नसावा म्हणून शासनाकडे पाठविण्यात आला. पुढच्याच बैठकीत मुख्यमंत्र्यांना केसची ऑर्डर दाखविताच त्यांनी तत्काळ तो विखंडित (रद्द) केला. सायंकाळी फॅक्स प्राप्त होताच शरणसाहेबांच्या साऱ्या शंका दूर झाल्या. आता तेही कामगारांच्या बाजूचे झाले होते. संवादाची एक यशस्वी पायरी आणखी संघटनेने पार केलेली होती.

मधल्या काळात नागपूरच्या हिवाळी अधिवेशनासाठी रवाना झालो. मोजकेच लोक

गेलो. पुन्हा दैनंदिनी सुरू. या काळात सभापती शिवाजीराव देशमुख, राजेश टोपे, भाई जगताप, सरदार तारासिंह, अरुण गवळी, तत्कालीन विरोधी पक्षनेते नारायण राणे, नीलम गोऱ्हे या साऱ्यांना भेटलो. अधिकारी वर्गात सुभाष लाला, डॉ. संजय चहांदे आदींना भेटलो. दरम्यान, आयुक्त विमलेंद्र शरण यांचीही आयुक्त पदावरून बदली झाली होती. त्यांच्या जागी विनिता सिंघल रुजू झाल्या होत्या. निरोपाच्या वेळी गेलो तेव्हा शरणसाहेबांनी खांद्यावर हात ठेवून सांगितले, 'आहिरे, मॅडमला तुमच्याबाबत (घंटागाडी) सांगितले आहे, त्या मदत करतील.' पॉझिटिव्ह लढ्याला तो सकारात्मक प्रतिसाद होता. बरे वाटले. दिशा योग्य आहे याचे समाधान वाटले.

नागपूरला विरोधी पक्षनेते नारायण राणेंची भेट अधिक फलदायी ठरली. यात मध्यस्थी होते ज्येष्ठ पत्रकार कुमार केतकर. त्यांचा फोन जोडून दिल्यावर दुसऱ्या दिवशी सकाळीच राणेसाहेबांनी सांगितले, परवा महापौरांना अन् ठेकेदाराला बोलावून घेतले आहे मुंबईला. बघा जमले तर यायला. नकोचा प्रश्न होता कुठे. रानडेची ड्युटी फिक्स अन् बाकीच्या कामासाठी नाशिकला परत. नारायण राणेंच्या मध्यस्थीचा चांगला परिणाम झाला. तत्कालीन महापौर दशरथ पाटील यांनी फर्मान काढले अन् सायंकाळी सहाला महापालिकेच्या गेटवर किमान वेतनाप्रमाणे पहिल्यांदा पगार वाटप सुरू झाले. ठेकेदाराने खोटी कागदपत्रे सादर करून केवळ पन्नासच कामगार बाकी आहेत, असे सांगितले. पुरावे सारे होते. कामगारांचा धीर बांधण्याकरिता याला सोडायचे नाही, असे ठरविले होते. पगार वसूल केला. दुसऱ्याच दिवशी सगळे पुरावे सादर करून ठेकेदार उघडा पाडला. प्रशासनाने बिले (देयके) राखून ठेवली अन् पगार वाटपाचे फर्मान काढले. कामगार खूश होते. पुन्हा रात्रीच्या साक्षीने फरकाचा पगार सुरू. २०-२५ पोलिस कर्मचारी, यात तीन-चार महिला कर्मचारी, एक-दोन पोलिस उपनिरीक्षक, निरीक्षक अशा बंदोबस्तात पगारवाटप सुरू. एवढे कायदेशीर पगार वाटप पहिल्यांदाच होत असावे.

एकदा थोडी फुरसत काढून सहा. पोलिस आयुक्त मोराळेंना भेटायला गेलो. सहाय्यक बिऱ्हाडे म्हणाले, द्या निवेदनाची प्रत. म्हटलो, नाही, आज भेटायचे आहे. त्यांना थट्टा वाटली; पण नंतर भेट घडवून दिली. काही जुजबी प्रश्नोत्तरे झाल्यावर मोराळेसाहेब अन् मी दोघेच कॅबिनमध्ये राहिलो. साहेब म्हणाले, सांगा. मी विनंती केली, की घंटागाडी प्रकल्प महापालिकेचा आहे. ठेकेदार महापालिकेचा आहे. कामगार ठेकेदाराचे आहेत. मग पगार वाटपाच्यावेळी पोलिसांचे काय काम? महापालिकेची स्वतःची सुरक्षा यंत्रणा

असताना त्यांच्याच आवारात पोलिस सात-आठ तास गुंतवायचे? अगोदरचे नाशिक क्षेत्रात पोलिस अपुरे पडताहेत. मोराळेसाहेब शांतपणे ऐकून घेत होते. मला उद्देश विचारला. स्पष्ट केला, बंदोबस्तातल्या पोलिस अधिकारी आणि कर्मचाऱ्यांचा पगार मागा महापालिकेकडे. अचानक शोध लागल्यासारखे साहेब म्हणाले, छान! लवकरच डी.सी.पी. आणि सी.पी.साहेबांशी बोलतो. चहा पाजला. जयहिंद केले आणि उठलो. साहेबांनी सर्वतोपरी सहकार्य करण्याचे आश्वासन दिले. हसले आणि आणखी ओळख दिली, कधी काळी मीही युक्राँदचा कार्यकर्ता होतो. नाळ घट्ट झाली.

निवडणुका जवळ येत होत्या. मंत्रालयात पाठपुरावा सुरू होता. तसाच काँग्रेसच्या मुंबईच्या मुख्यालयातही भेटीगाठी सुरू होत्याच. तत्कालीन प्रदेशाध्यक्षा (कै.) प्रभाताई राव यांनी मात्र मनोमनी न्याय देण्याचा निर्णय घेतला असावा. प्रभारी असलेल्या श्रीमती मार्गारिट अल्वा यांच्याशी भेट घडवून दिली. सकाळी अल्वांनीही शाश्वत केले. थोड्याच वेळात मुख्यमंत्री सुशीलकुमार शिंदे आणि श्रीमती अल्वा लिफ्टमधून (सह्याद्री अतिथीगृहाच्या) जायला निघाले. समोरच रानडेही होता. नमस्कार केला. लिफ्ट येईपर्यंत दोन-तीन मिनिटे होती. अल्वा म्हणाल्या, 'शिंदेसाहब, यह नाशिकका भी सब्जेक्ट है।' अल्वांचे शब्द ऐकून मुख्यमंत्री सुशीलकुमार शिंदे तत्काळ उत्तरले, 'मॅडम, दीज आर प्रायव्हेट पीपल्स.' वीज कोसळावी असाच प्रसंग होता तो. रानडे आणि मी अवाकच् झालो. पंधरा-वीस दिवसांपूर्वी याच इमारतीत सगळ्या अधिकाऱ्यांना खडसावणारा महाराष्ट्राचा मुख्यमंत्री म्हणाला होता, दीज आर अवर पीपल्स आणि असे काय घडावे की पंधरा दिवसांत तीच माणसे (कामगार) प्रायव्हेट पीपल्स होतात? पण थांबलेला श्वास पुन्हा स्थिर झाला. लिफ्टमध्ये पाय ठेवून श्रीमती मार्गारिट अल्वा म्हणाल्या, 'नहीं शिंदेसाहब, वैसा नही है, मैं आपको समझाती हूँ।' आणि आम्हाला म्हणाल्या, 'आप रुको दोहपरतक, म्युनिसिपल कमिशनर भी आ रहे है।'

मुख्यमंत्री असलेल्या सुशीलकुमारांना राज्याच्या निवडणुका जिंकूनही पायउतार का व्हावे लागते? याचे उत्तर नंतर सापडले. झिलकऱ्याला स्वतःचा राग आळवता येत नाही, हेच खरे! दुसऱ्या वेळच्या उपोषणाच्या वेळी अशीच तऱ्हा. आता मात्र कामगार कुशल झाल्याने माझा बराच ताण कमी झाला होता. आझाद मैदानात पोलिसांनी एकदा मला बोलावणे पाठवले. थोडा घाबरलो. रात्री कामगारांनी काही धिंगाणा तर घातला नाही? झालं उलटंच. पोलिसांनी कौतुक केलं कामगारांचं. बारा-पंधरा दिवस मुक्काम ठोकणाऱ्या आंदोलनकांना रोज सकाळ-सायंकाळ मैदानाची साफसफाई करताना पोलिसही

पहिल्यांदाच पाहत होते. अधिकाऱ्याला गमतीने अन् गर्वाने सांगितले, 'सकाळी कचरा पाहिल्याशिवाय यांना भूकही लागत नाही.' सायंकाळी पोलिसांनी स्वयंप्रेरणेने पाण्याचा टँकर उभा केला. साफसफाई समितीनं विभागवार जबाबदारी वाटून दिल्याने दहा मिनिटांत मैदान साफ होऊ लागले. कचऱ्याची राखरांगोळी होऊ लागली.

या सर्व प्रवासात घरी अनिता, गुड्डू, गट्टी यांच्याशी रोज सायंकाळी फोनवर बोलायचो. तिघींनाही काय प्रगती आहे? याची दिवसभर उत्सुकता होती; पण आता कुठे असेल? माहीत नसल्याने स्वतःहूनच 'नो डिस्टर्ब'चा बोर्ड लावून घ्यायच्या. मी फोनवर रिपोर्टिंग करायचो. अनिता धीर देत होती. तिचा लढा मात्र दोन्ही-तिन्ही आघाड्यांवर सुरू होता. पोरींना सांभाळत होती. शाळा पाहत होती अन् मानसिकदृष्ट्या मला कायम ताठ ठेवण्याचीही कसरत करीत होती. अर्थात, सर्व काही महिला सहाय्य कक्षाची नोकरी सांभाळूनच. कधीही नकारात्मक भाव आला नाही. पोरींशी थट्टा-मस्करीचं बोलणं झाल्यावर मात्र मन पार हलकं व्हायचं. गुड्डू, गट्टी केवळ माझ्या पोरीचं नव्हत्या, तर मार्गदर्शक अन् नेत्याही होत्या. काही कामगारांची नावं पाठ असल्याने त्यांची ख्याली-खुशाली विचारायच्या. मग मंत्री काय बोलला, याचा जबाब द्यावा लागत होता. (मंत्रालय यांच्या बापाचंच होतं!) याप्रमाणे दररोज रिचार्ज होऊन दादर श्रमिककडे परतायचो. साडेआठ, नऊला दादरचे जीने उतरताना मात्र पाय दिवसभराची गिनती सुरू करायचे. एक-दोन वेळेस तर समवेत आलेल्या कामगार सहकाऱ्याने अंडा-भुर्जी आणेपर्यंत मी गाढ झोपलेलो होतो. कितीही नको म्हटले तरी भाऊ दोनच पाव आहेत, घ्या पटकन खाऊन, असा आग्रह असायचा. यात काळजीचा तडका असल्याने झोपही उडायची, मग मात्र पोटभर खावूनच झोपायचो. सकाळी पुलाखालच्या गाड्यावर भजीपावाचा आवडता नाश्ता करीत असताना हा पठ्ठ्या मात्र स्वतःचा नाश्ता कधी आटपायचा, कळायचेही नाही. मी तिकिटं काढतो तोपर्यंत पानाचे पार्सल घेतले आहे, असे म्हणत पटकन लोकलच्या रांगेत उभा व्हायचा. घंटागाडीच्या या लढ्याने मला साडेतीनशे परिवारांचा हक्काचा सभासद करून घेतले होते. माझ्या मोबाईल फोनवर कामगारांच्या आया-बायका आस्थेवाईक चौकशी करायच्या. आंदोलनासोबतच तब्येतीला जपण्याची विनंती करायच्या. साडेतीनशे केअर टेकर्स असलेल्या माणसाला कुठला आजार धक्का लावील? माझ्या मिजासखोरीचे लाड पुरविण्यात विशेषतः दादू बर्वे, विलास मोहिते, रफिक सय्यद, किशोर जाधव, प्रदीप गांगुर्डे, नागेश भोळे, आनंद गांगुर्डे आदी मंडळींचा विशेष पुढाकार असायचा. माझ्या पाठीमागे ही मंडळी कान अन् डोळ्यांची भूमिका

जिम्मेदारीने पार पाडीत होती. हे कामगार म्हणजे मी आणि इतर कामगार यांच्यातील कधीही न ढासळणाऱ्या पुलाचे मजबूत खांब होते. त्यामुळे हा लढा माझ्या एकट्याचा वाटण्याचे आणि असण्याचे काही एक कारण नाही. हा लढा माझ्या कुटुंबाचा आणि साडेतीनशे कष्टकऱ्यांच्या विझलेल्या चुलींचा एकत्रित लढा होता.

एकदा जाणवले की दोन दिवसांपासून अनिता एकटीच बोलत आहे. गुड्डू, गट्टीचा आवाजच आला नाही. तिसऱ्या दिवशी मी विचारले तर दबक्या आवाजात अनिताने सांगितले, 'गट्टीच्या पायाला ड्रॉवर लागलाय. फार नाही लागले; पण बोल तिच्याशी!' मी म्हटलो, 'बोल बेटा...' तर जोरात रडायला लागली. खूपच कालवाकालव झाली. शेवटपर्यंत काहीच बोलू शकली नाही. तिसऱ्या दिवशी रविवार होता. मी खात्रीच्या कमिटी मेंबर्सना हे सांगितले. एकसुरात म्हणाले, 'भाऊ, तुम्ही जाऊन या.' आम्ही सांभाळतो सर्व. पण, प्रत्येकालाच घर होते, परिवार होता. मार्ग काढला. पन्नास कामगारांनी थांबून बाकीच्यांनी 'मित्र, नातेवाइकांकडे भेटून या.' मात्र सोमवारी सकाळी सातला मैदानावर हजर राहण्याचे कबूल करूनच!

शनिवारी रात्रीच मी निघालो. महामंडळाची बस होती. माहीत नाही कुठली होती; पण नाशिकमार्गे जाणारी होती. चहापाणी करून हातात पानांची पुडी अन् पाण्याची बाटली देऊन सोबत आलेल्या चार-पाच जणांनी निर्धास्तपणे गाडीत बसविले. अनिताला फोन केलेलाच होता. त्यामुळे ती जागीच होती. गुड्डू झोपेचं सोंग घेऊन बहुतेक पडलेली होती. रात्री दोन-अडीचला घरी पोहोचलो. घरात शिरल्या-शिरल्या बाकावर बसून गाढ झोपलेल्या गट्टीचा पाय पाहिला. डाव्या पायाच्या नळीवर वजनदार ड्रॉवर घसरून पडल्याने जवळपास सहा इंच मोठी जखम झाली होती, तोपर्यंत पोरीही जाग्या झाल्या होत्या. चौघंही ढसाढसा रडलो. गट्टी तर माकडीणच्या पिलासारखी बिलगली होती. आतापर्यंत तर अनिता रडलीही नव्हती. छान मोकळी झाली. रविवारी पाय निघत नव्हता. पण, पोरींनी हसून सांगितले, 'उद्या शाळा आहे' तेव्हा कुठे मन स्थिर झाले. अनिताची इच्छा विचारण्यासाठी वेळ होता कुठं? सोमवारी पंचवटीने आझाद मैदानावर लढा पुन्हा सुरू...!

बहुतेक याच काळात एका हितचिंतक मित्राने अनिताला सांगितले, की ठेकेदाराने मला मारण्याची सुपारी दिली आहे. मी मुंबईत होतो कामगारांसोबत. लढा एका टप्प्यावर आला होता. कामगार मला घोळक्यात ठेवू लागले होते. बहुतेक अनिताने दोन-तीन कामगारांना विश्वासात घेऊन सांगितले असावे. पण मला खबर नव्हती.

नाशिकला असतांना अनिताला त्रास सुरू झाला. म्हणून डॉक्टरकडे गेलो तर डायबिटीजच्या गोळ्या सुरू होत्या. अनिताची शुगर शूट-अप झाली होती. एका धसक्याने आयुष्यभर साथ देणाऱ्या व्याधीची भेट नकळत माझ्याकडून अनिताला मिळाली होती. पुढे हायकोर्टाने योग्य ती साथ दिली. न्याय दिला. आता घंटागाडी कामगार विरुद्ध नाशिक महापालिका, ठेकेदार आणि महाराष्ट्र शासन (नगरविकास आणि कामगार विभाग) अशी न्यायालयीन लढाई सुरू झाली होती. महापालिकेनेच ठेकेदाराला बजावलेल्या नोटिसी आणि कामगार उपायुक्त कार्यालयाने ठेकेदाराचा रद्द केलेला परवाना आमचे तरुण वकील ॲड. भावेश परमार यांनी शस्त्रे म्हणून योग्य रीतीने वापरला. कामगारांच्या बाजूने निकाल देत मा. उच्च न्यायालयाने फार उत्तम शेरा मारला, 'या प्रकरणात महापालिका आणि ठेकेदार एकाच बोटीतून आलेले दिसतात.' ही अतिशय जमेची बाजू म्हणावी लागेल.

आता ठेकेदार आणि महापालिका आणखी चेकाळली आणि मा. सर्वोच्च न्यायालय, दिल्ली येथे अपिलात गेले. सुप्रीम कोर्टात कामगारांची बाजू मांडताना उभे ठाकले ते ॲड. कॉलीन गोन्साल्विस. ठेकेदाराने सात वकील दिले होते; तर नाशिक महापालिकेने माजी ॲटर्नी जनरल ॲड. सोली सोराबजींचे मन वळविले होते. नंतर कळाले की सोलींनाही कामगारांची बाजू मान्य होती. आजमितीस मा. सुप्रीम कोर्टात एस.एल.पी. दाखल आहे. मा. सुप्रीम कोर्टाने खालच्याच म्हणजेच मा. उच्च न्यायालय, मुंबईचा निकाल कायम ठेवून कामगारांना तात्काळ कामावर घेण्याचे आदेश दिले.

एक वार्ताहर म्हणून बातमी घेण्यासाठी गेलो आणि भारतातल्या नरकसफाई करणाऱ्या लाखो कामगारांच्या कायदेशीर हक्कांवर शिक्कामोर्तब करणाऱ्या न्यायालयाच्या ऐतिहासिक निकालाचा पिटीशनर झालो.

ही घटना जून-जुलैमधील असावी. पुढील दोन महिन्यांमध्ये कामगार कामावर चढण्याची प्रक्रिया पूर्ण झाली. सहजासहजी होणार नव्हते, पण झाले. आता स्मृतिभ्रंश झाला, असेच म्हणावे लागेल. कारण, महिना आठवत नाही; पण बहुतेक त्याच वर्षाचा नोव्हेंबर महिना असावा. एक दिवस नाशिकच्या सर्व वर्तमानपत्रांमध्ये चार कॉलमची बातमी झळकली,

**घंटागाडीचे मनोहर आहिरे यांची हकालपट्टी!**

दि. १९ जानेवारी २०११.